
शनिवार । १७ एप्रिल १९७१ । ५० पैसे

माणूस

# अपराजित नेतृत्वाला इतिहासाची मानवन्दना



## सप्रेम नमस्कार....

▫ आपला ता. ३१ चा अंक अतिशय महत्त्वाचा आणि मोलाचा ठरला आहे. विधान सभा आणि विधान परिषदेत अंदाजपत्रकावर चर्चा होताना सभागृहाच्या दोन्ही बाजूंना त्या अंकाचा फार उपयोग झाला. अभिनंदन.

५ एप्रिल, १९७१ — नरूभाऊ लिमये, मुंबई.

▫ 'घोषणा' आणि प्राप्त वस्तुस्थिती यातील महदंतर स्पष्ट करणारा 'माणूस'चा ३१ मार्चचा 'गरिबी हटाओ योजना विशेषांक' अत्यंत आवडला. विषय गंभीर व क्लिष्ट असतानासुद्धा वैचारिक अभ्यासू अशा सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांना तो निश्चितच 'मार्गदर्शक' असाच आहे. गरीब आणि श्रीमंत यांना आर्थिक विकासाचा लाभ सम प्रमाणात मिळतोच असे गृहीत धरणारे आपले नियोजन मंडळाचा दोष अचूक दर्शविला आहे. आर्थिक कार्यक्रम, ग्रामोद्योग, भूमीवाटप, बेकारी, रोजगार, लोकसंख्या, उपलब्ध पैसा, यातील वस्तुस्थिती,


किंमत पन्नास पैसे

शनिवार १७ एप्रिल १९७१

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी पंचेचाळीस रुपये

# माणूस

वर्ष : दहावे
अंक : अठ्ठयाहत्तरावा

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्र काल्पनिक.

केलेले कार्य व करावयाचे प्रचंड कार्य, सुधारावयाच्या चुका व मार्ग या सर्वांचे केलेले सखोल विवेचन फारच सुस्पष्ट व अंतर्यामी विचार करावयास लावणारे असेच आहे. 'विदारक सत्याचे अभ्यासपूर्वक केलेले मार्गदर्शन' असे या विशेषांकाचे विशेषच आहे. ह्या अंकाचे आमच्या पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी व जबाबदार नेत्यांनी निवांत वेळी मनन करावे असे वाटते. परिस्थितीनुरूप, वस्तुस्थितीला धरून, विपर्यास न करता अभ्यासपूर्वक परिश्रम घेऊन तयार केलेल्या 'माणूस'च्या ह्या अंकाचे मन:पूर्वक अभिनंदन. लेखक प्रा. दांडेकर, प्रा. रथ व आपले आभार.

४ एप्रिल, १९७१ — डी. एम्. कांबळे, अहमदनगर.

¤ पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आता काहीतरी जादू करणार आणि आपली गरिबी घालवणार अशा समजुतीमुळे बाईंचा प्रचंड विजय झाला. त्या 'गरिबी केव्हा हटवणार' याची सामान्य नागरिक वाट पहात आहे. अगदी योग्य वेळी आणि समजेल अशा शब्दात लिहिलेला 'गरिबी हटाव योजना विशेषांक' आमच्या हाती देऊन आमची जिज्ञासा पुरी केलीत याबद्दल आपले अत्यंत आभारी आहोत. विशेषांक वाचून झाला. अनेक योजनांची भरपूर माहिती आहे पण आणखी काही तरी हवं होतं असं वाटत राहतं.

३ एप्रिल, १९७१ — श्रीकांत व्हटकर, उल्हासनगर.

¤ 'गरिबी हटाव योजना विशेषांक' बराच उशिरा मिळाला. लेखातील भाषा काही अंशी समजण्यासारखी असली तरी माझे क्षेत्र भिन्न पडल्यामुळे बऱ्याच गोष्टींचा बरोबर उलगडा होऊ शकला नाही. अर्थातच भारताच्या सद्य परिस्थितीचे चित्र वाचकांसमोर ठेवले ह्याबद्दल 'माणूस' प्रशंसनेस पात्र आहे.

७ एप्रिल, १९७१ — पुरुषोत्तम खेडेकर, नागपूर

¤ आपला 'गरिबी हटाव विशेषांक' वाचला.
यापुढे आपण पुन्हा साप्ताहिक सुरू करणार हे वाचून आनंद झाला.
'माणस'चे स्वरूप बदलणे आवश्यक आहे, नाहीतर धोका संभवतो.
भविष्य वाचणारे अंक विकत घेत नाहीत. त्यापेक्षा दुसरे सदर टाकावे.
संगीत, क्रीडा, आरोग्य व विज्ञान यास महिन्यातील एका अंकात जागा द्यावी.
प्रत्येक अंकात सुंदर लघुकथा असावी.
चित्रपट, नाट्य यांची परिक्षणे आवश्यक नाहीत.
'मुंबई वार्ता'मध्ये सर्व घडामोडी असाव्यात. फक्त राजकारण नको.
ग्यानबा, रातराणी यांची हजेरी आवश्यक आहे.
प्रत्येक अंकात संपादकीय असावे.
किमतीच्या बाबतीत निर्णय आपणच घ्यावा. मात्र आम्हाला तीन 'साप्ताहिके' घ्यावी लागतात, याची कृपया नोंद असावी.
शेवटची विनंती, 'माणूस' वाचकांचे एक संमेलन मुंबईत भरवावे.

४ एप्रिल, १९७१ — अनिल काळे, मुंबई.

# मुंबई वार्ता

अरुण गोसावी

## एक अहवाल

**श्री.** संपादक महाराज,

परवा काही कागदपत्र रस्त्यात सापडले. नेहमीच्या चौकसखोर बुद्धीने त्यामध्ये डोकावून पाहिले तो आत एका सभेचा अहवाल नोंद करून ठेवला होता. हा अहवाल कोणी लिहिला हा एक संशोधनाचा विषय होईल. परंतु नोंदविणाऱ्याची निरीक्षण-शक्ती चांगली होती हे आपणासही उमगेल. कुणी म्हणतात अहवालात वारंवार उल्लेख असलेल्या बंड्या नामक चतुर व्यक्तीचे हे लिखाण असले पाहिजे. परंतु एकंदर अहवालावरून असा निष्कर्ष निघतो की ही बंड्या नामक व्यक्ती वयाने फारच लहान–म्हणजे आठ ते नऊ वर्षाची असावी. तेव्हा एवढी लहान व्यक्ती असा अहवाल कसा लिहू शकेल ? परंतु कागदपत्रांची एकूण स्थिती, अक्षरांची अस्थिरता, शुद्ध लेखनाच्या ढोवळ चुका, अधूनमधून पडलेले शाईचे आणि इतर डाग–हे पाण्याचे, लाळेचे की शेबडाचे हाही एक संशोधनाचा विषय होईल–यावरून मात्र या बंड्याकडेच या अहवालाचे पितृत्व द्यावे लागेल असे वाटते.

असो. अहवाल कोणी लिहिला हा मुद्दा तसा महत्त्वाचा नाही. महत्त्व आहे ते अहवालातील मजकूराला. थोडे बारकाईने पाहिले तर ज्या सभेचा हा अहवाल आहे त्या सभेत एक अर्थसंकल्प मांडला गेला आहे हेही दिसून येईल–

परंतु संपादक महाराज, त्या कागदपत्रांची इथे चर्चा करण्यापेक्षा तो अहवालच मी आपणासाठी आणि आपल्या वाचकांसाठी पाठवून देत आहे.

स्थळ : समोरची खोली; वेळ : दु ३ वा.

कोरम फूल. नाना अध्यक्षांच्या खुर्चीवर, बाबा भाषण वाचायला उभे, आई पाटावर, मनी व बंड्या सतरंजीवर आडवे पडून पत्ते खेळीत आहेत.

**नाना :** ऑर्डर, ऑर्डर, तीन वाजून गेलेत. सभेचे कामकाज सुरू होत आहे. सभासदांनी लक्ष द्यावे.

**बंड्या :** अध्यक्ष महोदय, एक स्थगत प्रस्ताव. माझा आणि सन्माननीय सभासद कुमारी मनी यांचा चित्राच्या लॅडीसचा डाव नुकताच रंगात आला आहे. तो पूर्ण होईपर्यंत सभा तहकूब ठेवावी.

**मनी :** अध्यक्ष महोदय, माझा या स्थगत प्रस्तावाला पाठिंबा आहे. माझ्याकडे चांगला डाव आला आहे. (जीभ चावते.)

**आई :** बंड्या, मने, काय चावटपणा लावलाय रे. चल फेक बघू ते पत्ते. नाहीतर चलीतच घालते मी ते–

**बंड्या :** अध्यक्ष महाराज, अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद आमचा अवमान करीत आहेत, हा सत्तारूढ पक्षाचा नेहमीचाच दमदाटीचा पवित्रा आहे आपण आम्हाला संरक्षण द्यावे.

**मनी :** शिवाय अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद आपणाला उद्देशून बोलण्याऐवजी दुसऱ्याच सन्माननीय सभासदाशी बोलीत आहेत हे नियम बाह्य वर्तन आपण चालू देता कामा नये.

**आई :** इश्य हा कसला चावटपणा.

**मनी–बंड्या :** (एकदम) अध्यक्षमहोदय अध्यक्षमहोदय...पुन्हा तेच.

**नाना :** ऑर्डर, ऑर्डर हरकतीचा मुद्दा बरोबर आहे. सन्माननीय सभासदांनी एकमेकाला उद्देशून बोलू नये. आपणास जर स्थगिती नको असेल तर प्रस्तावाला रीतसर विरोध करावा.

**आई :** काय मेली चावट पोरे–बरं अध्यक्षमहाराज–मी या स्थगत प्रस्तावाला जोरदार विरोध करीत आहे.

**बाबा :** मीदेखील या प्रस्तावाला विरोध करीत आहे. त्याचबरोबर विरोधी पक्षीय सदस्य जे बेजबाबदार वर्तन करीत आहेत त्याचा मी निषेधही करीत आहे.

**नाना :** ठीक ! मीदेखील माझे मत प्रस्तावाच्या विरुद्ध देऊन प्रस्ताव नामंजूर झाला असे जाहीर करतो. विरोधी पक्षाच्या बेजबाबदार वर्तनाबद्दल मुख्यमंत्री, अर्थमंत्री उर्फ श्री. वसंतराव उर्फ बाबा यांनी जे उद्‌गार काढले त्याच्याशी मी सहमत आहे.

**मनी-बंड्या :** आ ऽऽ ना ऽऽ ना. तुम्ही पुन्हा बाजू घेतली–

**नाना :** ऑर्डर–ऑर्डर–सभेचे कामकाज चालू होत आहे.

अर्थमंत्र्यांचे भाषण.

**बाबा (अर्थमंत्री) :** अध्यक्षमहोदय, १९७१–७२ चा वार्षिक अर्थसंकल्प या

सभागृहाला सादर करताना मला आनंद होत आहे. आजची सभा जर नवीन सभा-गृहात भरली असती तर मला अधिक आनंद झाला असता. पण हौसिंग बोर्डाच्या घरासाठी अद्याप नंबर लागलेला नाही. अर्ज करून ठेवलेला आहे. पुढील वर्षी नंबर लागून आपले पुढचे अंदाजपत्रक मी नव्या जागेत सादर करू शकेन असा मला विश्वास वाटतो.

आई : ते नेहमीचंच आहे हो तुमचं—

बाबा : (अर्थमंत्री) अध्यक्षमहोदय, गेले वर्ष आर्थिक दृष्टया आपल्या राज्याच्या दृष्टीने बरेच घडामोडीचे गेले. उत्पन्नाचे काही मार्ग वाढले. पण त्याचबरोबर खर्चाच्या बाबीही वाढल्या. वाढत्या महागाईमुळे अनेक अंदाज चुकले. त्याचबरोबर खेळताना बंड्याचा पाय मोडणे, मनीने पुस्तके हरवणे, नानांच्या चष्म्याची काडी तुटणे, सौ. मंगलेच्या भावाने आपल्या बायकामुलांसह येऊन इथे सात दिवस मुक्काम ठोकणे—

आई : त्याचा उल्लेख कशाला हो ?

बाबा : वगैरेसारख्या आणिबाणीच्या प्रसंगात मागील वर्षीच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद नसतानाही बराच खर्च करावा लागला. त्यामुळे एकूण वर्षभराची तूट भलतीच वाढून पुन्हा कर्ज काढून सारे राज्य एका मोठ्या आर्थिक संकटात पडण्याचा धोका निर्माण झाला होता. पण ऐनवेळी श्री. वसंतराव यांचे (इथे बाबा आणि आई दोघेही हसले. नानांनी ऑर्डर, ऑर्डर केले नाही.) जुनी फगारातली सुमारे साडेतीनशे रुपयांची थकबाकी मिळाल्याने ही तूट बरीच कमी करता आली. अर्थसंकल्पात नमूद केलेली जी तूट होती त्यातला बराचसा भाग गृहमंत्र्यांच्या काट-कसरीमुळे भरून काढता आला हे नमूद करताना मला अभिमान वाटत आहे. (टाळ्या) वर्षाच्या शेवटी जी तूट राहिली ती किरकोळ आहे. थोडक्यात म्हणजे मागील वर्षात राज्यावरील कर्जाच्या बोज्यात मुळीच वाढ झाली नाही. श्री. वसंत-राव यांनी ऑफीसमधील कोऑपरेटीव सोसायटीकडून जे कर्ज घेतले आहे ते या वर्षाच्या शेवटापर्यंत संपूर्ण फिटून जाईल आणि त्या हप्त्यांचा पैसा इतर विधायक कार्यक्रमांसाठी उपलब्ध होईल. हा हप्ता कमी करून घ्यावा असा एक विचार राज्यात चालू होता. म्हणजे चालू खर्चासाठी थोडे अधिक पैसे मिळाले असते. पण त्यामुळे कर्जफेडीची मुदतही लांबली असती. म्हणून गृहमंत्री व अध्यक्षमहाराज यांच्या सल्ल्याने हा विचार सोडून देण्यात आला.

दर महिन्याच्या खर्चाला जी तूट पडते त्यासाठी दरवेळी हातउसने घेण्याची प्रथा अद्याप सुटत नाही. गेल्या वर्षाच्या दुरुस्त अंदाजपत्रकाकडे नजर टाकल्यास हात-उसने घेण्याची दरमहा रु. वीस एवढी सरासरी होते. याही वर्षी ही प्रथा बंद कर-ण्याचा आम्ही प्रयत्न करू. परंतु तो अयशस्वी झाल्यास पुन्हा अंदाजपत्रकात तूट नको म्हणून आम्ही यंदाच्याही अंदाजपत्रकात ती तरतूद करून ठेवीत आहोत.

यंदाच्या अर्थसंकल्पाचे वैशिष्टय म्हणजे उत्पन्नांच्या बाबतीत जशी वाढ झाली आहे. त्याच्या जास्त प्रमाणात खर्चांच्या बाबीमध्ये नानांचे पेन्शन दरमहा रु पाचने वाढले. तसेच त्यांचे प्रुफ तपासण्याचे कामही आता नियमित झाल्याने तेही उत्पन्न आता जमेत धरायला काही हरकत नाही. सौ. मंगलाने हलवा, लोणची मसाले वगैरे बनवून विकण्याचा जो प्रयोग सुरू केला होता त्या प्रयोगालाही गतवर्षी बरे यश मिळाले आहे हे नमूद केले पाहिजे. ही बाब आता तुटीची राहिली नसून उप्तन्नाची झालेली आहे असे सन्मानीय गृहमंत्री म्हणतात. त्याप्रमाणे या खाती जमेच्या बाजूने काही रक्कम मांडण्याच्या त्यांच्या सूचनेला मी होकार दिला आहे. परंतु मला अजूनही याबाबतीत शंका आहे.

**आई** : कसली शंका आहे हो. अध्यक्ष महाराज, सन्माननीय अर्थमंत्र्यांच्या या विधानाला मी आक्षेप घेते. मागील वर्षीच्या सुधारित अर्थसंकल्पाकडे नजर टाकली तर असे दिसून येईल की हलवा, लोणचे, मसाले यांच्या विक्रीपासून भांडवली खर्च वजा करता निव्वळ उत्पन्न ९५ रुपयांच्या वर झालेले आहे. प्रयोग यशस्वी झालेला आहे. आणि चालू अर्थसंकल्पीय वर्षात हा धंदा मोठ्या प्रमाणावर यशस्वी करून दाखविण्याचे आव्हान मी स्वीकारलेले आहे.

**बाबा** : गृहमंत्र्यांच्या भावना मी समजू शकतो. त्यांनी जर या बाबीतील उत्पन्न वाढविलेच तर त्याचा राज्याला फायदाच येईल. परंतु भरमसाठ उत्पन्न वाढेल असे गृहीत धरुन त्याप्रमाणे खर्चाच्या तरतुदी करीत गेलो तर अर्थकारणाला मोठाच धोका पोचतो. म्हणून उत्पन्नाच्या बाजू आपण सावधपणे मांडल्या पाहिजेत. तरीही मी या बाबीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात या अर्थसंकल्पात एक तृतीयांशाने वाढ दाखविली आहेच. सन्माननीय गृहमंत्र्यांच्या कर्तृत्वाविषयी कोणीच शंका घेत नाही. असो. १९७१–७२ चा एका दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प पुढीलप्रमाणे आहे–

| जमा | | खर्च | फरक |
|---|---|---|---|
| वसंतरावांचा पगार | रु. ३,४२०·०० | | |
| नानांचे पेन्शन | रु. ३६०·०० | | |
| प्रूफ तपासणी | रु. ४८०·०० | | |
| मंगलेचे उद्योग | रु. १२०.०० | | |
| | रु. ४,३८०·०० | रु. ५,३३०·५० | रु. ९५०·५० |

पगाराचा तपशील.

| | |
|---|---|
| मूळ पगार | रु. ३५०·०० |
| उणे | |
| कर्ज हप्ता | रु. २०·०० |
| विमा | रु. १३·०० |
| प्रॉव्हिडंट फंड | रु. २२·०० |
| क्रेडिट सोसायटी | रु. १०·०० |
| हाती येणारा पगार | रु. २८५ |

वरवर पाहता अर्थसंकल्पात ही जी रु. ९५०·५० ची तूट दिसते ती तेवढीशी गंभीर नाही. याची कारणे अनेक आहेत.

१. नानांना प्रुफे तपासण्याचे महिना रु. ४० ते ६० मिळतात पण ४० च्या खाली कधीच नाही. हिशेबाच्या सोयीसाठी कमीतकमी चाळीस रुपये महिना या दराने जमा दाखविली आहे. शिवाय प्रुफे तपासण्याचा मोबदलाही वाढण्याची दाट शक्यता आहे.

२, मंगलेने आपल्या उद्योगाचे उत्पन्न महिना रु. तीस पर्यंत वाढवून देण्याची हमी दिली आहे. पण ते अनिश्चित असल्याने हे उत्पन्न जमेच्या बाजूला महिना रु. १० या हिशेबाने दाखविले आहे.

३. श्री. वसंतरावांच्या पगाराचे उरलेले ॲरियर्स याही वर्षी मिळण्याची दाट शक्यता आहे.

४. मनीने यंदा स्कॉलरशिप मिळविण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

५. सौ. मंगलाने काटकसरीच्या योजना कडकपणे अंमलात आणण्यासंबंधीचे आदेश सर्वत्र प्रसृत केले आहेत.

खर्चाचे ढोबळ आकडे पुढीलप्रमाणे—

| | | |
|---|---|---|
| किराणा सामान—मासिक रु. १२५ प्रमाणे | रुपये | १,५००·०० |
| घर भाडे—मासिक रु. ३५ प्रमाणे | ,, | ७२०·०० |
| दूध—रोज ८५ पैसे अर्धा लिटर प्रमाणे | ,, | ३०९·०० |
| मुलांच्या शाळेचा खर्च, फी धरून | ,, | १५०·०० |
| भाजी—रोज ७५ पैसे प्रमाणे | ,, | २७०·०० |
| वसंतराव आणि मुलांचा पाकिट मनी | ,, | ३१२·०० |
| औषधे | ,, | ३६०·०० |
| रेल्वे पास | ,, | १३२·०० |
| मोलकरीण | ,, | ८४·०० |
| वीज भाडे सरासरी महिना रु. ४ प्रमाणे | ,, | ४८·०० |
| फळे व इतर खाणे-महिना रु. १० प्रमाणे | ,, | १२०·०० |
| मुलांचे युनिफॉर्मस—प्रत्येकी रु. ७५ | ,, | १५०·०० |
| आवश्यक कपडे सर्वांना | ,, | १८०·०० |
| पादत्राणे | ,, | ४०·५० |
| मुलांच्या शाळेच्या ट्रीप्स | ,, | ४०·०० |
| सिनेमा, हिंडणे वा इतर चैन | ,, | १२०·०० |
| इतर भांडवली खर्च | ,, | १००·०० |
| हात उसनेफेड—महिना २० प्रमाणे | ,, | २४०·०० |
| लॉटरी तिकीटे—महिन्याला दोन | ,, | २४·०० |
| | एकूण रु. | ५,३३०·५० |

काही विशेष खर्चांच्या आकडयांचा तपशील असा

| | | |
|---|---|---|
| १. पाकीट मनी दरमहा | वसंतराव | रु. २०·०० |
| | मनी | रु. ३·०० |
| | बंड्या | रु. ३·०० |
| | एकूण | रु. २६·०० |

**मनी-बंड्या** (घोषणा) : यंदा पाकीट मनी वाढवून मिळालाच पाहिजे. मिळालाच पाहिजे–

**नाना** : ऑर्डर, ऑर्डर, सभासदांना अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळी आपल्या मागण्या मांडता येतील. त्यांनी आता सभागृहात गोंधळ करू नये.

**बंड्या** : पण अध्यक्ष महोदय, महिना ३ रु. पाकीट मनी मुंबई सारख्या ठिकाणी कसा–

**नाना** : ऑर्डर ऑर्डर

**बाबा** : पैकी श्री. वसंतराव हे सिगरेटवरील खर्च कमी करून पाकीट मनीत बचत करायची आणि ती रक्कम राज्यातील विकासात्मक कामावर लावायची योजना करीत आहेत. विकासात्मक कार्यक्रमाचे पहिले लक्ष्य आहे रेडियो. या कार्यक्रमासाठी अंदाजपत्रकात कुठेही तरतूद करणे कसे अशक्य आहे हे अर्थसंकल्पावर नजर टाकल्यास दिसून येईल. असे.

| | | |
|---|---|---|
| २. औषधे–दरमहा | नाना (दमा व इतर) | रु. १५·०० |
| | मंगला व मुले (टॉनिक्स) | रु. १०·०० |
| | आणिबाणी | रु. ५·०० |
| | एकूण | रु. ३०·०० |

हंसा वाडकर यांचे आत्मकथन

सांगत्ये ऐका

सांगत्ये ऐका

मूल्य आठ रुपये

राजहंस प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| ३. आवश्यक कपडे | नाना-धोतर कुडते | रु. ४०.०० |
| | वसंतराव-दोन कॉटन मॅनीले | रु. ५०.०० |
| | सौ. मंगला-साडी, पोलके वगैरे | रु. ४०.०० |
| | मनी | रु. २५.०० |
| | बंड्या | रु. २५.०० |
| | एकूण | रु. १८०.०० |

त्या बाबतीत श्री. नाना व सौ. मंगला यांनी काही तरतुदींना जोराचा विरोध केला. परंतु सभागृहाला मी सांगू इच्छितो की या तरतुदी अत्यंत आवश्यक आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ४. पादत्राणे | नाना (चप्पल) | रु. | १२–०० |
| | वसंतराव (फूटपाथवरचे मोजे) | रु. | २–५० |
| | मनी व बंड्या (सँडल्स्) | रु. | १८–०० |
| | सौ. मंगला | रु. | ८–०० |
| | एकूण | रु. | ४०–५० |

अध्यक्षमहोदय, खरे म्हणजे किराणा सामानाच्या खर्चाचा तपशील देणे अत्यंत आवश्यक आहे. पण हा विषय अतिशय गुंतागुंतीचा असल्याने आणि तो संपूर्णपणे सन्माननीय गृहमंत्रीच सांभाळीत असल्याने त्याचा तपशील त्याच देतील. किराणा, तेल, तूप, स्टोव्हचे रॉकेल अ[illegible] एकूण खर्च महिन्याला रु. १२५ एवढा होतो. हा अगदी कमीत कमी खर्च होय. म्हणजे माणशी २५ रु. यापेक्षा कमी खर्च करणे शक्य नाही.

अध्यक्षमहोदय, या बाबीसंबंधी मला एवढेच नमूद करायचे आहे की मालांच्या किमती दिवसेंदिवस वेगाने वाढत असल्याने परिस्थिती अधिकाधिक बिकट होत जाईल. आणखी किमती वाढल्या तर इतर बाबींवरील खर्चात कपात करून तो खर्च इकडे वाढवावा लागेल असे दिसते. तेलाचे, तुपाचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत. ते कधी स्थिर होतील हे सांगता येत नाही, त्यामुळे परिस्थिती अशीच राहणार.

मुलांच्या ट्रीप्स्, नाटक, सिनेमा, हिंडणे वगैरे सांस्कृतिक बाबींसाठी या अर्थसंकल्पात तरतूद केली आहे खरी. पण त्या त्या वेळची परिस्थिती लक्षात घेऊन या खर्चांबाबत वेळोवेळी निर्णय घ्यावे लागतील. औषधे, अन्नधान्य, कपडे यासारख्या आवश्यक बाबींना जास्त पैसा लागला तर तो या सांस्कृतिक खात्यातूनच वळवावा लागेल.

**मनी-बंड्या** : शेम ऽऽ शेम ऽऽऽ

**बाबा** : शेम शेम करण्यात काहीच हरकत नाही. मध्येच खर्चही होतो हे सन्माननीय सभासदांना चांगले माहित आहे. मग हे आकांडतांडव कशाला ?

असो. अध्यक्षमहोदय, मला खेदाने हे नमूद करावे लागते की या अर्थसंकल्पात विकासात्मक अथवा सुधारणात्मक भांडवली खर्चासाठी काहीही तरतूद नाही. पण

**पृष्ठ ६२ वर**

१४ एप्रिल हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा ८० वा जयंतीदिन आहे.

# आधी केले मग सांगितले

नखशिखांत विलायती पेहराव केलेल्या देशी-विदेशी ‘साहेब’ लोकांच्या गर्दीने आगबोटीचा धक्का गजबजून गेलेला– हातात हार-तुऱ्यांच्या टोपल्या घेऊन उभी असलेली पट्टेवाली मंडळी देखील, घोटून दाढया केलेली आणि परीट घडीच्या कपड्यात सजून आलेली–

या सगळ्या दिमाखदार, झगमगीत आणि सुगंधी वातावरणातच एका कोपऱ्यात एक घोळका अंग चोरून उभा आहे. त्यातही काही माणसं, चक्क सांगली सातार-कडली कुणबाऊ दिसताहेत. तर काही लालबाग परळची कामगार मंडळी वाटताहेत. सगळ्या साहेब मंडळींच्या तुच्छतेच्या नजरा अंगावर झेलीत ही माणसं दूरवर समुद्रात नांगरून पडलेल्या विलायतेच्या बोटीकडं पाहताहेत. डोळ्यात प्राण आणून–

आणि हळूहळू विलायतेहून आलेली ती बोट, पाणी कापीत धक्क्याच्या दिशेनं येऊ लागली. भोंगे वाजू लागले. धावपळ गडबड सुरू झाली. त्या धावपळीतही घोळक्यामधली ती बापुडवाणी माणसं अधिकच अंग चोरून उभी होती. न जाणो गडबडीत आपला कुणाला तरी स्पर्श व्हायचा.

बघता बघता ती प्रचंड बोट धक्क्याला लागली. शिड्या, जीने, बोटीला भिडले. आणि बोटीवरचे उतारू धक्क्यावर उतरू लागले. हंसत मुखानं–उतरुन घ्यायला आलेल्या मंडळीकडं पाहून हर्षानं हात उंचावीत या उतारूंमधून एक मध्यम उंचीचा पण भव्य शरीराचा आणि उत्तम उनी सूट परिधान केलेला पुरुष गंभीर चेहऱ्यानं खाली उतरत होता. मुद्रेवर असामान्य बुद्धिमत्तेचं विलक्षण तेज झळाळत होतं. या पुरु-षाचं नाव होतं बाबासाहेब आंबेडकर––

विलायतेमधला आपला अभ्यासक्रम आटोपून बाबासाहेब मायदेशी परतत होते. त्यांना उतरवून घेण्यासाठी एल्फिन्स्टन कॉलेजमधील त्यांची मित्रमंडळीही आली होती. बाबासाहेबाना बघताच, त्यांनी हार तुरे सरसावले. पण बाबांनी हातानीच त्यांना ‘थांबा’ अशी खूण केली आणि अधिरतेनें ते त्या बापुडवाण्या घोळक्यात जाऊन मिसळले. कारण ती सगळी त्यांच्या घरची माणसं होती.

वडीलधाऱ्या मंडळींना बाबांनी तशा वेशातही वाकून नमस्कार केला, बंधू बाळाराम यांना कडकडून मिठी मारली. डोक्यावरचा पदर सारखा करीत बाबाच्या पायाला हात लावून त्यांच्या पत्नीनी जेव्हा त्यांना नमस्कार केला तेव्हा बाबाना भडभडून आलं. लहान लहान मुलांना उचलून बाबानी त्यांचे पटापट मुके घेतले.

सगळ्या सगळ्या सग्या-सोयऱ्यांना बाबा उराउरी भेटले आणि मग मित्र मंडळींच्या कडं वळले.

मित्रमंडळींनी त्यांना घरी पोचविण्यासाठी टॅक्सीची व्यवस्था केली होती. आणि घरच्या लोकांनाही वाटलं, 'येवढा साता समिंदरा पलीकडून बाबा दमून आला. तो आपल्या बरोबर रखडत कुठं येईल. त्यानी टॅक्सीनचं जावं'

पण बाबानी घरच्याना रिचारलं, 'तुम्ही सगळे कसे येणार?'

बाळाराम म्हणाले,

'आम्ही बोरीबंदरपर्यंत चालत जाऊ. तिथून आगिन गाडीनं परळला उतरूं'

"मग मीही तुमच्या बरोबरच, तुमच्या सारखाच येणार'

बाळारामाचा नाइलाच झाला. सगळे चालत बोरीबंदरवर आले. तेथेही घरच्याना वाटलं, 'बाबा येवढा मोठा साहेब होऊन आला. त्यानी आपल्या बरोबर तिसऱ्या वर्गाच्या गर्दीतून कसं यावं?' बाळाराम पहिल्या वर्गाच्या तिकिटाच्या खिडकीकडं धावले. बाबानी ते ताडलं, आणि त्यांना हटकून सर्वांचीच तिसऱ्या वर्गाची तिकिटं काढायला लावली. सर्वांच्या बरोबरच तिसऱ्या वर्गातून बाबा परळपर्यंत आले.

चाळीतल्या बिऱ्हाडात गेल्यावरही, कुणाच्यातरी घरून मागून आणलेल्या खुर्चीवर बसायला बाबानी साफ नकार दिला. खुर्ची परत करायला लावली आणि सगळ्यांच्या बरोबर ते कांबळ्यांवर बसले.

सामाजिक समतेच्या या महान् प्रणेत्यानं समतेचा संदेश सर्वाआधी स्वतःच्याच अंगी असा बाणवून घेतला होता. अगदी सहजपणानं. पाण्यात पाणी मिसळावं तितक्या सहजपणानं...

◻ ◻ ◻

---


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे दर

| | | | |
|---|---|---|---|
| पाच वर्षे : | १००–०० | वार्षिक : | २५–०० |
| तीन वर्षे : | ६०–०० | सहामाही : | १५–०० |
| दोन वर्षे : | ४५–०० | वार्षिक (परदेशी जलमार्गे) : | ४५–०० |

◻ २२ ऑगस्ट १९७० नंतरच्या वर्गणीदारांनी रुपये तीस वार्षिक वर्गणी पाठविली आहे त्यांची वर्गणीची मुदत तीन महिन्यांनी वाढवून घेतलेली असून त्याप्रमाणे नोंदवहीत फेरबदल करण्याचे काम चालू आहे.

◻ नवीन वर्गणीची रक्कम शक्यतो ड्राफ्ट वा म. ऑ. ने पाठवावी. कार्यालयात रोख भरणा करण्यासही हरकत नाही. चेकनेच रक्कम पाठविणे सोयीचे वाटल्यास बँक कमिशन एक रूपया अधिक हिशोबी धरावे

◻ चेक, ड्राफ्ट 'साप्ताहिक माणूस' या नावावर पाठवावा.

◻ पत्रव्यवहार करताना आपला वर्गणीदार क्रमांक शक्यतो कळवावा.


---

# मराठवाड्याची हालहवाल

**देवदत्त तुंगार**

## यंत्रमाग प्रकल्प

मराठवाडा विकास महामंडळातर्फे नांदेडपासून सुमारे ५ किलोमीटर अंतरावर यंत्रमाग प्रकल्प उभारण्यात येत असून त्यासंबंधी ओझरता उल्लेख माझ्या एका वार्तापत्रात केला होता. सदर प्रकल्पाच्या इमारतीचा कोनशिला समारंभ राज्यपाल श्री. अलियावर जंग, ना. शंकरराव चव्हाण, ना. राजाराम बापू पाटील आदींच्या उपस्थितीत गेल्या महिन्यात पार पडला.

मराठवाडा विभाग महाराष्ट्राचा अविकसित प्रदेश असून प्रादेशिक विकासाचा समतोल साधण्यासाठी या भागाचा जलद विकास घडवून आणण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्नांची आवश्यकता आहे. मराठवाडा विकास महामंडळ या दिशेने प्रयत्नशील आहे. खनिज संपत्तीचा मराठवाड्यात तुटवडा असल्याने उपलब्ध साधन संपत्तीवर आधारलेले उद्योगधंदेच यशस्वी होऊ शकतील. कापड उद्योग, दुग्धोत्पादन, तेलबिया प्रक्रिया, चामडी कमावणे व त्यावर प्रक्रिया करणे असे उद्योगच मराठवाड्यात 'चालू' शकतात. विकास महामंडळाने जी यंत्रमाग योजना आखली आहे, तिची रूपरेषा अशी–योजनेचे मोठ्या प्रमाणावरील व छोट्या प्रमाणावरील असे दोन विभाग असून मोठ्या प्रमाणावरील उद्योगात विणकामापूर्वीचें युनिट व प्रक्रिया युनिट हे दोन युनिट असून ते टेक्स्टाइल कार्पोरेशन ऑफ मराठवाडा या कंपनीच्या मालकीचे आहेत. कंपनीमार्फतच त्यांचे व्यवस्थापन होईल.

छोट्या प्रमाणावरील उद्योगात प्रत्येकी ९६ यंत्रमाग असलेल्या २४ यंत्रमाग सहकारी संस्थामार्फत काम केले जाईल. इंडस्ट्रीअल बँक ऑफ इंडियाने ४० लक्ष रु. चे इक्विटी व ३० लक्ष रु. चे प्रिफरन्स भाग भांडवल महामंडळास देणार असल्याचा करार केला आहे. २३३ लक्ष रु. कर्जही मिळणार आहे. यंत्रमाग सहकारी संस्था रजिस्टर्ड झाल्या असून नांदेड, वसमत, मानवत, जालना येथील संस्थांच्या 'शेड'चे बांधकाम एप्रिल अखेर पूर्ण होणार आहे. प्रिविव्हींग व प्रोसेसिंग युनिट-साठी लागणारी यंत्रसामुग्री खरेदी करण्याची ऑर्डर देण्यात आली असून १ कोटी ५१ लक्ष रु. त्यासाठी लागणार आहेत. आक्टोबर १९७१ च्या सुमारास प्रत्यक्ष

उत्पादन कार्य सुरू होईल.

जनावरांच्या नव्या जाती आणून उत्पादन क्षमता वाढवून दूध योजना राबविली जाणार आहे. याखेरीज महामंडळाने शेंगदाण्यापासून प्रथिने अलग करण्याचा अभ्यास केला आहे. कातडी कमावण्याच्या उद्योगाची पाहणीही करण्यात आली आहे.

मराठवाड्यातील लोकांना रोजगार मिळवून देऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी विकासमंडळ प्रयत्नशील असून यंत्रमाग प्रकल्पाच्या कोनशिला समारंभाने औद्योगिक विकासाचे नवे पर्व सुरू झाले आहे असे म्हणता येईल. याप्रसंगी उद्योगमंत्री ना. राजाराम बापू पाटील यांनी, औद्योगिक विकासासाठी राज्य वित्तीय मंडळाचे कार्यकारी संचालक श्री. पळणीटकर यांनी सर्व प्रकारचे साहाय्य द्यावे अशी मुक्त परवानगी दिली आहे. त्याचा उल्लेख करून पद्मश्री शामराव कदम यांनी मराठवाड्यास मिळालेला हा कोरा चेक आहे असे सांगितले.

यंत्रमाग प्रकल्पाच्या उभारणीसाठी सर्वश्री पळणीटकर, व्यंकटेशन्, आगाशे, जयंत देशपांडे व इतर अधिकाऱ्यांनी विशेष आस्था दाखविली.

## विद्यापीठे व सामाजिक गरजा

मराठवाडा विद्यापीठाचा तेरावा वार्षिक अहवाल विद्यापीठ विधीसभेला सादर करण्यात आला. विधीसभेने सोयगाव, औसा, गेवराई, माजलगाव, वसमतनगर, औरंगाबाद, नांदेड, नळदुर्ग येथे प्रत्येकी एक व बीड येथे दोन कॉलेजे उघडण्याची परवानगी दिली. लातूर येथे लॉ कॉलेज काढण्याची परवानगी देण्यात आली. परभणी व देगलूर येथे नवी महाविद्यालये काढण्यास परवानगी नाकारण्यात आली.

सर्वश्री के. र. शिरवाडकर, बा. न. मग्गीरवार, प्राचार्य म. भि. चिटणीस इत्यादींनी चर्चेमध्ये महत्वाचे मुद्दे मांडले. श्री. नरेंद्र चपळगावकर यांनी उत्पादनास उपयोगी पडू शकणारे संशोधन व उपयुक्त पाहणी यांना प्राधान्य द्यावे, मूलभूत संशोधनाच्या नावाखाली फक्त वर्गीकरण, संकलनसारख्या कारकुनी कामाला महत्त्व देऊ नये असे सांगितले.

मराठवाड्यातील कॉलेजांची संख्या गेल्यावर्षी ४१ वरून ५२ पर्यंत वाढली. विद्यार्थीसंख्या २८३१० वरून ३६५५८ वर गेली. या विद्यार्थ्यांत मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण २० टक्के आहे हे उल्लेखनीय म्हणावे लागेल. पदव्युतर वर्गात हे प्रमाण २५ टक्के आहे. याचाही उल्लेख केला पाहिजे. नांदेड येथे मराठवाडा विद्यापीठाचे एक उपकेंद्र स्थापन करण्यास विद्यापीठ कार्यकारिणीने मान्यता दिली आहे ही बाब नांदेडकरांना विशेष समाधानाची वाटेल. उपकेंद्राबद्दल ' माणूस 'च्या वार्तापत्रात पूर्वी मी विवेचन केले होतेच.

## संशोधनाला सुपीक भूमी

मराठवाडा ही संताची भुमी. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास इथलेच. संतभूमी म्हणून मराठवाड्याची ख्याती आहे. मराठी संस्कृती आणि साहित्य याचे आद्य-स्थान असणाऱ्या या विभागाच्या संशोधनाकडे अपेक्षित लक्ष मात्र देण्यात आलेले दिसत नाही. केवळ महाराष्ट्रीय संस्कृतीचाच हा मूळ स्त्रोत नसून हजारो वर्षा-पूर्वीच्या मानवी संस्कृतीच्या अभ्यासाची सामुग्री येथे उपलब्ध होऊ शकते. यादृष्टीने पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधील संशोधक डॉ. के. सी. मलहोत्रा यांनी पत्रकारास दिलेली मुलाखत महत्वाची आहे. धनगर समाजासंबंधी श्री. मलहोत्रा संशोधन करीत असून औरंगाबादला ते येऊन गेले. त्यांनी पत्रकारांना सांगितलेल्या माहिती-वरून ५० हजार वर्षापूर्वीची हत्यारे आणि 'साहित्य' मराठवाड्यातील हरसूल (जिल्हा औरंगाबाद) व देगलूर (जिल्हा नांदेड) येथे उपलब्ध झाले आहे.

हरसूलजवळ मध्य अश्मयुगकालीन दगडी हत्यारांचा साठा सापडला असून सुमारे ५० हजार वर्षापूर्वीचा मानव ती हत्यारे वापरीत असावा. देगलूर येथेही वीस हजार वर्षापूर्वी वापरात आलेल्या वस्तु उपलब्ध झाल्या आहेत. यासंबंधी अधिक सखोल संशोधन झाले पाहिजे. ५० हजार वर्षापूर्वीचा मानव भटक्या वृत्तीचा असावा. अग्नीचा शोध लागलेला नसावा. कंदमुळे, मास यावरच तो आपली गुजराण करीत असावा, त्यासाठी दगडी हत्यारांचा वापर होत असावा. कुऱ्हाड, करवतीसारखी दाते असलेली धार, बाणाच्या टोकाला लावता येतील असे अर्ध-चंद्राकृती दगड इत्यादि वस्तु उपलब्ध झाल्या असून त्यावरून तत्कालीन 'जीवनाची' कल्पना करता येते. भारताची खोदकाम कला पाश्चात्यांपेक्षा अधिक प्राचीन असावी असाही अंदाज आहे.

हरसूल व देगलूरच्या परिसरात उत्खनन व संशोधन केल्यास प्राचीन काळातील मानवी जीवनावर अधिक प्रकाश पडू शकेल. आंध्र प्रदेशात तसेच नगर जिल्ह्यातील ढवळपूरी येथे सापडलेल्या 'दगडा'पेक्षा हरसूल येथील दगडी हत्यारे अधिक प्राचीन असावीत असे अनुमान आहे. संशोधनाला मराठवाडा ही सुपीक भूमी आहे असे साधार म्हणता येईल.

## नांदेडच्या आयुर्वेद कॉलेजचा प्रश्न

नांदेड येथे सरकारी आयुर्वेद कॉलेज आहे. मिश्र आयुर्वेदाचा अभ्यासक्रम सर-कारने बंद केला असून नांदेडला गुरू नानक फौंडेशनतर्फे एक मेडिकल कॉलेज

पृष्ठ ५२ वर

रवींद्र पिंगे

# महानगर कलकत्ता

## एक झलक

शहाण्या माणसाने कलकत्त्याच्या नादी लागू नये. सावध माणसाने कलकत्त्याची दिशाच वर्ज करावी. ज्याला शांत झोपेचं सुख अंगी लावून घ्यायचं आहे त्याने हिंदुस्थानाच्या डाव्या बरगडीवर कलकत्ता नावाचं ठणकणारं गळू टरारून उठलं आहे हे चक्क विसरावं.

हा झाला हितोपदेश. तो विसरा.

मी ढीग सांगेन की कलकत्ता विसरा. पण कलकत्त्याला कसं विसरायचं? कलकत्ता म्हणजे कालीमाता. कलकत्ता म्हणजे कलींगडाच्या गार रसासारख्या गोड गळ्याची काननबाला. कलकत्ता म्हणजे छापील पुस्तकाबद्दल कुतूहल जागृत झालेला द्रष्टा राजा राममोहन राय. कलकत्ता म्हणजे स्वामी विवेकानंद; शरद बाबू. कलकत्ता म्हणजे सिनेमेवाले. कलकत्ता म्हणजे बेचाळीसच्या दुष्काळातले लाख लाख भूकबळी. कलकत्ता म्हणजे हत्यारबंद नक्षलवादी.

ह्या साऱ्या आप्तांचं आमंत्रण विसरायचं? अशक्य.

तरीसुद्धा आज जाऊ, उद्या जाऊ, परवा निघू असं करीत राहिलो. काळाची वाळू पायाखालून सरकताना जाणवली तरीही बेत पुढे पुढे ढकलत राहिलो. झोपा काढीत राहिलो. नि एके दिवशी खाडकन् जागा झालो! कलकत्त्याहून आलेल्या पत्रात तिथल्या मराठी मित्राने लिहीलं होतं,

"पुन्हा एकदा विचार कर. कलकत्त्यात येणं म्हणजे जीव धोक्यात घालणं आहे.

पण घाल. कारण इथलं वातावरण इतकं स्फोटक आहे की एक दिवस सबंध पश्चिम बंगाल भारतापासून अलग पडलेला दिसेल. तो दिवस फार दूर नाही. कदाचित येत्या सहा महिन्यात उरलेल्या भारतातून कलकत्त्यात येणाऱ्या माणसाला पासपोर्ट काढून नंतर इथे यावं लागेल. मग पस्तावशील."

असं होईल ? देशभक्तांच्या भूमीत असं घडेल ?

मनाचा निर्णय होईना. दिवस फिरले आहेत; फिरत आहेत ह्याचं भान आलं. उठलो नि तडक कलकत्त्याच्या दिशेने निघालो.

तिसऱ्या वर्गाचा सगळा डबा बंगाली माणसांनी फुललेला आहे. सर्वांच्या चेहेऱ्याची ठेवण जवळपास सारखी आहे. गालाची हाडं वर आलेली आहेत. नाकं थोडी चपटी आहेत. बायकांचे गाल पुऱ्यांसारखे फुगीर आहेत. डोळे गरगरीत आहेत. मागे एकदा कवी शंकर वैद्य म्हणाला होता, "तू बारकाईने बघ; बंगाल्यांचे चेहेरे चिनी घाटाचे आहेत." तेव्हा पटलं नव्हतं. आज पटलं. डब्यातले अधिकांश चेहेरे मंगोलियन आणि चिनी तोंडावळ्यांनी खासगीतलं नाते सांगणारे आहेत. ते सगळे आपापल्यातच दंग आहेत. काहीजण तोंडं उघडी टाकून पेंगत आहेत. मी एकटा अलग पडलो आहे. डब्यात फक्त बंगाली शब्दच ऐकू येतात. इंग्रजी किंवा हिंदी शब्द कटाक्षाने कटाप केल्यासारखं वातावरण आहे. आश्चर्य म्हणजे गाडीबरोबर असणारे रेल्वेचे नोकरही बंगालीतूनच बोलत आहेत. मी अगदी अलग पडलो आहे. कुणाचंही माझ्याकडे लक्ष नाही. मला वाटतं, कलकत्ता मेलचा तिसऱ्या वर्गाचा डबा हेच महानगर कलकत्त्याचं प्रवेशद्वार आहे !

हे पावसाळ्याचे दिवस नव्हेत. तरीही बाहेर तुफान पाऊस पडत आहे. सारी सृष्टी ओली चिंब झाली आहे.

भूक ही काय विलक्षण चीज आहे ! आमच्या गाडीच्या रेस्टॉरंटकारभोवती प्रत्येक स्टेशनावर मुलं जमतात. उष्टचा अन्नाचे तुकडे मागतात. डोंगरगढ स्टेशनवर पाच सहा कंगाल पोरांचा घोळका अन्नासाठी आला. उष्टं मागू लागला. गाडीबरोबरचा एक वेटर खाली उतरला. त्या पोरांच्या चड्डयांचे खिसे चाचपू लागला. एक-दोघांच्या खिशांत दातवणाच्या पाच सहा काडया मिळाल्या. वेटरने त्या चक्क आपल्या खिशात घातल्या ! पुन्हा एकदा सर्वांचे खिसे चाचपले. आणखी काही मिळालं नाही. मग वेटर गाडीत आला आणि त्याने त्या पोरांच्या झोळीत अक्षरशः पाटीभर उष्टंखरकटं ओतलं. आम्ही गबर प्रवाश्यांनी खारट-तुरट लागतं म्हणून अर्धवट खाऊन टाकलेलं अन्न त्या लहान लहान मुलांनी आमच्यासमोरच बकाबका फस्त केलं. त्यातलं थोडसं उष्टखरकटं प्लॅटफॉर्मवरच्या मातीत पडलं. एका मुलाने ते गोळा करून एका कुत्र्याला चारलं. शेपूट आनंदाने नाचवीत कुत्र्याने त्याचा क्षणात चट्टामट्टा केला. तो दातवणमारू वेटर दुसऱ्या एका वेटरला आनंदाने सांगत होता, "उद्या सकाळी ह्याच काडया प्रवाश्यांना दहा दहा पैशांना एक म्हणून

विकेन !" प्लॅटफॉर्मवर पडलेली शितं, साखरेचे दाणे, ब्रेडचे तुकडे, भिकारी पटापट उचलतात नि तसेच्या तसे तोंडात टाकतात. माती झटकण्याइतकीही उसंत पोटातला भुकेचा डोंब त्यांना घेऊ देत नाही काय ? एक कुत्रं पत्रावळी चाटत होतं. बाजूच्या बकरीला ते पाहावलं नाही. शिंग उगारून तिने कुत्र्याला हटवलं आणि पत्रावळ चटाचट चाटली. कुत्रं घाबरून पळालं.

स्टेशनाच्या आवारात दगडी कोळशांच्या मोठमोठ्या राशी साठवलेल्या आहेत. 'कोळसा वाचवा' अशा पाट्याही लावल्या आहेत. अशाच एका पाटीमागच्या कोळशाच्या राशीवर एक रेल्वे कर्मचारी चढला आणि त्या राशीतली एक मोठी ढेप उचलून ती त्याने रेल्वेच्या आवाराच्या भिंताडावरून पलीकडे भिरकावून दिली. आवारापलीकडे रेल्वेकर्मचाऱ्यांची वसाहत दिसत होती. ती कोळशाची ढेप त्या कर्मचाऱ्याच्या अंगणात पडली असणार हे उघडच आहे. आता थोड्या वेळाने त्याची चूल पेटेल. भूक ही अशी चीज आहे !

ठोस वेचाळीस कल्लाक धडाक्याने धावून गाडीने बंगालमध्ये प्रवेश केला तेव्हा मखमली परिसर पाहून डोळें निवले. दोन्ही बाजूला पहावं तिथे हिरवीगार शेती होती आणि उदंड पाणी. केळीच्या बागा, बांबूची फडफडती बनं, नारळींची आगरं आणि भाताची खाचरं पाहून मंगेशी—मडगांवच्या परीसरात आल्यासारखं वाटलं. जिकडे तिकडे लहान लहान तळी आहेत. तळ्यात कमळांची जाळी पसरलेली आहे. प्रत्येक तळ्यात बदकांच्या टोळ्या संथ पोहत आहेत. मासे धरण्याचे वेताचे चौकोनी पिंजरे जिकडे तिकडे तळ्यात बुडवून ठेवलेले दिसले. कोकणातले देवळांचे कळस आणि बांबूचे साकव तेवढे मात्र कुठेच दिसत नाहीत. घरंही सगळी कोकणी पद्धतीची, म्हणजे धाव्याचीच आहेत. माझ्या हातात भारत सरकारने प्रसिद्ध केलेलं प्रवासी-गाईड आहे. त्यात लिहिलं आहे. "वेदांमध्ये वंगभूमीचा उल्लेख नाही." इतका नंदनवनासारखा भासणारा मनोहारी सुंदर भूप्रदेश वेदात उल्लेखिलेला नाही हे कसं शक्य आहे ? वेदकाळात बंगाल भारतात समाविष्ट झालेला नव्हता ? भारतीय नभोवितानाच्या कक्षेत धरित्रीचा हा हरितगर्भ तुकडा पुराणकाळात समाविष्ट झालेला नव्हता ?

कलकत्ता येणार म्हणून डब्यातले स्त्री-पुरुष सामानसुमान आवरून कपडेलत्ते घालून पहाटेपासूनच बसले आहेत. मी त्यांच्या खिजगणतीतही नाही. शेवटी कंटाळून मीच शेजारच्या प्रवाशाला विचारलं, "आपलं नांव ?" "कॉर्मकॉर" पुढे एक नाही की दोन नाही ! माझ्याबद्दल त्याला काहीच कर्तव्य दिसलं नाही. मीच पुन्हा ढुशी मारली, "मी बंगाल पहायला चाललोय." तो खिन्नपणे म्हणाला, "जरूर पहा, आमचा देश घायाळ आहे. इतिहासात बंगालचे फक्त लचकेच तोडण्यात आले. वंगभंगाच्या वेळेपासून हा खेळ चालू आहे. एके काळी सगळ्या हिंदुस्थानात आकाराने मोठा प्रांत आमचा बंगालच होता. आता एवढासा झाला आहे !

बंगालने सगळ्या हिंदुस्थानासाठी रक्त दिलं. इतरांनी बंगालला काय दिलं ? नौखालीत आमच्या सव्वा लाख आयाबहिणींना नागवं केलं, तेव्हा आलं का कुणी त्यांच्या मदतीला ?"

गृहप्रवेशालाच उंबरठ्यावर ठेच लागावी, तसं काही तरी झालं. म्हणजे मी, केवळ निरुत्तर झालो नाही, तर तिरमिरलो. कलकत्त्याचा पहिला दणका जाणवला. दूर क्षितिजावर हौरा ब्रीज दिसू लागल्यावर प्रवाश्यांनी खिडक्यात गर्दी केली. कलकत्त्याचं दूरदर्शन अशक्य झालं.

हौरा स्टेशन प्रचंड वाटलं. स्टेशनावरचा सारा कारभार बिहारी भैय्यांच्या ताब्यात असल्यासारखा वाटला. स्टेशनातले हमाल भैय्ये होते. तिकीटबाबू भैय्ये होते. रस्त्यावरचे पोलीस भैय्ये होते. रिक्षा ओढणारे भैय्ये होते. फेरीवाले भैय्ये होते. बस कंडक्टर भैय्ये होते. ट्रॅम ड्रायव्हर्स भैय्ये होते. चहावालेही भैय्येच होते. पहावं तिथें बिहारी भैय्यें होते. मग बंगालीबाबू कुठे आहेत ?

"हेच बंगाल्यांचं खरं दुखणं आहे ! कलकत्त्यातले शरीरश्रमाचे जेवढे म्हणून व्यवसाय आहेत ते सगळे बिहारी लोकांनी बळकावलेले आहेत. कारण बंगाली माणसाला श्रम नकोत. बंगाली माणूस कधीं रिक्षा ओढणार नाही. तो फक्त कारकूनी करू शकेल. बिहाऱ्यांचं नेमकं उलट आहे. कष्टाळू शरीर हे भैय्यांचं भांडवल. शिवाय अगदी मामुली मजुरीत बिहारी श्रमिक लागेल तितकं काम, लागेल तितका वेळ करू शकतो. त्यामुळें कलकत्त्याला पाऊण रोजगार बिहाऱ्यांच्या खिशात जातो. ह्याचा सामाजिक परिणाम असा की बंगाल्यांचा आणि बिहाऱ्यांचा छत्तीसाचा आकडा आहे. इतरत्र जातीय दंगली होतात. कलकत्त्यात प्रांतीय दंगली होतात. बंगाल्यांची आणि बिहाऱ्यांची पंगत होऊ शकत नाही." टॅक्सीत कलकत्त्याचे एक मित्र मला बंगालचा परिचय करून देताना सांगत होते.

हाजरा मार्गावरलं "महाराष्ट्र–निवास" पाहून मन एकदम प्रसन्न झालं. [नवी कोरी इमारत, लखपक स्वच्छता, अगत्यशील घरगुती वातावरण आणि गरिबांनाही सहज परवडतील असे कमालीचे स्वस्त दर, ह्यामुळे कलकत्त्यात येणाऱ्या मराठी माणसाला "महाराष्ट्र–निवासा"च्या रूपाने एक हक्काचं घरच उपलब्ध झालं आहे.

" कलकत्त्यात आम्ही साडेतीन हजार मराठी माणसं आहोत. पूर्वी जास्त होतो. पण सध्याच्या अस्थिरतेमुळे एकेकाने काढता पाय घेतला आहे. मात्र आहेत ते सर्व साडेतीन हजार जीव एकमेकांना सांभाळून आहेत. आम्ही सगळे एकोप्याने वागतो." निवासातला एक कायम रहिवाशी सांगत होता.

"इथल्या मराठी माणसांची आर्थिक परिस्थिती कशी आहे ?"

"एक जात सुखवस्तू आहेत. एक तर सरकारीं अधिकारी किंवा बड्या कंपन्यांचे अंमलदार इकडे बदलून येतात. त्यांचे पगार चार आकड्याचे किंवा त्याच्या

अगदी जवळपास असतात. दरमहा सात-आठशे रुपयांपेक्षा कमी आवक असलेला कारकून माणूस सहसा कलकत्यासारख्या दूरच्या गावी येत नाही. क्वचित पोस्टातून किंवा रेल्वेतून असा एखादा किरकोळ कमाईवाला माणूस येतोही. पण तो ताबडतोब बदली करवून घेऊन परत जातो. इथले मराठी लोक म्हणजे ऑफीसर्स किंवा सेल्समेन, इंजिनिअर्स, टेक्निशियन्स. सर्व कलकत्याचा व्यापारउदीम फक्त मारवाड्यांच्या हातात आहे. इथल्या बहुतेक कंपन्या मारवाड्यांच्या आहेत आणि मारवाडी मालक मराठी अधिकारी नेमतात, कारण मराठी माणूस पैसा खाणार नाही ह्याची त्याला बालंबाल खात्री असते ! म्हणून ह्या कलकत्यातलं मराठी जग हे सुखवस्तु अधिकाऱ्यांचं जग आहे. बहुतेकांच्या घरी फोन, फ्रीज आणि गाडी आहे. ज्यांच्याकडे नाही, तही पैशाने सुखीच आहेत. पण बदलीवर असल्यामुळे ते आपला पसारा वाढवीत नाहीत. "

" खाजगी व्यवसाय करणारे कोणी मराठी आहेत ?

" सात–आठ असतील. दोन डॉक्टर्स आहेत. एकाचं चष्म्याचं दुकान आहे. एक रंगाचे व्यापारी आहेत. एक व्यापारी प्रतिनिधी आहेत. आणखी एकदोन असेच असतील. "

" मराठी माणसं इथल्या राजकारणात भाग घेतात ?"

" तो विषयच काढू नका ! आम्ही सगळेजण ह्या बंगाल्यांच्या राजकारणाला विटलो आहोत. इथलं राजकारण म्हणजे गुद्दागुद्दी किंवा सुरामारी. तुम्ही कालीघाट रस्त्यावरून एक फेरी मारून या म्हणजे गुंडमिरी काय ते तुम्हाला कळेल."

" बंगाली माणसं तुम्हा मराठी माणसांशी इथे प्रेमाने वागतात ?"

" बंगाली हा दुसऱ्याशी प्रेमाने वागणारा माणूस नाही. त्याचं काम असलं की गोडगोड वागतात. काम संपलं की ते तुम्हाला विसरतात. बंगाली माणूस विलक्षण आळशी आणि स्वतःच्या आणि बंगालच्या पलीकडे न पहाणारा आहे. किंबहुना इथल्या मराठी माणसांच्या सुखवस्तूपणाचा तो मनातल्या मनात द्वेष करतो. मराठी माणसं परत जाण्याची तें वाट बघत आहेत "

" इथे जागा वगैरे मिळतात ?"

" अडीचशे–तीनशे रुपये देण्याची तयारी असेल, तर लवकर मिळतात. सर्व मराठी माणसं कालीघाट रस्त्याच्या आजूबाजूला रहातात. हा ' महाराष्ट्र–निवास ' ही ह्याच परिसरात आहे. त्यामुळे बहुतेक सर्वांचा ' निवासा 'शी संपर्क असतो. इथे खेळ, गाणी, उत्सव, नाटकं, नकला सतत चालू असतात. तसे आम्ही इथे एकमेकांना बांधलेले आहोत. अर्थात इथल्या जीवनातली भीती हे त्याचं एक प्रमुख कारण आहेच. "

" इथल्या मराठी लोकांची कोऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी आहे ?"

" कलकत्ता एरव्ही फार सुंदर शहर असल्यामुळे इथे अनेकांनी सहकारी

सोसायट्यांतून गाळे घेतले होते. अनेकांनी तर कलकत्त्यातच कायम वस्ती करायची ठरवून मालकी हक्कानेही गाळे घेतले होते. पण गेली तीन वर्षं इथलं जीवन घसरगुंडीलाच लागलेलं आहे. केव्हा, कुठे, काय होईल सांगवत नाही. तशात, मराठी लोकांच्या विरुद्धही भावना जोर करायला लागली. काही लोकांना तर 'बंगाल सोडा' म्हणून म्हणू लागले. तेव्हा आता यापुढे काही खरं नाही असं मनातल्या मनात ओळखून इथल्या एकजात सर्व मंडळींनी आपापले गाळे येतील त्या पैशांना विकून टाकले! सध्या सर्वांचं बिऱ्हाड पाठीवर आहे. कलकत्त्यात स्थायिक होण्याची गोष्ट कुणीच करीत नाहीत. मला वाटतं अपवाद फक्त क्रिकेटपटु दत्ता फडकरांचा आहे. त्यांचं अलीपूरात घर आहे असे मी ऐकलंय. खरं खोटं देव जाणे! पण असेलच तर ते कलकत्त्यातले एकमेव स्थायिक मराठी असतील! बाकीच्यांचा एक पाय मुंबई, पुणं किंवा नागपूरमध्ये आहेच म्हणून समजा."

कलकत्त्यातल्या मराठी माणसाची ही पिछेहाट ऐकून मन कष्टी झालं. ह्यावर उपाय काय ते शोधण्यासाठी कलकत्त्याच्या नॅशनल लायब्ररीतल्या मराठी विभागाचे प्रमुख आणि मराठी नियतकालिकांचे लेखक श्री. बा. जोशी ह्यांच्याकडे विषय काढला,

"काय हो जोशी, इथल्या मराठी माणसांचा कसा काय निभाव लागणार बुवा?"

"इथल्या मराठी माणसांबद्दल प्रेमाने बोलावं असं फार थोडं आहे!"

"का?"

"कारण कलकत्तेवाली मराठी मंडळी बंगाल्यांशी फार तेढीने वागतात. कधी



त्यांच्याशी समरस होत नाहीत. आपला वेगळा सुभा सांभाळीत बसतात. त्यांच्या-इतक्या संस्था आहेत, इतके उत्सव आहेत, पण कधी आम्ही त्यांच्यात मिसळत नाही. त्यांची भाषा शिकण्याचा हेतूपूर्वक प्रयत्न करीत नाही. आपल्याला त्यांच्या-विषयी आस्था वाटत नाही."

"बंगाली माणसांना मराठी माणसांबद्दल वाटते ?"

"जरूर वाटते. इथल्या एका जादवपूर विद्यापीठात मराठ्यांच्या इतिहासावर जितके संशोधक अभ्यास करीत आहेत, तितके मराठ्यांच्या इतिहासावर संशोधन करणारे अभ्यासक महाराष्ट्रातल्या पाचही विद्यापीठात मिळून सापडणार नाहीत ! सर जदुनाथ सरकारांनी मराठी इतिहासाचं केवढं प्रचंड काम करून ठेवलंय ?"

"विद्या ोठवाल्यांचं सोडा हो ! तो त्यांचा धंदाच असतो."

"धंदा नव्हे, प्रेमाने मराठी माणसांकडे आणि मराठी साहित्याकडे पाहाणारे अनेक बंगाली आहेत आणि होऊनही गेले."

"उदाहरणार्थ ?"

"उदाहरण रवींद्रनाथांचा मोठा भाऊ ज्योतिरींद्रनाथ ह्यांचंच घेऊया. ह्या ज्योतिरींद्रनाथांनी तुकारामाचे अभंग प्रथम बंगालीत भाषांतरीत केले. रमाबाई रानड्यांच्या आठवणी, रामकृष्णपंत भांडारकरांची धर्मपरव्याख्याने, पारसनीसकृत झाशींच्या राणीचं चरित्र, हे मराठी ग्रंथ त्यांनीच बंगालीत अनुवादीत केले. इतकंच नव्हे, तर वयाच्या सतराव्या वर्षी त्यांनी लोकमान्यांच्या गीतारहस्याचा नऊशे पानी बंगाली अनुवाद प्रसिद्ध केला. आपल्या वासुदेव बळवंत फडक्यांच्या क्रांतीकार्याचा परिणाम बंगालमध्ये मोठ्या प्रमाणावर झाला. बंकीमचंद्रांची 'आनंदमठ' तर वासुदेव बळवंतांवरून घेतलेली आहे. आपल्या पं. सखाराम गणेश देऊसकरांना त्यांनी बंगालीच मानलं. देऊसकर मराठी माणूस ते बंगालमध्ये आले. 'हितवादी' ह्या बंगाली साप्ताहिकाचे संपादक झाले. बारा साली ते वारले. लोकमान्य टिळक बंगालला आले ते ह्या पं. देऊसकरांच्या आमंत्रणावरून. मग टिळकांनी वंगभंग हा राष्ट्रीय प्रश्न केला. म्हणून बंगाल पं. देऊसकरांबद्दल कृतज्ञ राहीला. पण ह्याच देऊसकरांच्या ऐंशी वर्षांच्या म्हाताऱ्या मुलीला इथल्या मराठी मंडळींनी मदत दिली नाही. ती कुठे तरी इकडे खेड्यात विपन्नावस्थेत दिवस काढत आहे आणि प. बंगालचं सरकार आता तिला मदत करणार आहे अशा बातम्या आहेत. तेव्हा सांगण्याचा मुद्दा काय, की इथली मराठी माणसं बंगाली माणसांशी अंतःकरणपूर्वक समरस होत नाहीत. बंगाल्यांच्याबद्दल इथल्या मराठी माणसांना आस्था नाही. त्यांच्या नावाने नुसत्या तक्रारी करण्यात काय अर्थ आहे ? अर्थात, एक गोष्ट खरी आहे की बंगाली माणूस हा पिंडाचाच आळशी कारकून आहे."

निवासात माणसांची वर्दळ वाढली. मलकापूरचा बडातीया म्हणून विद्यार्थी इथे एम. एस. सी. साठी राहातो. तो म्हणाला, "कलकत्त्यातले विद्यार्थी दंगलखोर

आहेत. कारण परीक्षा उत्तीर्ण होऊनसुद्धा आपण बेकारच राहाणार असं त्यांना वाटतं. सुशिक्षितांची घोर निराशा हे बंगालचं खरं दुखणं आहे. इथल्या विद्यार्थ्यांच्या समोर सध्या तरी अंधार आहे."

"कलकत्त्यात मराठी माणसं कशी वागतात ?"

"सगळीच चांगली वाटतात. एकमेकांना धरून असतात. मुख्य म्हणजे ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद औषधालासुद्धा नाही."

"इथें ब्राह्मणेतर आहेत ?"

"एक–दोन टक्के."

"उरलेले अठ्ठयाण्णव टक्के कोण आहेत ?"

"दिसायला तरी सगळे ब्राह्मणच दिसतात बुवा."

संध्याकाळचे पाच वाजले. कलकत्त्यात पाच वाजल्यापासूनच अंधारायला सुरुवात होते. निवासात उत्सव सुरू होता. जवळजवळ दोन हजार मराठी स्त्री-पुरुष जमले. सगळे सुखवस्तु, समाजाच्या वरच्या स्थरातले दिसत होते. कुणाच्याच चेहेऱ्यावर काळजीची छटा नव्हती. बायका थाटमाट करून आल्या होत्या. मी कल्पना करीत होतो त्या भीतीची छाया कुठेच नव्हती. देवाची पूजा झाली. आरती झाली. तीर्थ प्रसाद झाला. गाणंबजावणं आरामात सुरू झालं.

कोण म्हणतो कलकत्त्यातलं वातावरण अस्थिर आहे ?

पूर्वग्रह झटकून कलकत्ता शहर पाहायला मोकळ्या मनाने मी बाहेर पडलो. रस्त्यातून भटकताना वाटत होतं, खरोखर कलकत्ता पाहाण्याची गरज आहे ? हे महानगर मी पाहिलेलं नाही ? असं कसं होईल ? ह्या अफाट महानगराशी माझं हस्तांदोलन झालेलं आहे. कुठल्याही देशाशी आपलं सलामीचं हस्तांदोलन साहित्यिकांमार्फतच होत असतं.

साहित्यिक संतांबद्दल सांगतात. संत देवाबद्दल सांगतात. देव जिंदगीचा अर्थ सांगतात. आपलं काळीज पालवतं. पाणवतं. तिथून नव्या देशाबरोबरचं आपलं नवं नातं सुरू होतं. किंवा, काही काही लेखक देवाबद्दल आळीमिळी गूपचिळी बाळगतात. ते फक्त आपण न पाहिलेल्या त्यांच्या मायदेशातल्या माणसांबद्दल, माणसांच्या अन्नाडीपणाबद्दल, आठमुठेपणाबद्दल, भाबडेपणाबद्दल, क्रौर्याबद्दल, प्रेमाबद्दल, बिलंदरपणाबद्दल, ध्यासाबद्दल आणि बहुतेकदा त्याच्या एकाकीपणाबद्दल परोपरीनं लिहितात. ते आपण वाचतो. आपल्यासारख्याच माणसांनी गजबजलेल्या त्या अपरिचीत देशाबरोबर आपली सांधेजोड होते. सहप्रवास सुरू होतो. लंडन मी प्रत्यक्ष पाहिलेलं नाही. पण डिकन्सने, प्रिटचेटने ते मला हाताला धरून दाखवलेलं आहे. प्रदीर्घ परंपरेचा अभिजात अर्क असलेल्या त्या गारव्याच्या धुकट, काळोख्या शहराशी माझा मनोमिलाफ झालेला आहे. कलकत्त्याचंही तसंच आहे. गावाकडच्या गढीकडे पाठ फिरवून मायपोट कलकत्यात धक्के खायला निघालेल्या शरदबाबूंच्या

नायकाबरोबर मी कलकत्त्याच्या रस्त्यामधून भ्रमंती केलेली आहे. होय; तरीसुद्धा मी कलकत्त्याला निघालो आहे. माझ्या मुंबईतल्या घरात श्रीरामकृष्ण परमहंसाचा मनाच्या उन्मनी अवस्थेतला एक फोटो आहे. त्या निरागस माणसाने आपल्या पारदर्शक नजरेने मला थेट बंगालशी भिडवलं आहे. तेव्हापासूनच मी ठरवलं आहे की देवाशी दोस्ती करणाऱ्या त्या अवलीया माणसाचं गाव आपल्याला पहायचं आहे शरदबाबूंची लिहायची खोली पहायची आहे, दुष्काळग्रस्त खेडुतांना लाखोंच्या संख्येने गिळून टाकणारे कलकत्त्याचे कराल फूटपाथांचे दात पहायचे आहेत; 'न्यू थिएटर्सच्या' चित्रपटात भेटलेले गाणारे बंगालीबाबू पाहायचे आहेत आणि बिगरबंगाल्यांना हिशोबातच न घेणारी नवी बंगाली पिढीही पहायची आहे. मधासारख्या मिठ्ठास वाणीच्या पतिपरायण बंगाली गृहिणी पहायच्या आहेत. गोऱ्यांना ज्याच्यात कोंबून-कोंबून जीवे मारलं गेलं ते "ब्लॅक होल ऑफ कलकत्ता" पहायचं आहे. भुकेलेल्या शरदबाबूंनी जिच्यात मासेमारी केली त्या हुगळी नदीचं वहातं पात्र चांदण्या रात्री पहायचं आहे. ज्यूटची शेती पहायची आहे. रक्तपिपासू कालीमातेपुढे बलीदानासाठी हाकारलेला कोकरांचा कळप पहायचा आहे. ज्याची फाळणी हा आपल्याच काळजावर घाव आहे असं लोकमान्यांनी मानलं ती क्रांतीकारकांची धगधगती वंगभूमी आहे तरी कशी ती मला काळोख्या रात्री पाहायची आहे. ढेरपोट्यांची हबेलंडी उडवणाऱ्या हत्यारबंद नक्षलवाद्यांना पहायचं आहे; जसं बंगाली वाघालाही रानात फिरताना पहायचं आहे. ब्रह्मदेशातल्या पहाडावरच्या रबरी रानावरून वहात येणारे रानवारे हुंगायचे आहेत. बंगाली तळ्यातली मासळी ढेकर येईपर्यंत चापायची आहे. वर कलकत्ता पान चघळायचं आहे. अवलीया पंथाचे केवळ खलिफाच शोभावेत अशा डॉ. केतकर, धर्मानंद कोसंबी वगैरे आपल्याकडच्या राक्षसपंडीतांची खरी किंमत ओळखली त्या कलकत्ता विद्यापीठाचं मला दर्शन घ्यायचं आहे. विवेकानंदांची ध्यानभूमी पहायची आहे. चायना टाऊन पहायचं आहे. 'नील आकाशेर निछें' मध्ये पाहून डोळे निवले होते ते उगवतीचं निळभोर आभाळ डोळे भरून पहायचं आहे. जमल्यास एखाद्या बंगाली आईच्या तोंडचं बाळगीत ऐकायचं आहे. बंगाली बाईला भेटायचं आहे. बंगालच्या सुशिक्षित बेकारांच्या हृदयाचे ठोके मोजायचे आहेत. बंगाली नाटक न पाहून कसं चालेल ? बंगाली लेखकांबरोबर चहा न पिऊन भागेल ?

त्यासाठी एवढा अट्टाहास करून मी कलकत्त्यात फेरफटका करायला बाहेर पडलो. कोरडे, गरम वारे छातीवर पडले. क्षणार्धात मी ओळखलं हे वारे ब्रह्मदेशाच्या पहाडावरून आले आहेत; रबराच्या रानावरून आले आहेत; तागाच्या मळ्यांवरून आले आहेत. ह्याचा सुगंध वेगळा आहे. ह्याची जातही वेगळी आहे.

[ लेखांक दोन पुढील अंकी ]

बांगडीचा एक तुकडा मला बऱ्याच अंतरावर मिळाला.
त्या दिशेने मी गेलो तेव्हा मी एका झोपडीपाशी येऊन पोहोचलो.
त्या झोपडीच्या दाराशी मला दुसरा तुकडा मिळाला.
आणि आत...

# हुतात्मा

**व. कृ. जोशी**

इन्स्पेक्टर प्रधानांची जीप सरकारी दवाखान्याच्या आवारात येऊन थांबली. इन्स्पेक्टर प्रधान खाली उतरले तेव्हा तेथील दृश्य पाहून ते चकितच झाले. तेथे एक सभा चालली होती. चार लाकडी बाके एकत्र ठेवून एक तात्पुरते व्यासपीठ बनवण्यात आले होते. त्याभोवती शेकडो माणसे दाटी करून पण शांतपणे बसली होती. नगराध्यक्ष भाऊसाहेब पवार भाषण करीत होते व सर्वजण तल्लीनपणे ते ऐकत होते. इन्स्पेक्टर प्रधानांनी पाहिले की त्यांचे मित्र सबनीस वकील हेही हजर आहेत व गर्दीच्या कडेला उभे राहून भाषण ऐकत आहेत. इन्स्पेक्टर प्रधान त्यांचेपाशी जाऊन उभे राहिले. "बंधु भगिनींनो," भाऊसाहेब पवार गंभीर व दुःखपूर्ण आवाजात म्हणत होते, "एका स्त्रीच्या शीलासाठी शंकरराव यांनी आपले स्वतःचे प्राण अर्पण केले. त्यांनी हे जग सोडले पण हुतात्मा म्हणून ते अमर झाले आहेत..."

आश्चर्य चकित होऊन इन्स्पेक्टर प्रधानांनी सबनीस वकिलाच्या हाताला स्पर्श करून त्यांना विचारले, "काय ? शंकरराव गेले ?" सबनीस हलक्या आवाजात म्हणाले, "म्हणजे ? तुम्हाला अजून कळलंच नाही ? तीन तासापूर्वीच ते वारले... सकाळपासून बेशुद्धच होते..."

इन्स्पेक्टर प्रधानांना ह्या अनपेक्षित वार्तेनं धक्काच बसल्यासारखे झाले. कारण कालच सकाळी इन्स्पेक्टर प्रधान शंकररावांना त्यांना दिलेल्या हॉस्पिटलमधील



स्पेशल वॉर्ड मध्ये भेटले होते. त्यावेळी ते चांगले शुद्धीवर होते. त्यांनी सुसंगतपणे घडलेली घटना सांगितली होती. घटना जितकी चीड आणणारी होती तितकीच या प्रसंगाच्या वेळी शंकररावांनी दाखवलेली वीरश्री प्रशंसनीय व अभिमानास्पद होती. इन्स्पेक्टर प्रधानांना त्यांचेशी बोलताना हे समजले होते की शंकररावांच्या डोक्यावर प्रहार होऊन त्यांना जखम झाली होती, पण ती गंभीर स्वरूपाची असावी अशी शंका यायचे कारणच नव्हते.

"माझा गावाबाहेर एक द्राक्षांचा मळा आहे..." शंकररावांनी सांगितले होते. "मी माझ्या मोटारसायकलवरून तिथे रोज संध्याकाळी फेरी मारतो. कधी कधी पाय मोकळे करावे म्हणून मोटार सायकल मळ्यातच ठेवून मी पायीच घरी येतो. आमच्या मळ्याचे मागचे बाजूला ओढा आहे. त्याला लागूनच गावातून दत्ताच्या देवळाकडे जायची पाऊलवाट आहे. काल सायंकाळी साडेसहाचा सुमार होता. अंधार पसरू लागला होता. मी याच वाटेने गावाकडे निघालो तेव्हा अचानकपणे "धावा हो धावा...कुणी तरी वाचवा..." अशी कुणातरी बाईची आरोळी मी ऐकली. मी तावडतोब त्या दिशेने धावलो. ओढयाच्या किनाऱ्यावरच्या वाळूच्या पट्टीवर मला एक भयंकर प्रकार चाललेला दिसला. एक स्त्री जमिनीवर अस्ताव्यस्त पडली होती. अन् तिघे आडदांड तिच्या अंगाशी झटत होते. मी ओरडलो, "हरामखोरांनो, तुम्ही चालवलंय तरी काय ?" माझा आवाज ऐकताच ते तिघेजण दचकल्यासारखे झाले पण ते क्षणभरच. ते एकदम माझ्या अंगावर धावून आले व मला मारपीट करण्यास सुरुवात केली. मी त्यांच्याशी झगडत होतो. तेवढ्यात त्यापैकी कुणीतरी माझ्या डोक्यावर एक जबरदस्त टोला मारला. माझ्या डोळ्यापुढे काजवेच चमकले व मी खाली कोसळलो. माझी काही काळ शुद्धच गेली असावी. थोड्या वेळाने जेव्हा मला शुद्ध आली तेव्हा सर्व सामसूम होते. आता

पुरा अंधार झाला होता. मी खिशातल्या काडेपेटीतली काडी ओढून पाहिली. तेव्हा मला दिसले की ती बाई अजूनही जमिनीवर पडलेली होती. तिचीही शुद्ध गेली असावी. मी माझ्या मळ्यातील गड्यांना जोरजोराने हाका मारल्या. काही वेळाने दोघे गडी कंदील घेऊन आले. दिव्याच्या उजेडात पाहिलं तेव्हा त्या बाईला मी ताबडतोब ओळखलं. बिचारी आपल्या गावातले कापड दुकानदार अप्पा कानड्यांची मुलगी ज्योत्स्ना होती. आम्ही सगळ्यांनी मिळून तिला उचलून मोठ्या रस्त्यापर्यंत आणलं. नंतर टॅक्सीतून तिच्या घरी पोहोचवलं. हे होईतो माझं डोकं विलक्षण दुखू लागलं. आमच्या फॅमिली डॉक्टरांनी मला तपासलं. त्यांचं मत पडलं की जखम बाहेरून मोठी दिसत नाही पण एक्सरे वगैरे घेतलेला बरा म्हणून मी दवाखान्यात येऊन दाखल झालो..." इन्स्पेक्टर प्रधानांनी विचारलं होतं, "शंकरराव, मला एक सांगा, हे गुंड कोण असावे याचा काही अंदाज करता येईल तुम्हाला? निदान पुन्हा दिसले तर ओळखू शकाल?" शंकररावांनी उत्तर दिलं होतं. "अवघड. त्यावेळी साधारणपणे अंधार होता. नंतर तर मी बेशुद्धच पडलो. एक मात्र मला सांगता येईल. हे मवाली दुसऱ्या जमातीचे असावेत..."

...आणि शंकररावांनी याच अर्थाचे विधान त्यांना भेटायला म्हणून आलेल्या त्यांच्या अनेक चहात्यांजवळही केलेले होते. शंकरराव हे गावातले आघाडीचे पुढारी, त्यामुळे त्यांच्या या विधानाने व ज्योत्स्नावर झालेल्या अत्याचाराच्या वार्तेनं गावातील दोन जमातीत तंग वातावरण निर्माण झाले होते. यात भर म्हणूनच की काय त्यात आणखी एका दुःखद घटनेची भर पडली. दुर्दैवी ज्योत्स्ना! आपल्या मातापित्यांची एकुलती एक लाडकी लेक. बिचारीवर अठरा वर्षांच्या कोवळ्या वयात हा दुर्धर प्रसंग कोसळला होता. तिला बेशुद्धावस्थेत घरी आणले गेले. तावडतोब वैद्यकीय उपचार होऊनही ती सकाळपर्यंत शुद्धीवर आली नाही. शुद्धीवर आल्यावर भयाने वा लज्जेने एक शब्दही तिच्या तोंडातून निघत नव्हता. तिला मन सावरेपर्यंत एकटीलाच स्वस्थ पडू द्यावे म्हणून आईवडील तिच्या खोलीबाहेर गेल्यावर या जगाला विटलेल्या पोरीने खोलीच्या दाराला आतून कडी लावली व स्टोव्हमधील केरोसीन तेल स्वतःचे अंगावर ओतून घेतले व वस्त्रास जळती काडी लावली. क्षणात आगीचा भडका उडाला. असह्य वेदनेने ज्योत्स्नाने आर्त किंकाळी फोडली. आई-वडील धावत आले. दरवाजा फोडण्यात आला. तोवर ज्योत्स्नाचा देह भाजला जळला होता. अर्ध्या तासातच तिचे प्राण कुडीला सोडून गेले. ज्योत्स्ना शुद्धीवर येताच तिचेजवळ विचारपूस करावी म्हणून वाट पहाणाऱ्या इन्स्पेक्टर प्रधानांना तिच्या मृत देहाचेच दर्शन झाले. तिचा देह उत्तरीय तपासणीला पाठवला गेला. त्याचे आधीच ही बातमी वणव्यासारखी गावात पसरली. खोट्या खऱ्या अतिशयोक्तीपूर्ण अफवा पसरू लागल्या. गावात जातीय दंगलीला सुरुवात झाली. सशस्त्र पोलीस पथके गावात फिरू लागली. ज्योत्स्नावर अत्याचार करणाऱ्या

गुंडांचा पोलिसांना अजून पत्ता लागत नाही, याची तीव्र चीड येऊन पोलिसांवरही जनतेचा रोष आला होता. गुन्ह्याचा तपास हाती असलेल्या इन्स्पेक्टर प्रधानांना एक क्षणाचीही उसंत देण्यास त्यांचे वरिष्ठ अधिकारी तयार नव्हते. क्लान्त श्रान्त इन्स्पेक्टर प्रधान सबनीस वकिलांनी दिलेली शंकररावांच्या मृत्यूची बातमी ऐकून सुन्नच झाले. शंकररावांच्या फॅमिली डॉक्टरने घेतलेली शंकाच खरी ठरली होती. बाहेरून गंभीर स्वरूपाची जखम आहे असे दिसत नव्हते पण त्यामुळे मेंदूला इजा झाली असावी व नंतर रक्तस्त्राव होऊनच मृत्यू आला असावा. इन्स्पेक्टर प्रधान स्वतःच्याच विचारतंद्रीत होते. सबनीस वकील त्यांचा खांदा हालवत म्हणत होते, "ऐका प्रधानसाहेब, आता तुम्हा पोलिसांवर हल्ला आहे." यावेळेपर्यंत नगराध्यक्ष पवारांचे भाषण संपले होते. एका जहाल पक्षाचे पुढारी तारस्वरात म्हणत होते, "एवढा भयंकर, माणुसकीला काळिमा आणणारा अत्याचार आमच्या गावात घडतो आहे. शंकररावांसारख्या शूराचे बलिदान होत आहे पण आमचे पोलीस स्त्रियांच्या अब्रूचेही रक्षण करू शकत नाही अन् अत्याचार करणाऱ्या गुंडांना पकडू शकत नाहीत. याचा अर्थ एकच तो म्हणजे..."


इन्स्पेक्टर प्रधान ही टीका निमूटपणे ऐकत होते. गेले दोन दिवस त्यांनी केलेल्या तपास प्रयत्नांची स्मृति चित्रे त्यांच्या अंतःचक्षूसमोरून भराभर सरकत होती.

इन्स्पेक्टर प्रधान स्वतःच ही दुष्ट घटना घडली त्या स्थळी गेले होते. गावापासून तीन मैल दूर आणि निर्जन जागा ती होती. रक्ताचे डाग, ज्योस्नाच्या हातातील फुटलेल्या लालभडक बांगड्यांचे तुकडे व मऊ वाळूवर काही पावलांचे ठसे सर्व जागेवर पसरले होते. पावलांचे ठसे काही अंतरापर्यंत पुसटपुसट होत गेले होते. त्यावरून ते तीन व्यक्तींचे असावेत एवढाच अंदाज करता येत होता. या पावलांच्या मागावर एक निळे प्लॅस्टीक बटन धाग्यासह तुटून पडलेले दिसले. या जागेच्या भोवती काही झुडपे होती. त्यापैकी एका झुडुपात एक चिटोरा पडलेला दिसला. इन्स्पेक्टर प्रधानांनी तो उचलून निरखन पाहिला. गावातल्या डायमंड वॉच कंपनीचे पंधरा दिवसाच्या पूर्वीचे ते एक बिल होते. त्यावर "प्रभाकर काळे, ओमेगा वॉच दुरूस्ती-पंधरा रुपये रोख मिळाले" अशी नोंद होती. इन्स्पेक्टर प्रधानांनी ताबडतोबीने डायमंड वॉच कंपनीचे दुकानात जाऊन चौकशी केली होती. सुदैवाने ज्याने ही पावती लिहिली होती, तो दुकानातील कामगार दुकानातच हजर होता. तो हे घड्याळ दुरूस्तीला आणून देणाऱ्या प्रभाकर काळेंला ओळखत होता. त्याची राहण्याची जागाही त्याला ठाऊक होती. इन्स्पेक्टर प्रधानांनी त्याला आपल्याबरोबर जीपमध्ये घेतले व ते प्रभाकर काळेच्या सोमवार पेठेतील घरापाशी गेले. प्रभाकर काळे घरीच होता. बांधकाम खात्यात कारकुनी करून सेवानिवृत्त झालेल्या दिगंबरपंताचा हा प्रभाकर सर्वात मोठा मुलगा. दोन वर्षांपासून कॉलेज सोडून घरीच बसून होता. ओमेगासारखे किमती घड्याळ विकत घेण्याची त्याची अगर त्याच्या वडिलांची

एपत नव्हती हे उघड होते. इन्स्पेक्टर प्रधानांनी ज्योत्स्नावर झालेल्या हल्ल्याचा उल्लेख न करता प्रभाकरजवळ त्या ओमेगो घड्याळाबाबत विचारपूस केली. त्याची हकीगत ऐकता ऐकताच प्रभाकराच्या उनाड जीवनाविषयी व त्याच्या गुंड व टवाळखोर स्नेहवर्तुळाची त्यांना कल्पना आली. " हे घड्याळ माझं नाही साहेब- ते माझ्या एका मित्राचं. त्या मित्राची एका गाणाऱ्या बाईच्या घरी एका दारूड्याशी मारामारी झाली. त्यात हे घड्याळ खाली पडून नादुरुस्त झाले होते. मी त्याच्या साठी ते दुरुस्त करून आणले." इन्स्पेक्टर प्रधानांनी त्या मित्राचे नाव विचारले. "आगच्याच गल्लीतल्या काझीशेटचा मुलगा अब्दुल" प्रभाकरने उत्तर दिले होते. हे नाव ऐकताच इन्स्पेक्टर प्रधानांना अनेक गोष्टींचा उलगाडा झाल्यासारखे वाटले. अबदुल काझी हा सोमवार पेठेतल्या गुंडांच्या टोळीचा म्होरक्या म्हणून कुप्रसिद्ध होता. त्याचा बाप हा तांब्यापितळच्यांच्या भांड्यांच्या कारखान्याचा मालक होता. खूप पैसेवाला होता. अबदुल आपल्या बापाच्या पैशाच्या जोरावर विलासी आणि स्वच्छंदी जीवन जगत होता. गल्लीतले सर्व गुंड त्याचे साथीदार होते. थोड्याच दिवसापूर्वी मुलीची छेड काढल्याबद्दल पोलिसांनी त्याला व त्याच्या तीन साथी- दारांना पकडले होते. प्रभाकर काळे हा त्यापैकीच एक होता. इन्स्पेक्टर प्रधानांनी प्रभाकरला ज्योत्स्नाबद्दल छेडले. अबदुलची अनेक मलींशी जान पेहचान होती. हाती पैसा खळत असल्याने हॉय-क्लास हॉटेलमध्ये पाटर्या देणे, सिनेमाशोजना घेऊन जाणे, उंची 'प्रेझेंट्स' देणे ही त्याची मुलींना आपल्या जाळ्यात ओढण्याची साधने होती. हे सर्व प्रभाकरने प्रांजलपणे कबूल केले. परंतु ज्योत्स्नाबद्दल मात्र त्याला काहीच माहिती नव्हती. निदान तसं तो सांगत होता. इन्स्पेक्टर प्रधानांनाही त्याचे जवळ अधिक तपशीलाने विचारायला वेळ नव्हता. त्यांना त्यांचं मुख्य सावज शोधायचे होते व ते म्हणजे अबदुल. साहजिकच प्रथम त्यांनी अबदुलच्या बापाजवळ चौकशी केली. काझीशेटनी सांगितलं की अबदुल कधी घरी असतो तर कधी बाहेर. गुरुवारी म्हणजे ज्या दिवशी ज्योत्स्नावर अत्याचार झाला त्याच दिवशी दुपारी तो घरी जेवणापुरता आला होता. जेवण करून तो जो बाहेर पडला होता तो अजून परत- लाच नव्हता. काझीशेटच्या शब्दात 'छोकरा शैतानी' आहे पण तो असलं अघोरी काम करणार नाही. बापाचचं हृदय. त्यालाही पोरगा परतला का नाही म्हणून काळजी वाटत होती. तो कुठे असेल याची त्याला काहीच अटकळ नव्हती. इन्स्पेक्टर प्रधानांना मात्र ती अडचण वाटत नव्हती. त्याला नक्की कुठे शोधायचा याबद्दल त्यांचा स्वतःचा निश्चित अंदाज होता व तो खोटा ठरला नाही. इन्स्पेक्टर प्रधानांच्या हुकुमाप्रमाणे हवालदार जाधवने शुक्रवार पेठेतील सर्व गाणारीणींची घरे पालथी घालून अखेरीस भल्या पहाटे दोन वाजण्याचे सुमारास तारा वेंगुर्लेकरणीच्या घरात पलंगाखाली दडी मारून बसलेल्या अबदुलची मान पकडून त्याला इन्स्पेक्टर प्रधानांच्या पुढे उभे केले होते.

अबदुल उंच: गोरापान व मजबूत बांध्याचा होता. त्याचा चेहरा भयाने सुकलेला दिसला तरी त्याच्या वागण्यातील एक प्रकारची गुर्मी यत्किंचितही कमी झाली नव्हती. त्याचे अंगावर एक उंची टेरिलिन बुशशर्ट व काळी पँट होती. त्याच्या बुशशर्टची बटने निळया रंगाची होती व त्यातले दुसऱ्या नंबरचे बटन गहाळ झाले होते. हे इन्स्पेक्टर प्रधानांच्या ताबडतोब ध्यानात आले. त्याचे अंगावर खरचटल्याच्या निशाण्या होत्या. त्याच्या त्या क्रूर मर्दानी सौंदर्याची नोंद घेतानाच त्यांना निरागस ज्योत्स्नाची व तिच्या हृदयद्रावक मृत्यूची इन्स्पेक्टर प्रधानांना आठवण झाली व त्यांच्या भावना क्षणभर क्षुब्ध झाल्या पण त्या आवरून त्यांनी सौम्य व संयमीत आवाजात अबदुलला प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. अबदुलची हकीगत म्हणजे स्वतःचा उत्तम बचाव होता.

विक्रीकर खात्यात नोकरी करणारी पुष्पा मांडके ही अबदुलची मैत्रीण होती. तिच्या मार्फतच त्याची व ज्योत्स्नाची ओळख झाली. ज्योस्ना अबदुलला भेटलेल्या व त्याच्या बरोबर चैन केलेल्या मुलींपेक्षा अजिबात वेगळी होती. ती संकोची व लाजरी होती. तितकीच ती सच्छिल व स्वाभिमानी होती. इतर मुलींपुढे दाखवलेली आमिषे तिने झिडकारली व अबदुलच्या वर्तनाबद्दल तिरस्कार व संतापही तिने स्पष्टपणे व्यक्त केला पण आश्चर्याची गोष्ट ही की त्यामुळे अबदूलला राग तर आला नाहीच पण या साध्यासुध्या ज्योत्स्नाबद्दल विलक्षण आकर्षण वाटू लागले. तिचे आपल्या विषयीचे मत बदलावे म्हणून तो झटू लागला. त्याने मद्यपान सोडले. स्वतःच्या व्यसनी मित्रांची संगत सोडली. आयुष्यात प्रथमच त्याला प्रेमाची भावना समजली. ज्योत्स्नासाठी त्याला जान कुरबान करावीशी वाटू लागली. त्याचा हा कायापालट पाहून व सच्चा प्रेमाची ओळख पटून ज्योत्स्नाही जिंकली गेली व तीही त्याच्या प्रेमाला साद देऊ लागली. दोघांचे भिन्न धर्म व भिन्न संस्कृती या दोन्ही तटबदीवर प्रेमाने अखेर मात केली. दोघांच्या गाठी भेटी होऊ लागल्या. पण प्रेमिकांचा मार्ग सुकर नव्हता. ज्या पुष्पा मांडकेमुळे दोघांची प्रथम भेट झाली तीच आता ज्योत्स्नाचा मत्सर व द्वेष करू लागली. तिनेच या प्रेम प्रकरणाची वार्ता पसरविण्यास सुरुवात केली. धर्माभिमानी खवळले. त्यांनी ज्योत्स्नाच्या वडिलांची भेट घेऊन आपल्या मुलीला आवरा नाहीतर भयंकर परिणाम होतील अशी धमकी दिली. वडिलांना फार दुःख झाले. त्यांनी ज्योत्स्नावर सक्त नजर ठेवण्यास सुरुवात केली. दोन्ही हृदये भेटीसाठी तळमळत होती. गावाबाहेरच्या दत्ताच्या दर्शनाला जाते म्हणून ज्योत्स्ना घराबाहेर पडून अबदुलशी चोरून गाठी घेऊ लागली. गेल्या गरुवारची भेट याचप्रमाणे ठरलेली होती. त्या दिवशी प्रेमिक गुजगोष्टी करत असतानाच अंधार केव्हा पडलं हे समजलंच नाही. अचानक् त्यांचेजवळ दोन व्यक्ती येऊन उभ्या राहिल्या. त्यांनी एकदम अबदुलवर हल्ला केला. त्याच्या अंगावर सपासप काठ्या ओढल्या गेल्या. ज्योत्स्ना ओरडली, " धावा हो धावा... कुणीतरी वाचवा " पण





शाखा : सावदी रोड, अहमदनगर
डेपो : मेसर्स खरे अॅन्ड सन्स, पुणे २

कुणीही मदतीला आलं नाही. त्या दोघांनी अबदुलला ओढत फरफटत दूरवर खेचून नेले. त्याच्यावर काठ्यांच्या तडाख्यांचा वर्षाव चालूच होता. तो असह्य होऊन तो बेशुद्ध होऊन पडला. बऱ्याच काळाने त्याला शुद्ध आली. तो धडपडत उठला. त्याने ज्योत्स्नाला शोधले पण ती कुठेही दिसली नाही. नाइलाजाने तो परत गावात भीत भीत आला. त्याला घरी जायची हिंमत नव्हती. आपल्याला पुन्हा मारायला लोक टपून बसले असतील अशी त्याला भीती वाटत होती. त्यासाठी त्याने तारा वेंगर्ली-करीणीच्या घराचा आसरा घेतला होता

अबदुलने अतिशय हुषारीने जबाब दिला होता हे इन्सपेक्टर प्रधानांना मान्य करणे भाग होते. त्याच्या व शंकररावाच्या जबाबात अनेक बाबतीत साम्य होते. मुख्य भेद होता तो गुन्हेगार कोण याविषयीचा. याबाबत निर्विवाद सत्य सांगू शकणाऱ्या ज्योत्स्नाने स्वखुशीने या दुष्ट जगाचा निरोप घेतला होता. अबदुलचा पूर्वेतिहास ध्यानात घेतला तर त्याच्या शब्दावर विश्वास टाकणे धोक्याचे होते. गावातील वातावरणामुळे अबदुल इतका भिऊन गेला होता की त्याने आपणहूनच पोलीस ठाण्यात राहाण्याची उत्सुकता दाखवली. त्यामुळे त्याचेवर पाळत ठेवण्याचा प्रश्न आपोआपच सुटला होता. तपास कामातल्या या प्रगतीने इन्स्पेक्टर प्रधानांचे मात्र समाधान झालेले नव्हते. म्हणून क्षणाचीही उसंत न घेता त्यांनी रात्रंदिवस तपास काम नेटाने चालवले. आजच सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास ते त्यांच्या विभागाचे असिस्टंट कमिशनर सातपुते यांचे बंगल्यावर गेले व सातपुतेसाहेबांच्या ऑर्डर्लीला सांगितले की अतिशय अर्जंट काम असल्याने साहेबांची तांबडतोब भेट हवी आहे. हा निरोप मिळताच पाचच मिनिटात सातपुते साहेबांनी इन्स्पेक्टर प्रधानांना त्यांच्या बैठकीच्या खोलीत बोलावले. इन्स्पेक्टर प्रधान खोलीत शिरताच त्यांनी विचारणा केली "काय, मिस्टर प्रधान, गावात पुन्हा गडबड सुरू झाली काय ?" इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले, "नाही साहेब पण अजून वातावरण खूप तापलेलेच आहे. मी आज इतक्या पहाटे आलो ते वेगळ्या कारणासाठी. या दंगलीला मूळ सुरुवात झाली ती ज्योत्स्नाच्या प्रकरणाने. त्याच्या तपासकामी मला आपला सल्ला हवा आहे.' सातपुते साहेब म्हणाले "अबदुलला तर तुम्ही तुमच्या ताब्यात ठेवलंच आहे. आता प्रश्न त्याच्या साथीदारांना पकडण्याचा! अबदुल काही बोलतो आहे का त्यांच्याबद्दल ?"

"नाही साहेब. मी अबदुलजवळ खूप कसोशीने विचारपूस केली" असे म्हणून त्यांनी अबदुलने सांगितलेली सर्व हकीगत सांगितली. ती ऐकत असताना सातपुते साहेबांच्या कपाळावर त्रासिकपणाच्या आठ्या उमटल्या. ते सर्व हकीगत ऐकून म्हणाले "याचा अर्थ एवढाच की हा अबदुल पक्का बदमाश अन निर्ढावलेला गुंड आहे. त्याने आपल्या बचावाची उत्तम तयारी केली आहे..." "असेच मला वाटतं" इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले, "म्हणून त्याने कोर्टात हाच बचाव घेतला तर

तो हाणून पाडता यावा या दृष्टीने मी जारीने तपास केला. ज्योत्स्ना गुन्ह्याच्या जागी आलीच कशी या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मला मिळायला अडचण पडली नाही. ज्योत्स्ना दत्ताच्या दर्शनाला जाते म्हणून बाहेर पडली हे तिच्या वडिलांनीच सांगितलं. दत्ताच्या देवळाला जी एक पाऊल वाट आहे ती या ओढ्या-जवळूनच जाते हेही खरे. तेव्हा मुख्य प्रश्न राहिला की ज्योत्स्नावर हल्ला केला कुणी ? मी प्रथम गुन्ह्याच्या जागेची तपासणी केली तेव्हा मला त्या ठिकाणी ज्योत्स्नाच्या हातातल्या फुटलेल्या बांगड्याचे तुकडे मिळाले होते. ते मी जेव्हा जळवून पाहिले तेव्हा ते पुरत्या एका बांगडीचेही नव्हते. तेव्हा आणखी काही तुकडे मिळायलाच हवे म्हणून मी त्या जागेची पुन्हा अतिशय बारकाईने तपासणी केली. यात मला यश मिळाले. मला आणखी तुकडा बऱ्याच अंतरावर मिळाला. म्हणून त्याचे दिशेने मी तपासणी करत चाललो. तेव्हा मी एका झोपडीपाशी येऊन पोहोचलो. त्या झोपडीच्या दाराशी दुसरा एक छोटा लाल तुकडा मिळाला. मी झोपडीचे दार उघडून आत प्रवेश केला. आत सुसज्ज खोली होती. त्यात एक बिछाना घातलेला पलंग होता. बिछान्यावरील चादर वेडीवाकडी चुरगळलेली होती. त्यावर मला आणखी एक लाल बांगडीचा तुकडा मिळाला. चादरीवर एक दोन लांब केस मिळाले. ते स्त्रीचे होते यात शंकाच नव्हती. खोलीतही झटा झाल्याच्या निशाण्या होत्या. पलंगाच्या खालच्या बाजूला एक जाडसा लोखंडी गज पडलेला होता. त्याचे एका टोकाला रक्ताचे डाग व त्यावरच काही केस चिकटले होते. त्या सर्व परिस्थितीवरून माझी खात्री झाली की ज्योत्स्नावर झालेल्या अत्याचाराची जागा ही झोपडीच होती, त्यापूर्वी तिने प्राणपणाने झगडा केला होता. पण




त्याच्या पाशवी शक्तींपुढे तिची धडपड विफल ठरली होती. त्या गजाला चिकट-लेल्या केसांची मी तज्ञाकडून तपासणी करून घेतली. पंचविशीच्या अबदुलचे ते केस नव्हते. ते होते चाळीस पंचेचाळीस वयाच्या पुरुषाच्या डोक्याचे. मी त्या झोपडीच्या मालकाचा तपास केला. तिचे मालक..."

पण सातपुते साहेबांनी त्यांना पुढे बोलू न देता स्वतःच बोलण्यास सुरुवात केली. "तुमचा रोख माझ्या ध्यानात आला मिस्टर प्रधान. केवळ झोपडीच्या मालकीवरून मालक गुन्हेगार होऊ शकणार कसा? अबदुलची हकीगत क्षणभर खरी मानली—त्या सराईत गुंडावर कोण विश्वास ठेवणार? तरी देखील तुमचा संशय सिद्ध करणं कठीण आहे. त्याप्रमाणे तुमचे संशयित तिघे होतील. शंकरराव व त्याचे दोन गडी. प्रश्न हा आहे की ज्योत्स्नावर अत्याचार केला कुणी? बिचारी ज्योत्स्ना तर गेली."

इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले, "माझ्यापुढेही तीच अडचण होती साहेब, पण उत्तरीय-तपासणी केलेल्या डॉक्टर मान्यांनी मला निश्चित दिशा दाखवली. त्यांच्या तपासणीत ज्योत्स्नावर बलात्कार झाला हे तर समजलेच पण तो अशा व्यक्तीने केला होता की जी स्वतः लैंगिक रोगाने पिडलेली आहे. मी शंकररावाचे गडी, अबदुल यांची वैद्यकीय तपासणी करवली. ते सारे निर्दोष आहेत. लैंगिक रोगाने पिडलेली व्यक्ती एकच...अन् ती म्हणजे...दवाखान्यात स्पेशल वॉर्डात पाहुणचार घेत असलेला शंकरराव..."

सातपुते साहेब चकित होऊन म्हणाले "म्हणजे अबदुल निरपराध आहे तर. अन् साऱ्या गावात दंगलीचा भडका उडाला...असो आता सत्य बाहेर आलंच पाहिजे. शंकररावला अजून डिसचार्ज मिळाला नसेल त्याला तिथेच ताबडतोब अटक करा..."

आणि हा हुकूम घेऊनच इन्स्पेक्टर प्रधान तो बजावण्यासाठी जीव घेऊन सरकारी दवाखान्याकडे आले होते अन् त्यांना शंकररावांच्या मृत्यूची बातमी तर समजलीच पण त्यांच्या शोक सभेलाही हजर राहावे लागले. इन्स्पेक्टर प्रधान आपल्याच विचार तंद्रीत गढून गेले होते. सबनीस त्यांना म्हणत होते, "अहो प्रधान साहेब एवढी कसली तंद्री लागली आहे तुम्हाला? शोक सभा संपली. हुतात्मा शंकररावांच्या देहाला हार घालण्यासाठी लोक गर्दी करत आहेत. तुम्ही आणला आहे का पोलिसातर्फे काही हार...फुले?"

इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले "सॉरी हं! तपास कामाच्या गडबडीत मी ते विसरलोच बघा!"

□ □ □




द गॉलच्या कारकिर्दीतील अखेरचा कालखंड आता सुरू झालेला होता.

१९६५ मधली अध्यक्षीय निवडणूक त्याने जिंकली तेव्हा त्याच्या वयाची पंचाहत्तरी उलटलेली होती. आणखी आयुष्य लाभले आणि सारे काही सुरळीत चालले

# उत्तरार्ध : लेखांक आठ

तर १९७२ पर्यंत फ्रान्सची सूत्रे त्याच्या हाती राहणार होती. त्यावेळी तो ब्याऐंशी वर्षांचा होणार होता. म्हणजे निवृत्तीचे वय केव्हाच मागे पडले होते. गेल्या पाऊण शतकातील शारीरिक दगदगीमुळे आणि मानसिक तणावांमळे त्याचे शरीर आणि मन थकत चालले होते. दमणुकीच्या खुणा त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसू लागल्या होत्या. त्यामुळे ही आपली शेवटची अध्यक्षीय कारकिर्द आहे हे द गॉलला स्वतःलाही जाणवू लागले होते. त्याला थोडासा निवांतपणा हवा होता.

पण तसें घडणार नव्हते.

आठ जानेवारीला त्याने पुनश्च अध्यक्षीय सूत्रे स्वीकारली आणि त्यानंतर काही दिवसांच्या आतच पॅरिसमधील वृत्तपत्रातून 'बेनबार्का प्रकरण' गाजू लागले.

मेहदी बेन बार्का हा मोरोक्कोतील डाव्या गटाचा झुंजार नेता होता आणि त्यामुळे तो राजे हसन यांच्या डोळयांना खुपत होता. त्यापायीच गेली कित्येक वर्षे तो स्वित्झर्लंड, इजिप्त आणि फ्रान्स या देशात निर्वासिताचे जीवन व्यतीत करीत होता. मोरोक्कोशी संबध बिघडायला नकोत म्हणून बेन बार्का पॅरिसला आला तेव्हा त्याला फ्रेंच सरकारने नजर कैदेत ठेवले होते.

पोलादी पुरुष म्हणन ओळखला जात असलेला मोरोक्कोचा गृहमंत्री जनरल महंमद ओफ्कीर हे ओळखून होता की बेन बार्का मायदेशी परतला तर तो सध्याची राजवट उलथून पाडण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाही. म्हणून बेन बार्काला परदेशातच कोठेतरी ठार केले पाहिजे यासाठी या क्रूर प्रशासकाचा जीव तळमळत होता. मोरोक्कोच्या सेनादलावर आणि पोलिसदलावर त्याच्या एकटयाचीच हुकमत चालत असल्यामुळे त्या बळावर तो बेन बार्का याचा काटा काढण्याच्या प्रयत्नात गुंतलेला होता.

ओफ्कीरच्या या एकतंत्री राजवटीला स्वतः राजे हसनही कंटाळलेले असल्यामुळे त्यांनी १९६५ च्या मध्याला बेन बार्का याच्याशी गुप्त संपर्क साधला आणि त्याला मायदेशी परतण्याचे आवाहन केले.

राजे हसन यांच्या या प्रयत्नाचा ओफ्कीर याला सुगावा लागताच बेन बार्का याला ठार करण्यासाठी त्याचे हात शिवशिवू लागले. बेन बार्कासारख्या लोकमानसावर पकड निर्माण करू शकणारा कार्यकर्ता मोरोक्कोला परतला तर आपल्याला जड झाल्याशिवाय राहणार नाही हे ओफ्कीर याच्या बेचैनीचे मुख्य कारण होते.

ओफ्कीरने फ्रेंच गुप्त हेर खात्यातील अन्तोनी लोपेझ नावाच्या अधिकाऱ्याला हाताशी धरले. पॅरिसमध्ये नजर कैदेत असलेल्या बेन बार्काला पळवून आपल्या ताब्यात देण्याच्या कार्यात लोपेझ यशस्वी झाला तर मोरोक्कन विमानकंपनीत आपण त्याला मोठ्या पगाराची नोकरी देऊ असे ओफ्कीरने कळविले होते. बड्या पगाराच्या नोकरीच्या आमिषामुळे बेईमानी करायला लेपेझ तयार झाला. बेन बार्का याला नजर कैदेतून पळविता यावे यासाठी लोपेझने दोन पोलिस अधिकाऱ्यांना आपल्या कटात सामील करून घेतले.

२९ ऑक्टोबर १९६५ च्या सकाळी ते दोघे पोलिस अधिकारी बेन बार्काला जेथे ठेवले होते तेथे पोचले आणि त्यांनी तेथून त्याला हलविले. पॅरिसलगतच्या एका उपनगरामध्ये बेन बार्काची दुसरी नजर कैद सुरू झाली. लागलीच लेपेझने राबात येथे ओफ्कीरला फोन करून कळविले–" तुला हवं असलेलं 'पार्सल' माझ्या ताब्यात आलेलं आहे. ते घेऊन जाण्यासाठी तू तावडतोब ओर्ली विमान-तळावर ये. तिथं तुझ्या ते हवाली करतो. तुझ्या आगमनाची बातमी गुप्त ठेवण्याची मी व्यवस्था केली आहे."

ओफ्कीरने आपले हस्तक पॅरिसला धाडले आणि त्यांच्या करवी बेन बार्का याचा खून केला.

बेन बार्का याला अज्ञात इसमांनी ठार मारले एवढीच बातमी प्रथम प्रसिद्ध झाली. कदाचित हे रहस्य कधीही उलगडले गेले नसते. परंतु बेन बार्काच्या खुनाचा बेत पार पाडताना संबंधितांच्या हातून तीन चुका झाल्या होत्या.

बेन बार्का याला जेथे ठेवले होते तेथे आणखी एक मोरोक्कन विद्यार्थीही रहात होता. बेन बार्का याला तेथून पळविण्यात आले तेव्हा तो विद्यार्थी आतल्या खोलीत असल्यामुळे बेन बार्का याला पळविणाऱ्या पोलिसांना तो दिसला नाही; पण त्या विद्यार्थ्याने मात्र हा सारा प्रकार पाहिला होता. त्यामुळे त्याने काय घडले ते पत्र लिहून बेन बार्का याच्या भावाला कळविले. दुसरे असे की बेन बार्काला आपण तुमच्या ताब्यात देऊ एवढेच लोपेझने ओफ्कीरला कळविले होते. त्याचा पॅरिस-मध्येच खून करण्याचा ओफ्कीरचा विचार आहे हे लोपेझला माहित नव्हते. ओफ्-कीरचे हस्तक बेन बार्काला पॅरिसबाहेर घेऊन गेले असते तर कदाचित फ्रान्समध्ये या प्रकारासंबंधी फारशी खळबळ माजली नसती. तिसरी गोष्ट अशी की बेन बार्का याला पळविण्याच्या कार्यात लोपेझने फिगों याच्यासारख्या तुरुंगाची अनेक वेळा हवा खाऊन आलेल्या बेभरवशाच्या माणसाला हाताशी धरले होते. अशी माणसे पैशासाठी अपकृत्य करायला जशी तयार होतात तशीच आणखी पैशाच्या आशेने या अपकृत्याची वाच्यता करायलाही मागेपुढे पहात नाहीत. फिगों मार्फतच हा सारा बनाव पॅरिसमधल्या वृत्तपत्रांना कळला.

बेन बार्काला पळवून नेण्यात आले आहे ही बातमी जेव्हा तीस ऑक्टोबरला

प्रसिद्ध झाली तेव्हा फ्रान्समध्ये खळबळीची पहिली लाट उमटली. ओफ्कीर बेन बार्काचा काटा काढण्यासाठी उतावीळ झालेला असल्यामळे तो पळून गेला असावा असे सरकारतर्फे सांगण्यात आले. कारण बेन बार्कासंबंधी फ्रेंच सरकारला फारसे ममत्व वाटत नव्हते. द गॉलच्या दृष्टीने बेन बार्का याला महत्त्व होते ते वेगळ्या कारणासाठी. बेन बार्का क्यूबाचा फिडेल कॅस्ट्रो याचा मित्र असल्यामुळे तो साम्यवाद्यांचा हस्तक आहे आणि त्यामुळे तो मोरोक्कोत परतता कामा नये या हेतूने 'न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यून 'सारखी अमेरिकन वृत्तपत्रे त्याच्यावर टीका करीत होती. त्याच कारणासाठी द गॉलला असे वाटत होते की बेन बार्का याने मोरोक्कोला परतावे. बेन बार्कासारखा जहाल नेता मोरोक्कोला परतला तर तेथील अमेरिकन वर्चस्वाविरुद्ध तो आवाज उठवील अशी द गॉल याला आशा वाटत होती.

बेन बार्काला पळवून नेण्यात ओफ्कीरला अमेरिकेची मदत झालेली असणार हे ओळखून फ्रेंच वृत्तपत्रे म्हणू लागली— 'अमेरिकेच्या गुप्त हेरखात्याने एका दगडात दोन पक्षी मारले आहेत. बेन बार्का याला नाहीसे करून अमेरिकेने ओफ्कीरचे हात तर बळकट केलेच, शिवाय बेन बार्का पॅरिसमध्ये असताना नाहीसा झाल्यामुळे द गॉलला बदनाम करण्याची त्यांना संधी सापडली.'

यावेळेपर्यंत बेन बार्का याची अमानुष हत्या करण्यात आलेली आहे ही वार्ता बाहेर पडली नव्हती.

त्यामुळेच बेन बार्काला पळवून नेण्यात आल्यानंतर सहा दिवसांनी म्हणजे तीन नोव्हेंबरला ओफ्कीर जणू काहीही अनुचित घडलेले नाही अशा थाटात पॅरिसला आला. नेहमीच्या प्रथेप्रमाणे त्याने मोरोक्कन वकिलातीमध्ये भोजनाचा बेत आयोजित केला आणि त्यासाठी फ्रेंच गृहमंत्री फ्रे याला निमंत्रण धाडले. बेन बार्काला पळविण्यामागे ओफ्कीरचा हात आहे असा संशय सर्वांनाच असल्यामुळे फ्रे मेजवानीला गेला नाही. त्याने आपल्या सचिवाला धाडले.

ओफ्कीरचा बेन बार्का प्रकरणामध्ये हात आहे याचा सुगावा लागलेला असतानाही तो पॅरिसला आलेला असताना द गॉलने त्याला अटक का केली नाही असा प्रश्न उपस्थित होते. या प्रश्नाची दोन उत्तरे संभवतात. एक असे की या प्रकरणाचा असा बनाव ओफ्कीरने रचलेला आहे यासंबंधीचा निर्विवाद पुरावा द गॉलच्या हातात त्यावेळी आलेला नसावा. दुसरे असे की परराष्ट्राच्या गृहमंत्र्यास अटक करून आंतरराष्ट्रीय पेचप्रसंग उपस्थित करण्याची त्याची इच्छा नसावी. कारण त्यावेळी अध्यक्षीय निवडणुकीची धामधूम सुरू होती आणि ओफ्कीरच्या अटकेचा आपले विरोधक आपल्याविरुद्ध प्रचाराची टर उडविण्यासाठी उपयोग करून घेतील अशी त्याला भीती वाटत असावी. तरीदेखील 'बेन बार्का प्रकरणाचे निमित्त करून विरोधी पक्ष फ्रेंच पोलिसखात्यावर म्हणजेच पर्यायाने सरकारवर टीका करीत होतेच.

त्यामुळे बारा नोव्हेंबरला फ्रेंच सरकारने जाहीर केले. 'बेन बार्का यास पळवून

नेण्यामध्ये फ्रेंच पोलिसांचा काहीही हात नाही. ' तत्पूर्वी सहा नोव्हेंबरला द गॉलने राजे हसन यांना पत्र लिहिले. ' बेन बार्कास पळवून नेण्याचा कट ओफ्कीरने रचला असला पाहिजे हे उघड आहे. म्हणून तुम्ही त्याच्यावर खटला भरावा. तुम्ही स्वस्थ बसलात तर तुमच्या निष्क्रीयतेचा अर्थ फ्रान्स कळू शकतो. '

' बेन बार्का प्रकरणा 'संबंधीची आपली नापसंती व्यक्त करण्यासाठी द गॉलने मोरोक्कोचा दौरा रद्द केला.

अध्यक्षीय निवडणूक जिंकल्यानंतर द गॉलने ' बेन बार्का प्रकरणा 'ची अधिक माहिती मिळवायला प्रारंभ केला. या प्रकरणामध्ये फ्रेंच सरकारचा हात नसला-तरी अप्रत्यक्ष जबाबदारी आपल्यावर येते हे त्याला चौकशीअंती आढळून आले. म्हणूनच हे प्रकरण धसाला लावायला तो उत्सुक नव्हता.

परंतु फिगोंमार्फत पॅरिसमधल्या वृत्तपत्रांना बराच तपशील कळला होता आणि त्यामुळे दहा जानेवारीपासून फ्रेंच वृत्तपत्रात यासंबंधी चर्चा होऊ लागली. बेन बार्का याचा पॅरिसमध्येच खून झालेला आहे हे जेव्हा बाहेर आले तेव्हा वातावरण तापू लागले.

' बेन बार्का प्रकरणा 'मध्ये आपला हात असल्यामुळे आपल्याला अटक होणार आहे कळताच सतरा जानेवारीला फिगों याने गोळी झाडून आत्महत्या केली. तत्पूर्वी त्या कटातील इतर साथीदार जर्मनीला पळून गेलेले असल्यामुळे चौकशीचे काम रेंगाळू लागले. फिगों याला ' बेन बार्का प्रकरणा 'ची समग्र माहिती असल्यामुळे पोलिसानीच त्याला ठार मारले असावे असा लोकांचा ग्रह झाला.

त्यामुळे द गॉलविरोधी पक्षांना चांगलेच हत्यार सापडले. मित्तेरान्द याच्या अध्यक्षतेखाली ठिकठिकाणी सभा भरू लागल्या आणि त्यात साम्यवादी, समाजवादी आणि जहाल पक्षांचे कार्यकर्ते मागणी करू लागले, " या प्रकरणातलं संपूर्ण सत्य लोकांना कळलंच पाहिजे. बेन बार्का-प्रकरणाची चौकशी करण्यासाठी संसदीय सदस्यांची समिती नेमण्यात आली पाहिजे. "

आता आपण गप्प बसलो तर लोकांचा गैरसमज दृढ होईल म्हणून द गॉलने ओफ्कीरच्याविरुद्ध आंतरराष्ट्रीय वॉरंट काढले. त्याचप्रमाणे राबात येथल्या फ्रेंच राजदुताला बोलावून घेण्यात आले आणि पॅरिसमधल्या मोरोक्कन राजदुताला परत पाठविण्यात आले. मोरोक्कोबरोबरचे राजनैतिक संबंध तोडून टाकण्याची विरोध-कांची मागणी मात्र द गॉलने मान्य केली नाही. आपण तसे केले तर मोरोक्को-वरील अमेरिकन वर्चस्व अधिकच वाढेल हे त्याला ठाऊक होते.

एकवीस फेब्रुवारीला वृत्तपत्र प्रतिनिधींशी बोलतांना द गॉल म्हणाला. " बेन बार्का प्रकरणाला फारसं महत्त्व द्यायचं कारण नाही. कारण अतिशय सामान्य अधिकारपदावर असलेल्या काही भ्रष्ट लोकांनीच त्यात भाग घेतला होता. "

द गॉल आपल्या सरकारची प्रतिष्ठा सावरण्यासाठी बेन बार्का प्रकरणाकडे

दुर्लक्ष करायला सांगत आहे अशी काही वृत्तपत्रांनी या मुलाखतीवर टीका केली; परंतु केवळ तेच एक प्रकरण घेऊन द गॉलला बदनाम करण्याची विरोधी वृत्तपत्रांची मोहिम लोकांना फारशी आवडली नाही.

१९६६ च्या अखेरीला ' बेन बार्का ' प्रकरणातील आरोपींवर खटला भरण्यात आला. परतु त्यातील बरेचसे आरोपी फ्रान्सबाहेर पळून गेलेले असल्यामुळे या खटल्याला तसे काहीच महत्त्व उरले नव्हते. एकटा लोपेझ तेवढा सरकारच्या हाती सापडलेला असल्यामुळे त्याला दीर्घ मुदतीची शिक्षा ठोठावण्यात आली. न्यायाधीशांनी खुनाचा मुख्य सूत्रधार म्हणून ओफ्कीरलाही कारावासाची शिक्षा सुनावली. परन्तु मोरोक्कोच्या या गृहमंत्र्याला यापुढे फ्रेंच भूमीवर पाय ठेवायची गरज नसल्यामुळे या शिक्षेला अर्थ नव्हता. आपला प्रतिस्पर्धी ठरणारा बेन बार्का या जगातून नाहीसा करायचा हा ओफ्कीरचा उद्देश सफल झालेला असल्यामुळे फ्रान्सच्या रागा-लोभाची पर्वा करण्याचेही त्याला कारण उरलेले नव्हते.

' बेन बार्का प्रकरणा 'मुळे १९६६ च्या प्रारंभी द गॉलच्या लोकप्रियतेवर अनिष्ट परिणाम केलेला असला तरी त्या वर्षीच्या उत्तरार्धामध्ये त्याच्या नेतृत्वावर फ्रान्स खुष होता. फ्रेंच अस्मितेला प्रस्फुरण देणारे त्याचे परराष्ट्रीय धोरण हे या खुषीमागचे मुख्य कारण होते.

फ्रान्सने अमेरिकेची अरेरावी कशासाठी सहन करायची असा केवळ प्रश्न विचारून द गॉल गप्प बसला नव्हता. तो उत्तर ॲटलांटिक करार संघटनेतून बाहेर पडला. १९६५ च्या फेब्रुवारीपासून व्हिएटनाममधील युद्धात भाग घेण्याचे अमेरिकेने जे धोरण अवलंबिले होते त्याच्यावर तो कडाडून टीका करीत होता. सध्याच्या काळातील युद्धांना ' वैचारिक अधिष्ठान ' प्राप्त झालेले आहे हा अमेरिकेचा दावा तर त्याला निखालस हस्यास्पद वाटत होता. साम्यवादाच्या प्रसाराला अटकाव करण्यासाठी अमेरिका आग्नेय आशियातील युद्धात उतरला आहे हे त्याला बिलकूल मान्य नव्हते. तो म्हणायचा " उत्तर व्हिएटनाममधील जनता प्रथम व्हिएटनामी आहे आणि नंतर साम्यवादी आहे. " लाल चीनच्या विस्तारवादाशी झुंज घेण्याकरिता आग्नेय आशियाई भूमीवर उभे ठाकले पाहिजे या अमेरिकेच्या युक्तिवादाचा तो उपहासगर्भ भाषेत उल्लेख करी. साऱ्या जगाशी आणि त्यातून सामर्थ्यशाली अमेरिकेशी युद्ध पुकारण्याचा वेडेपणा माओ त्से तुंग करणार नाही याबद्दल त्याला खात्री वाटत होती. जी गोष्ट चीनची तीच रशियाची. दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व युरोपमधील अनेक लहान राष्ट्रांना आपल्या मगरमिठीमध्ये पकडून ठेवणाऱ्या रशियाला पश्चिम युरोपामध्ये नसते साहस करण्याचे धाडस होणार नाही असे तो सांगत असे. साम्यवादी तत्त्वज्ञानाचा रक्तध्वज पूर्व आणि पश्चिम गोलार्धावर फडकाविण्याची गर्जना रशिया किंवा चीन कितीही करीत असले तर ती गर्जना अडाणीजनांचा बुद्धिभेद करण्यासाठीच आहे, वास्तवात त्यांना क्रांतीची

निर्यात करण्याची मुळीच इच्छा नाही याबद्दल द गॉलला किंचितही शंका नव्हती. तो सांगत होता– ' फ्रान्स, ब्रिटन, अमेरिका, जर्मनी ही जशी आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांना जपणारी राष्ट्रे आहेत तसे हे दोन देश आहेत. त्यांच्या राष्ट्रीय हित-संबंधांना उपद्रवकारक ठरेल असे ते काहीही करायचे नाहीत. "

वडचा राष्ट्रांच्या उक्ति-कृतींसंबंधी अशा रोखठोक आणि वास्तववादी भाषेत बोलणाऱ्या या नेत्याला अॅटलांटिकपासून उरलपर्यंत युरोपीय महाराज्य निर्माण करण्याच्या कांक्षेने झपाटून टाकले होते. फ्रान्स आणि रशिया यांचे हितसंबंध समान असल्यामुळे त्यांनी या कामी पुढाकार घेतला पाहिजे असे त्याला सारखे वाटे. मात्र त्यासाठी रशियाच्या ओंजळीने पाणी प्यायची तयारी नव्हती. त्याने पश्चिम जर्मनीशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याबाबत पुढाकार घेताच रशिया अस्वस्थ झाला; पण त्याची त्याने पर्वा केली नाही. पूर्व जर्मनीचे वेगळे अस्तित्व राहिले पाहिजे हा रशियाचा आग्रह आपल्याला मान्य नाही असे सांगायलाही त्याने अनमान केला नाही

अमेरिका आणि रशिया या दोन बलाढ्य राष्ट्रांमध्ये साऱ्या जगाची विभागणी व्हावी याला त्याचा विरोध होता. अन् म्हणून या दोन्ही राष्ट्रांचे वर्चस्व न मानणाऱ्या राष्ट्रांचे ' तिसरे जग ' निर्माण केले पाहिजे. यासाठी द गॉलची सतत धडपड सुरू होती.

कोणत्याही अहंमन्य नेत्याप्रमाणे द गॉलचे मनही एकारलेले होते. परराष्ट्रीय धोरणासंबंधी त्याला जेवढा जिव्हाळा वाटायचा तेवढी आत्मीयता त्याला अर्थ-कारणाबाबत वाटली नाही. त्यामुळेच १९६७ च्या मार्चमध्ये फ्रेंच लोकसभेच्या निवडणुकी झाल्या तेव्हा त्याच्या पक्षाला ४८७ जागांपैकी २४४ जागा मिळाल्या; म्हणजे कसेबसे बहुमत मिळाले इतकेच. याचा अर्थ असा की द गॉलची वैयक्तिक प्रतिष्ठा आणि फ्रेंच जनमानसातील त्याचे वैशिष्टयपूर्ण स्थान त्याच्या पक्षाला साहाय्यभूत होऊ शकली नाही.

हे असे का घडले यासंबंधी एका फ्रेंच विचारवंताने केलेले निदान अचूक म्हटले पाहिजे. तो म्हणतो, " आम्ही फ्रेंच लोक मोठी बेजबाबदार माणसं आहोत. जेव्हा देशात अशांतता तेव्हा आम्ही शांततेच्या शोधात असतो; आणि जेव्हा सारं काही ठीक असतं तेव्हा आम्हाला गोंधळाची, अशांततेची आस लागलेली असते. "

या निवडणुकीनंतरच्या दोन-तीन महिन्यांच्या अवधीमध्ये आंतरराष्ट्रीय राज-कारणामध्ये प्रक्षोभक लाटा उत्पन्न करणाऱ्या घटना घडल्या. ग्रीसमध्ये फॅसिस्ट सत्तांनी उठाव केला होता. सुएझच्या काठावर अरब राष्ट्रे आणि इस्रायल यांच्यात रणसंघर्ष भडकला होता, पूर्वेकडच्या चीनने हैड्रोजन बाँबचा स्फोट घडवून आणला होता. या साऱ्या घटनांकडे द गॉल तिऱ्हाईताच्या नजरेने पहात होता.

अरब-इस्रायल वादात तो इस्रायलची बाजू घेईल अशी अपेक्षा होती; परंतु तो कोणत्याच बाजुला झुकला नाही. अमेरिका, रशिया, ब्रिटन आणि फ्रान्स यांनी

पुढाकार घेऊन सुएझचे पेटलेले पाणी शांत करावे असे त्याने सुचविले; परंतु त्याच्या व्हिएटनामविषयक धोरणामुळे चिडलेल्या अमेरिकेने ही सूचना अव्हेरिली. तेव्हा तो म्हणाला, '" अरब-इस्रायल युद्ध आणि चीनने केलेला हैड्रोजन-बाँबचा स्फोट या दोन्ही घटना व्हिएटनाममधील युद्धातून जन्म पावलेल्या आहेत. म्हणून प्रथम काही करायचं असेल तर व्हिएटनाममधलं युद्ध थांबवलं पाहिजे. बड्या चार राष्ट्रांनी शांतपणानं याचा विचार केला नाही तर तिसरं महायुद्ध अपरिहार्य ठरेल."

तिसऱ्या महायुद्धाची भीती भेडसावू लागली की द गॉल खिन्न होई. आपल्या सहकाऱ्यांशी बोलताना तो एकदा म्हणाला होता, "तिसरं महायुद्ध भडकलं तर फ्रान्सचा स्वित्झर्लंड करणं एवढंच मला शक्य होईल. तिसरं महायुद्ध पेटू नये यासाठी तर मी तिसऱ्या जगाचा पुरस्कार करीत आहे. त्यादृष्टीनं मला खूप करायचं होतं. बराच पल्ला गाठायचा होता."

द गॉल थकत चालला होता.

'बऱ्याच वेळा मोठ्या घटना कबुतराच्या नाजुक पायांनी चालत असतात.' असे नीत्शे याने म्हटले आहे.

द गॉलला याचा आता अनुभव येणार होता.

एखाद्या अनभिषिक्त सम्राटाप्रमाणे फ्रान्सवर अधिराज्य गाजविणाऱ्या या लोकनेत्याला सत्तेवर राहण्याचा अधिकार काय आहे असा सवाल जाहीर चौकात विचारला जाणार होता.

द गॉलला हे सारे अनपेक्षित होते.

प्रचलित शिक्षणपद्धतीविषयी फ्रेंच विद्यार्थ्यांच्या मनात असंतोष खदखदत होता. विद्यापीठात मिळणाऱ्या शिक्षणाचा आणि आपल्या भावी जीवनाचा संबंध त्यांना समजू शकत नव्हता. कसाईखान्याकडे जाणारी अश्राप गुरेढोरे आणि विद्यापीठात प्रवेश करणारे आपण यांच्यात फारसा फरक नाही असे डॅनियल कोन्ह-बेन्दिनसारखे विद्यार्थी-नेते सांगू लागले होते.

डॅनियल नान्तेरे विद्यापीठात शिकत होता. त्याची ही आक्रमक भाषणे ऐकून विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी त्याला १ मे १९६९ रोजी जाब विचारण्यासाठी बोलाविले. विद्यापीठाच्या इमारती ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्याचा त्याच्यावर आरोप होता. डॅनियलला विद्यापीठातून काढून टाकण्यात येणार असल्याचे विद्यार्थ्यांना कळताच नान्तेरे विद्यापीठात दंगल उसळली. फ्रेंच विद्येचे आणि कलेचे आदिपीठ समजल्या जाणाऱ्या सोर्बोन विद्यापीठाला या दंगलीची झळ पोचताच कुलगुरूंनी पोलिसांकडे संरक्षणाची याचना केली. त्यामुळे तर सोर्बोन विद्यापीठातील युवक अधिक संतप्त झाले.

जुनी पिढी आणि नवी पिढी यांच्यातील हा संघर्ष होता.

तीन मे रोजी विद्यार्थ्यांनी, विद्यापीठाभोवती पहारा करणाऱ्या पोलिसांवर

हल्ला चढविला. पॅरिसच्या रस्त्यावर यादवी युद्धाचा भडका उडाला होता.

द गॉलने विद्यार्थी-प्रतिनिधींना बोलावून घेऊन सांगितले, "हे हिंसाचार सरकार सहन करणार नाही. तुमच्या या वागण्याने सरकार नमेल अशी तुमची कल्पना असेल तर तो भ्रम आहे."

या मुलाखतीनंतर दंगल शमेल असे वाटून, सोर्बोन विद्यापीठ पुन्हा सुरू करण्याचा आपला मनोरथ असल्याचे शिक्षणमंत्री पेरेफित याने जाहीर केले. परंतु मध्यंतरीच्या काळात नान्तेरे विद्यापीठ विद्यार्थ्यांनी ताब्यात घेतले होते. त्यामुळे सोर्बोन विद्यापीठ उघडण्याचा आपला विचार पेरेफित याने रद्द केला.

ते कळताच विद्यार्थी बिथरले.

पोलिसांशी लढत द्यायला ते सिद्ध झाले होते. त्यांनी दहा मे रोजी सोर्बोन विद्यापीठाकडे जाणाऱ्या लॅटिन क्वार्टर येथे झाडे तोडून पोलिसांचे रस्ते अडविले. दिवसभर पोलिस आणि विद्यार्थी यांच्यात चकमकी झडत होत्या. त्यात साडेतीनशेहून अधिक विद्यार्थी जखमी झाले. पाचशे विद्यार्थ्यांना पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतले होते. तरीही लॅटिन क्वॉर्टर शांत होईना. म्हणून पॅरिसच्या पोलिसप्रमुखांनी रस्त्यावरील अडथळे हलविण्याचे काम रात्री दोन वाजता सुरू केले. कल्पना अशी की यावेळी विद्यार्थी येथे जमणार नाहीत आणि त्यामुळे सारे काम बिनबोभाट पार पडेल. परंतु टेहेळणी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी ही बातमी आपल्या नेत्यांच्या कानावर घातली आणि लगेच बराच मोठा जमाव तेथे गोळा झाला. विद्यार्थ्यांनी पोलिसांच्या मोटारी जाळून टाकायचे सत्र आरंभिले. पोलिसांनी तडाखेबंद लाठीहल्ला सुरू केला तेव्हा विद्यार्थी माघारी परतले. त्यामुळे पोलिसांना चेव आला. त्यांनी वसतीगृहात जाऊन विद्यार्थ्यांना मारहाण केली.

या दंगलीची वार्ता कळताच अफगाणिस्तानच्या दौऱ्यावर असलेले प्रधानमंत्री पाँपिदू लगबगीने पॅरिसला परतला आणि त्याने अठ्ठावीस विद्यार्थी-नेत्यांपैकी चोवीस जणांची सुटका करून विद्यार्थ्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे सोर्बोन विद्यापीठ दोन दिवसांनी सुरू होईल असेही जाहीर केले.

त्याप्रमाणे सोमवारी म्हणजे तेरा मे रोजी सोर्बोन विद्यापीठाचे दरवाजे उघडले पण एकही विद्यार्थी आत जाईना. त्यादिवशीच्या विद्यार्थ्यांच्या हरताळात कामगार वर्गही सहभागी झाला. आठ लाख लोकांचे निषेध-संचलन पॅरिसला पहायला मिळाले. यावेळी विद्यार्थ्यांच्या आणि कामगारांच्या हातात जे फलक होते त्यावर द गॉलला उद्देशून लिहिले होते–'दहा वर्षाची कारकीर्द पुरे झाली' मिरवणूकीत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सोर्बोन विद्यापीठाचा ताबा घेतला.

विद्यार्थ्यांची सांस्कृतिक क्रांती यशस्वी ठरली.

वृद्ध द गॉलला या क्रांतीचा बोध होऊ शकला नाही. त्याच्या ताठर मनाने या क्रांतीकडे दुर्लक्ष करायचे ठरविले. म्हणून ठरल्याप्रमाणे तो दुसऱ्या दिवशी

रुमेनियाच्या दौऱ्यावर रवाना झाला.

द गॉलच्या उद्धट वर्तनाचा विद्यार्थ्यांपेक्षा कामगारांना अधिक राग आला. आता त्यांनी निदर्शने आणि दंगली करायला प्रारंभ केला. या कामगारांनी नौतेरेजवळचा विमान-कारखाना ताब्यात घेतला. सतरा मे रोजी तर कामगार-संघटनेने सर्व कारखाने ताब्यात घेण्याचा आपल्या सदस्यांना आदेश दिला.

एवढे सारे घडल्यावर द गॉल रूमेनियाचा दौरा अर्धवट टाकून पॅरिसला परतला आणि आपण सध्याच्या आर्थिक धोरणासंबंधी पुढल्या महिन्यात सार्वमत घेणार आहोत असे जाहीर केले. प्रधानमंत्री पाँपिदु याने कामगार नेत्याशी वाटाघाटी करून त्याने दहा ते तीस टक्के पगारवाढ मान्य केले. त्याचप्रमाणे कामाचे तास कमी करायलाही तयारी दर्शविली. परंतु संपकाळातील पगार द्यायला त्याने नकार दिला. त्यामुळे कामगारांनी वाटाघाटी फिसकटल्याचे जाहीर केले.

सत्तावीस मे रोजी फ्रान्समध्ये अक्षरश: अराजक निर्माण झाले होते.

द गॉल काहीसा भांबावला; पण लगेच त्याने स्वत:ला सावरले आणि तीस मे रोजी लोकसभा विसर्जित करून लोकमताचा पुन्हा कौल घेण्याचे आव्हान स्वीकारले. त्याप्रमाणे जूनच्या अखेरीला निवडणुका होऊन द गॉलच्या पक्षाला निर्विवाद बहुमत लाभले. ४८७ जागांपैकी ३५८ जागा त्याच्या पक्षाला मिळाल्या होत्या.

फ्रान्सचा तो चमत्कारिक स्वभाव जागा झाला होता. अराजकाचा धोका दिसताच फ्रान्सने निमूटपणाने द गॉलच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला आणि अस्थिरतेच्या भोवऱ्यातून स्वत:च स्वत:ची सुटका करून घेतली.

द गॉलचा अहंकार सुखावला.

त्याला नवे बळ प्राप्त झाले. त्या बळावरच त्याने फ्रँकचे अवमूलन करण्याचा अमेरिकेचा आग्रह फेटाळून लावला. फ्रेंच चलनाची किंमत काय असावी हे सांगण्याचा अधिकार इतरांना नाही हीच या आग्रहामागची त्याची मनोभूमिका होती.

१९६९ साल उजाडले. तेव्हा त्याच्या मनात घटना दुरुस्तीचा विचार येऊ लागला. संसदेच्या वरिष्ठ सभागृहाचे अधिकार कमी करून ते प्रादेशिक मंडळाला द्यावेत असे त्याला वाटत होते. वास्तविक ही घटना दुरूस्ती त्याला संसदेकडून मंजूर करून घेता आली असती. पण त्याच्या हट्टी मनाने सार्वमताचा आग्रह धरला. या सार्वमतात आपल्याला बहुमत लाभले तर अध्यक्षपदाची मुदत संपेपर्यंत अधिकारवर रहायचे आणि समजा सार्वमत विरोधी गेले तर सत्तात्याग करायचा असे त्याच्या मनाने घेतले असावे.

त्याप्रमाणे २७ एप्रिल १९६९ या दिवशी फ्रान्समध्ये सार्वमत घेण्यात आले आणि त्यात द गॉलला बहुमत मिळाले नाही. लागलीच त्याने जाहीर केले—' मी फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षपदाचे त्यागपत्र देत आहे '

आधुनिक फ्रान्सच्या इतिहासावर आपल्या कर्तृत्वाची जडशी मुद्रा उमट-

विणारा हा लोकनेता आपण होऊन एलिसे प्रासादातून बाहेर पडला आणि त्याने आपल्या कोलंबी गावचा रस्ता धरला.

बारा वर्षे उपभोगलेले सत्तापद देशबांधवांच्या आजच्या आशा-अपेक्षांशी आपण समरस होऊ शकत नाही. याचा लहानसा अंदाज येताच, द गॉलने कोणताही त्रागा न करता, कोणताही दोषारोप न करता सोडून दिले. हे मनोधैर्यही असामान्य म्हटले पाहिजे.

जागतिक राजकारणामध्ये 'फ्रान्सची एक स्वतंत्र निर्माण व्हावी' हा देश कोणाच्याही मेहेरबानीवर उभा नाही हे जगाला प्रतीत व्हावे यासाठी अविरत धडपड हेच द गॉलच्या जीवनाचे सूत्र होते, तोच त्याचा श्वास होता. त्यामुळेच तो 'मी म्हणजे फ्रान्स' अशी भाषा फ्रान्सच्या नामुष्कीच्या क्षणीदेखील उच्चारू शकला आणि अदंम्य कार्यशक्तीच्या बळावर अल्पावधीतच सार्थ ठरवू शकला.

द गॉलचे निधन झाले तेव्हा फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज पाँपिदू म्हणाले, "आज फ्रान्स अनाथ झाला आहे."

ही श्रद्धांजली म्हणजे एका राष्ट्राध्यक्षाने आपल्या दिवंगत पूर्वसुरीसाठी औपचारिक पद्धतीने केलेली गौरवयुक्त शब्दांची उधळण नव्हती तर फ्रान्सचा चेहरामोहरा बदलून टाकणाऱ्या एका जिद्दी कर्तृत्वाचा तो यथार्थ सन्मान होता.

अपराजित नेतृत्वाला इतिहासाने दिलेली ती मानवन्दना होती.

# स मा प्त

---

पुढील अंकापासून सुरू होत आहे

## प्लासी ते डाक्का

नवी लेखमाला

अनिल बर्वे

---

केशव मेश्राम

एकतारी

एका

पावसाळ्यात

# सौ. शिरीष पै यांची कविता

कोणत्याही कलेचा आस्वाद घेताना रसिकमनाची एकाग्रता ही आवश्यक गोष्ट असते. त्यातही काव्यकलेच्या. भावकाव्याच्या आस्वादनात तर ती अपरिहार्य अशी असते. मराठीला काही रचनाप्रकार असे लाभले आहेत की त्यातून अभिव्यक्त होणाऱ्या स्फुल्लिंगाचे प्रत्यंतर एखाद दुसऱ्या ओळीतून प्रकट होते. यात अभंग, ओवी आणि लावणी ह्या प्रकारांचा प्रामुख्याने निर्देश करावा लागेल. म्हणून ह्या प्रकारात आकारलेल्या भावकाव्याचे यशापयश ठरविताना अनेक तऱ्हेची फसगत होण्याची शक्यता असते.

सौ. शिरीष पै कथालेखिका म्हणून वाचकांना परिचित असल्या तरी कवीयत्री म्हणूनही त्या ओळखल्या जातात. त्यांच्या सत्त्याहत्तर कवितांचा 'एकतारी' हा संग्रह. बहुसंख्य कविता अभंग माध्यमातून, काही अष्टाक्षरी. जीवनलहरीतून साकारलेल्या आहेत. तीव्रतर अशा भावानुभवांची विविध कंपने शिरीष पै यांनी 'एकतारी'मधून रसिकांना सादर केलेली आढळतात.

अभंगरचना मुळातच बोलकी व वेधक शब्दचित्रे निर्मिण्यास सोपी अशी असल्याने 'एकतारी'ने जेवढे खरोखर प्राप्त केले आहे, त्याची ओळख पटावी तशी पटली नाही. संपन्न अनुभवामुळे हे सोपे शब्द आयुष्यातल्या कितीतरी जटिल समस्यांना सहज स्पर्श करताना दिसतात.

'एकतारी'मधील कवितेतून सातत्याने जाणवते ती वेदना व तिची जीवनाशी समरसता. श्री. मधुकर केचे यांनी ह्या सनातन वृत्ताला आपल्या भावाविष्कारासाठी प्रथम नव्याने समर्थपणे वापरले होते. त्याच सच्चेपणाचे प्रत्यंतर 'एकतारी'-मधून येते. त्यामुळे सौ. शिरीष पै कुठे अडलेल्या दिसत नाहीत. अंतरीच्या उमाळ्याने फुललेल्या-फुलणाऱ्या ह्या ओळींची प्रेरकशक्ती कोण ते निर्मातीलाही कोडेच आहे. अशा वेळी आपली कृतज्ञता व्यक्त करताना त्या म्हणतात—

'काय होते माझे ऋण । देशी शब्द पाठवून !'

ह्या अशा आगळेपणाची व त्यातील अत्यद्भुत ज्वालेची मागणी करताना–

'लागो ऐशी आग । तनुमनातून । यावया फुलून । गीत तुझे ।।'

असे आवाहक शब्दही सौ. पै वापरतात.

'एकतारी'त अनुभवाच्या कितीतरी छटा आहेत. आयुष्य, मग ते सामान्याचे असो किंवा कवीचे असो, तुमची इच्छा असो किंवा नसो, वाहतच राहते. हा सार्वत्रिक अनुभव उत्कटतेने शब्दबद्ध करताना–

'कोठेतरी थेट । जायचे वाहत । एवढीच रीत । अभ्यासली ।।'

असे नेमके आलेखन सौ. शिरीष पै करतात आणि आपल्या पराभूत हरलेपणातही–

'तुम्ही म्हणाल तो भाव । आज आमुचा लिलाव ।'

असे प्राण पिळवटणारे उद्गार त्या काढतात. ह्या गतिमान आयुष्याचा ताळा करावयाचा म्हटले तर निघणारे निष्कर्ष दुःखदायक आहेत, पण कलावंताला ते सांगण्याचे काम करावेच लागते. मानवी रक्ताचे पृथःकरण केल्यानंतरचे जळजळित सत्य म्हणूनच त्या सांगतात–

'शेवटी हातात । एवढेच सत्य । जातीचेच रक्त । बेईमान ।।'

हे सत्य पटले तरी काही वाटा अशा असतात जेथून कुणालाच परत फिरता येत नाही; आणि अशा अटळ क्षणाचे लेखन–

'इथेतिथे नाही कुठे । पाय नाहीच ठरत ।
फक्त पुढे वाहण्याचा । ज्वर चालला मुरत ।।'

अशा शब्दांनी कवयित्रीने केले आहे.

'एकतारी'मधील आत्यंतिक जीवनासक्ती हे एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणून नोदावे लागेल. अज्ञाताच्या, अतर्क्य खेळियाच्या लीळाचे जसे त्या रेखन करतात त्याचप्रमाणे शरीरप्रीतीचा मोकळा फुलोराही निःसंकोचतेने ह्या कवितात बहरलेला दिसतो. स्त्री-पुरुषातील आकर्षण, परस्पराविषयीची प्रगाढ आसक्ती, पराकोटीचा कडवटपणा, आत्यंतिक अगतिकता, आत्मसमर्पणाची धुंदी, अस्तित्वाचे होश-बेहोष शिरीष पै यांनी संयमपूर्वक बंदिस्त केलेले दिसतात. 'प्रेम खरे' ह्या कवितेत म्हणून त्यांनी व्यक्त केलेला निर्धार–

'स्वीकारीले तुझे धाम । घडो काही परिणाम ।'

असे शब्दरूप धारण करतो. मीलनाचे तादात्म्य प्रकट करताना प्रतिकांची झालेली अदलाबदल अधिक समर्थतेने कार्य करताना दिसते.

'तुझी पडता सावली । काया पूर्ण करपली ।'

ह्याचीच परिणती

'मी तो काळोखाचा प्याला । तया विषलाभ झाला ।'

अशा अवस्थेत झालेली आढळते.

मनात उसळणारा प्रक्षोभ तडाड फुटल्यानंतर उसळणारा जीवनरस त्यांच्या 'एकतारी 'मधील कितीतरी कवितात दिसतो. प्रियाशी होणाऱ्या भेटीला म्हणून तर 'एकतारी 'मध्ये–

'ऊर उराशी फाटला। अशी त्याची तिची भेट।'

असे रूप येते. आपल्या मर्यादा जाणून असलेली ही प्रणयिनी एकाचवेळी अभिसारिकेचे रूप व 'मीरे 'चा अलौकिक विश्वास घेऊन प्रकटते.

'उसळून दूर। जरी मी जाईन। तुझ्याच येईन। पिंजऱ्यात॥'

किंवा–

'नको नको झाला। माझा जीव मला। जसा तुझा तुला।
माझ्यावीण॥'

आपल्याच मानसिक अस्थिरतेचा शोध हा नेहमीच थकवणारा असतो. हा आत्मशोध कलावंताच्या मनाला विलक्षण पीडादायक ठरतो. ह्या दृष्टीने सौ. शिरीष पै यांची 'तरंगतो दूर' ही वेधक व परिपूर्ण कविता आहे. ही छोटी पण समर्थ कविता अशी–

'तरंगतो दूर। एकला पडाव। सोडूनीया ठाव। आला कोठे?॥
की हे माझे मन। तेही माझ्यातून। मलाच सोडून। हेलावते॥'

ह्या कवितेचा संक्षेप किती बोलका आहे हे स्पष्टपणे जाणवते.

कवयित्री जशी अनेक पातळीवर वावरते त्याचप्रमाणे तडजोडीची समंजस व सुजाण भूमिकाही ती विसरत नाही. कारण आत्मशोध व आत्मलेखनाची पूर्ती अशा समंजस भूमिकेत होत नसेल तर ते व्यक्तित्वाचे मोठे न्यून म्हणावे लागेल.

कविमनाचे फुलणे–मावळणे, कंपित होणे–सोशीक बनणे ह्यातच आयुष्याची गती आहे. ही कातरता–आत्मतृप्ती क्षणिक असली तरी सौ. पै त्यावेळी आपलेपण असे रंगवितात–

'असा प्राणांचा बहर। रोज येईल कुठून। देठ जाईल तुटून।'

आणि ह्याच क्षणी त्यांच्या नव्या संग्रहातील भाववृत्तीचे सूतोवाच करणाऱ्या पावसाळी अवस्थांच्या कविता भेटतात.

'आला आला रे', भिजेत–भिजेन', 'उधळूनी पट' आणि 'नको समजू की' ह्या 'एकतारी 'मधील चार कवितात कवयित्रीच्या पुढील मूड्सची स्पष्ट सूचना मिळते. द्विरुक्तीच्या वापराने स्त्रीसुलभ हटवादीपणाचे जे दर्शन घडते ते लाडिकही आहे आणि हृद्यही–

'भिजेन भिजेन। सारी सारी रात। उभी पावसात। नाहताना।'

ह्या भिजण्याची अपूर्वाई कवयित्रीच्या मनावर किमया करून गेलेली असल्याने संबोधनाची सहज लकब त्यांनी पुढल्या ओळीत आणली आहे–

'कधी न पाहिला। ऐसा गा वर्षाव। तुझा माझा गाव। पाण्याखाली॥'

ह्या संततधारा संपू नयेत कारण मनातही एक वर्षागीत पाझरत असते–

' नाही संपणार । पिसाट हा खेळ । त्यातून ही वेळ । पावसाची ।। '

' एकतारी 'मधील कविता समृद्ध, समर्थ आणि अनेकढंगी आहे. विविध व गुंतागुंतीचे अनुभव उपभोगून ती अतृप्त आहे. ह्या अतृप्तीचा तिला आनंद आहे. म्हणून कवयित्रीने जी ग्वाही दिली आहे ती सार्थ आहे. त्या म्हणतात–

' मुळातली वेल । पुन्हा पालवेल । यंदाचा बहर । वेगळा असेल ।। '

ह्या वेगळेपणांच्या शोधासाठी त्यांच्या ' एका पावसाळ्यात ' ह्या संग्रहाकडे वळणे योग्य होईल.

वर्षर्तू हा कवींच्या विशेष आवडीचा असतो. कुंद आभाळ, कडकडत्या विजा, पावसात मुकाट भिजणारी झाडें, पाण्याशी एकरूप होणारी माती, तरारणारी पिके, पाजळणारी दिवटी, काजव्यांचा प्रकाश आणि हे सगळे अनिमिष, अतृप्त डोळ्यांनी आणि मनाने टिपणारे कलासक्त कंपनशील व्यक्तित्व यांचा समन्वय ' एका पावसाळ्यात ' या संग्रहात झाला आहे.

सौ. शिरीष पै यांचा हा संग्रह ' मराठीत ' वेगळा म्हणावा लागेल. खऱ्या अर्थाने तो ' पावसाळी मुड्स् 'वर आधारलेला आहे. उधाणणाऱ्या पुरासारखे मनाच्या अफाटतेचे अलोट लोट येथे आढळतात. अनंतरंगाची डोळे दिपवणारी झगझग यात आहे. अर्थात काव्यातील तरलता मात्र साठ्यांच्या कुंचल्यानी बिघडवली आहे. आत्मक्लेशाचे सूर, आत्मशोधनातील हुरहूर, चिंब भिजण्यातील शहारा आणि अमित्र मेघाचे उदास एकाकी पर्यटण यांच्या जोडीला मीलनाशा आणि पापुद्रा उचलून कोंबाच्या सहजतेने प्रकट होणाऱ्या भावोद्रेकाचे संकलन सौ. शिरीष पै यांनी ' एका पावसाळ्यात ' ह्या संग्रहात केले आहे.

भावोत्कटता आणि प्रतिमासृष्टीशी एकरूपता हे या कवितांचे विशेष आहे. पाऊस प्राशनाने तृप्त झालेल्या झाडाच्या अस्तित्वाशी समरस झालेले कविमन––

' किती भरात येऊन बहरले आहे हे झाड
गंधाची केवढी लयलूट ! '

असा सूचक उद्‌गार काढते तर न सापडणाऱ्या प्रश्नाच्या उत्तरासाठी वणवणताना–

' कुणी लावली आहे कुणाला
काळीज सुकविणारी तहान '

असा प्रतिप्रश्न त्या करतात––

ह्या कवितांचे शब्दसामर्थ्य तपासण्यासारखे आहे. एका कोसळत्या ऋतूचा हा शब्दोत्सव असल्याने जरी ह्यातले कितीतरी ' भाव ' एकाच आवर्तात गरगरत असलेले आढळतात तरी त्यांचे वेगळेपणही नाकारता येत नाही.

प्रियकराकडून दान लाभलेले औदासीन्य ' पावसाळ्यातील संध्याकाळसारखे

उत्कट-सुंदर' वाटते. दुरावा 'आकाशभर पसरलेल्या काळ्या मेघासारखा' वाटतो थकलेली गात्रे 'अथांग भिजलेल्या माती 'प्रमाणे वाटतात. विस्कटलेले शोकगीत-धगधगत्या निखाऱ्यावर भाजलेल्या छातीतून झिरपताना त्यांना जाणवते. प्रियकरा-मधील जागा झालेला सैतान 'किती भयंकर...आकर्षक...हवाहवासा वाटतो.' अशा कितीतरी 'तुकड्यात' त्यांनी हे विश्व पकडल्याची मनःपूर्वक जिद्द बाळगलेली दिसते.

'कविता' ह्या वाङ्मयप्रकारावर लिहिलेल्या कविता हेही 'एका पावसाळ्यात' या संग्रहाचे एक लक्षणीय वैशिष्टच. कवितेच्या धारा कोसळत असताना देह पिकल्यासारखा वाटणे, परमेश्वराच्या सावलीप्रमाणे साक्षात्कारक्षणी प्रियकराचे स्मरण होणे, हे तर आहेच पण कलावंतांच्या आपल्या अंतर्मनातील गूढ प्रवासाचे टप्पेही ह्या कवितात प्रत्ययास येतात—

'मीच ही कविता जी लिहिली तुझ्यासाठी—तुझ्यामुळे
जिच्यातून जळणारे शरीर माझे. माझ्यातून तुझे आणि कवितेचेही'

ह्या ओळी किंवा कबुलीजबाबासारख्या वाटणाऱ्या

'असंख्य वेळा चेष्टेचा विषय होऊनही जिची पाठ सोडली नाही.
ही कविता.. एवढेच माझे पुण्य आणि पापही...'

ह्या ओळी किंवा निवेदनाच्या शैलीने सहज साकारणारी—

'इलाजच नव्हता म्हणून कवितेत घुसले'

अशा कितीतरी आविष्कार लकबींनी सौ. शिरीष पै भावाभिव्यक्ती करतात.

ही संततधारेतील 'पावसाळी गीते' एकत्र आस्वादताना मात्र सुटे-सुटे वाचताना जाणवणारी उत्कटता व तीव्रता बोथट झाली आहे. त्यांचा एकसुरीपणाही अस्वस्थ करून सोडल्याशिवाय राहत नाही. पावसाळ्याचा नाद रसिकमनात बिंबून अंतर्मुख करीत नाही. आणि त्यामुळे काही काही वेळा उत्कटतेच्या जोडीने शब्दांचा रप-रपाटही जाणवतो.

'एकतारी 'मध्ये सौ. शिरिष पै यांची 'तार' लयबद्ध लागली आहे. अभंगाचे पारंपरिक बंधन स्वीकारूनही त्यातील सच्चेपणा दाद घेऊन जातो. एवढे निखळ समाधान 'एका पावसाळ्यात' लाभू देत नाही. मात्र सौ. शिरीष पै यांचे स्वतःचे वैशिष्टच आणि मराठी कवितेतील स्थान पक्के करण्यास दोन्ही संग्रह निःसंशय कारणीभूत झाले आहेत.

**एकतारी** । **एका पावसाळ्यात** । सौ. शिरीष पै
मूल्य ४ रु. । मूल्य ५ रु. । पॉप्युलर प्रकाशन

□ □ □

फिल्म इन्स्टिटयूट

# नाट्यपूर्ण संप

**अनिल टाकळकर**

फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिटयुटच्या गेले ४६ दिवस चाललेल्या 'लाय डाऊन ओपन' या नाटयपूर्ण संपावर आठवडयापूर्वीच अखेर पडदा पडला. विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा विचार करण्याचे आश्वासन माहिती व नभोवाणी खात्याच्या राज्यमंत्री नंदिनी सत्पथी यांनी दिल्लीला गेलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्ट-मंडळाला दिले आणि या संपाची अखेर सांगता झाली. त्यामुळे इन्स्टिटयुमधील सर्वांचाच जीव भांडयात पडला आहे. चार विद्यार्थ्यांच्या या शिष्टमंडळाने श्रीमती सत्पथींसमोर आपल्या तक्रारी मोळकेपणाने मांडल्या. त्यावेळी झालेल्या चर्चेत इन्स्टिटयुटच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात येईल, असेही आश्वासन दिल्याने इन्स्टिटयुटचे संपवाले विद्यार्थी मनापासून खुषीत आहेत.

या संपाच्या समाप्तीमुळे आशियातील ही एकमेव इन्स्टिटयुट बंद होण्याची भीतीही दूर झाली आहे. आता प्रश्न उरला आहे तो विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा आणि बुडालेला अभ्यासक्रम भरून काढण्याचा–! परीक्षांची तारीख अजून तरी अनिश्चितच आहे.

पण गेले ४६ दिवस प्रभात रोडवरील या फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिटयुट-मध्ये नेहमी प्रत्ययास येणारा फुलपाखरांचा उत्साह पार मावळून गेला होता. घोळक्या घोळक्याने रमत गमत जाणाऱ्या तरुण तरुणी दिसत नव्हत्या ! विस्कटल्या-सारखं वाटत होते !

इन्स्टिटयुटमध्ये पाऊल टाकताच दिसत होती दोन्ही बाजूला पसरलेली अंथरूणं... त्यावर लोळणाऱ्या अनेक वस्तु – अंथरूणावर पडलेली झाडांची जीर्ण पाने, विस्कटलेले केस, चुरगाळलेले कपडे, चिंतातूर चेहरे.

गेल्या दीड महिनाभरातील दिवस आणि रात्री या खुल्या आभाळाखाली या विद्यार्थ्यांनी काढल्या होत्या – आपल्या संपासाठी निर्धाराने–! हा संप होता.

बेशिस्त ॲक्टिंग (अभिनय)च्या विद्यार्थ्यांना धडा शिकवण्यासाठी. स्वतःला राज कपूर, देव आनंद आणि प्राण मानून गेली अनेक दिवस मन मानेल तशी गुंडगिरी करणाऱ्या या भावी हिरोंना ताळ्यावर आणण्यासाठी व त्यांना पाठीशी घालणाऱ्या प्राचार्यांचा निषेध म्हणून.

खरे म्हणजे – बेमुदत संप पुकारण्याचे तसे कारण ते 'कार्टून'! पण एकटे कार्टूनही नव्हेच ! कारण त्या कार्टूनच्या मागे असलेला फार मोठा इतिहास आहे.

बारा फेब्रुवारीला झाले काय – तर नॉन ॲक्टिंग ग्रुपने ॲक्टिंग ग्रुपच्या विद्यार्थ्यांचे व प्राध्यापक महाशयाचे बिंग त्या कार्टूनच्या साहृय्याने फोडले. ते कार्टून नॉन ॲक्टिंग ग्रुपने 'थॉट फॉर टूडे' या नोटीस बोर्डावर त्या दिवशी लावले, 'चित्रपटनिर्मितीचे क्वालिफिकेशन नसलेल्या एका प्राध्यापकमहाशयांना पाच चित्रपट तयार करण्याची परवानगी का मिळावी ?' असाही एक सवाल त्यात होताच. शिवाय हिरोंची मगरूरी, फिलमसची उधळपट्टी वगैरेही त्या कार्टूनमध्ये एका व्यंगचित्रातून रंगविले होते. त्यामुळे वातावरण तप्त – आणि त्याच रात्री या भावी 'देवआनंद, प्राण' यांनी होस्टेलवर धिंगाणा घातला. नॉन ॲक्टिंग ग्रुपपैकी एकाला मारहाण केली. सिनेमातला 'व्हिलन' ज्याप्रमाणे एखाद्याला सिगारेटचे चटके देतो तसेही चटके त्या बिचाऱ्याला देण्यात आले आणि वर जीव घेण्याची धमकीही !–परिणामतः प्राचार्यांनी या ॲक्टिंग ग्रुपच्या भावी सहा 'हिरोंना' रस्टीकेट केल्याचे जाहीर केले. परत वातावरण तप्त प्राचार्यांच्या निषेधार्थ हिरोंच्या पाठीराख्यांनी दबावासाठी संपास सुरुवात केली. चार पार्ट टाईम इन्स्ट्रक्टर्सचे राजीनामेही आले.

अखेर प्राचार्य जगत मुरारींनी अचानक निर्णय बदलला, इन्स्ट्रक्टर्सला राजीनामे परत घ्यावयास सांगितले आणि धिंगाणा घालणाऱ्या सहा ॲक्टिंग स्टुडंटस्ने माफी मागितली म्हणून रस्टीकेट न करता त्यांना सौम्य शिक्षा फर्मावली आणि हेच कारण, हीच ठिणगी नॉन-ॲक्टिंग ग्रुपच्या संपास कारण ठरली. 'प्राचार्य अभिनयाचे विद्यार्थ्यांचे जादा लाड करतात, कारण ती बड्या बड्या धेंडाची मुले आहेत, इन्स्टिटयूटला मोठी कीर्ती मिळवून देणार आहेत ना ?' अशा तक्रारी नॉन ॲक्टिंगचे विद्यार्थी उघड उघड करू लागले आणि २० फेब्रुवारीपासून बेशिस्तीविरुद्ध चालविलेला हा 'लाय डाऊन ओपन' संप नॉन ॲक्टिंगच्या शंभर विद्यार्थ्यांनी संघटितपणे शिस्तीत चालविला–अगदी विद्यार्थिनींनीही चांगली साथ दिली.

मधूनमधून या संपाची चेष्टा करण्याचा प्रयत्नही या भावी हिरो आणि हिरॉईन्सनी कमी केला नाही. संपातील विद्यार्थी नेत्यांच्या प्रतिमांना सामुदायिक फाशी–दमबाजी–घोषणांची युद्धे आणि असेच अनेक प्रकार– (मात्र हा ॲक्टिंगचा प्रकार नव्हता हं ! ) तरीही नॉन ॲक्टिंग ग्रुपने संयम राखला-पण अभिनयाच्या विद्यार्थ्यांना एवढे करूनही पाठीशी घालणाऱ्या प्राचार्यांवरचा विश्वासही अखेर उडाला.

'वुई हॅव फर्म फेद इन अवर
प्रिन्सिपल अँड नॉट द प्रिन्सिपॉल !'

ही संपवाल्या विद्यार्थ्यांची घोषणा होती आणि 'टू द फर्स्ट डिसीझन स्टीक फर्मली ऑर रिझाईन ग्रेसफुली !' ही त्यांची प्राचार्य मुरारींपाशी मागणी होती. प्राचार्यांशी या विद्यार्थ्यांनी बोलणीच करण्याचे टाळले. अखेर दिल्लीहून माहिती व नभोवाणी खात्याचें सचिव एस. के. घोष आणि उपसचिव के. के. खान यांना या संपात हस्तक्षेप करावा लागला. त्यांनाही हा संप नाही मिटवता आला. दोन तीन दिवसात मंत्र्यांशी चर्चा करून निर्णय कळवतो, असे सांगून या दोघा अधिकाऱ्यांनी दिल्लीला कूच केले. पण वाट पाहूनही तार नाही, उत्तर नाही ! फोनवर फोन लावले-पण 'चर्चा चालू आहे-निर्णयाबाबत अद्याप काही सांगता येणार नाही' अशासारखी उडवाउडवीची उत्तरे मिळाली. नभोवाणी खात्याची ही दिरंगाई पाहून अखेर विद्यार्थी दिल्लीला नभोवाणी मंत्री श्रीमती सत्पथींना भेटायला गेले आणि शेवटी चर्चेतून समिती नेमण्याच्या उपायामुळे विद्यार्थ्यांचे समाधान झाले.

विद्यार्थ्यांनी हा शांततापूर्ण रीतीने चालविलेला बेशिस्तीविरुद्धचा संप अखेर समंजसपणे मागे घेतला. त्यामुळेच संपवाल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करावेसे वाटते-कारण त्यांच्या संपाची कहाणी सुफळ संपूर्ण झाली नसली तरी होण्याची आशा आहे, अपेक्षा आहे.

□ □ □

## मराठवाड्याची हालहवाल

पृष्ठ १४ वरून

निघणार आहे. त्यामुळे नांदेडच्या आयुर्वेद कॉलेजचे भवितव्य काय यासंबंधी चिंता व्यक्त होत होती. त्यासंबंधीचा उल्लेख 'माणूस'च्या वार्तापत्रात पूर्वी केलाच आहे. आरोग्यखात्याच्या उपमंत्री ना. प्रतिभाताई पाटील आयुर्वेद कॉलेजच्या स्नेह-संमेनास आल्या असता नांदेडचे हे कॉलेज 'उठणार' नाही असे आश्वासन त्यांनी दिल्याने चिंता कमी झाली आहे पण नवा अभ्यासक्रम कधी ठरणार, तो कधी अंमलात येणार हे प्रश्न अनुत्तरितच आहेत. डॉ. पवार यांच्या समितीचा अहवाल तयार झाल्यावर यासंबंधी अधिक माहिती कळू शकेल. जुना अभ्यासक्रम बंद करण्यात आला आहे. नवा सुरू झालेला नाही म्हणून आयुर्वेद कॉलेजच्या शिक्षकांचे जूनपासून काय होणार याची काळजी वाटणे स्वाभाविकच आहे.

नांदेड येथे मेडिकल कॉलेज उघडणे अत्यंत आवश्यक असल्याचे अध्यक्षीय भाषणात पद्मश्री शामराव कदम यांनी प्रतिपादन करून ते लवकर निघण्यासाठी श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी स्वतः प्रयत्न करावेत अशी नांदेडकरांतर्फे त्यांना विनंती केली.

□ □ □

# क्रीडांगण

नरेंद्र दाभोळकर

## त्रिवार अभिनंदन–दोन आदर्श उपक्रम

# बाबा शिर्के सहाय्यक निधी

---

कृतज्ञता आणि कर्तव्य, जिव्हाळा आणि आपुलकी ह्या शब्दांचे अर्थ शब्दकोशात धुंडाळावयास लागावेत असा हा जमाना ! 'काय संबंध ?' अशा त्रयस्थ दृष्टिकोनातून आजकाल कुठल्याही घटनेकडे बघायला लोक सरावले आहेत. पदराला खार लावून कोणी काही चांगले करत असेल तर 'पुढे पुढे करायची सवय लागलीये म्हणून हा नाचरेपणा' अशा प्रकारे त्याची संभावना होते आणि कामाला नावे ठेवणे अगदीच शक्य नसेल तर 'बघूया, आम्ही तरी कुठे कुठे पुरे पडणार ?' असा साळसूदपणा वर दाखवत पाठ वळल्यावर काय नसती पीडा अशी आठी कपाळावर उमटते.

कुठल्याही क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्याला येणारे हे अनुभव फारसे उत्साहवर्धक नाहीत. देशी खेळासारख्या तुलनेने मागासलेल्या ठिकाणी काम करताना तर असे अनुभव येण्याची शक्यता खूपच अधिक. सगळीकडे कोरडी सहानभूती आणि खोटा जिव्हाळा ! पण संस्था ज्यांना उभ्या करावयाच्या असतात त्यांना या साऱ्या वातावरणाशी टक्कर देत ज्योत जागवावीच लागते. सतत पेटतीही ठेवावी लागते. जिद्दीने धडपणारी एखादी संस्था म्हणजे तिच्या असंख्य कार्यकर्त्यांचे खरे घर महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशिएशनला ही उपमा शोभून दिसावी. घरामध्ये सारे शिस्तीत घडावे म्हणून वडिलधाऱ्यांचा धाक लागतो. काही चांगले केले तर त्याचे कौतुक व्हावे लागते. काही अडले नडले तर डोळयातले अश्रू जवळकीने पुसणारी आणि आधार देणारी व्यक्ती लागते. एखादी संस्था घरासारखी वाढवावयाची म्हणजे ह्या साऱ्या गोष्टी बघाव्याच लागतात.

बाबा शिर्के गेला त्यावेळी सगळ्यांचीच मने सुन्न झाली. स्वभावानें झुंजार आणि वृत्तीनें निगर्वी असा हा कबड्डी शौकीनांचा लाडका खेळाडू! कुठल्याही आणि-बाणीच्या वेळी बाबाने आपला खेळातला संयम आणि बेडरपणा सोडला नाही. खरेपणापासून ढळला नाही. बाबाशी दोन हात करण्याचा प्रसंग मला दोनदाच आला. पण बाबाच्या खेळाचा आनंद मी अनेकवेळा मनमुराद लुटला आहे. स्वतःच्या 'खास' तंत्राने लोकप्रिय झालेले जे थोडे खेळाडू महाराष्ट्रात होते त्यामध्ये बाबांचा उल्लेख अवश्य करायला हवा. ब्लॉक पद्धतीने गडी रोखणे हे कबड्डीतले एक वैशिष्टयपूर्ण तंत्र आहे, दत्ता मालप आणि सदा शेटे नंतरच्या पिढीत हे तंत्र मला बाबा शिर्के आणि लक्ष्मण विरवडकर या दोनच खेळाडूत परिपूर्ण आढळले.

बाबाचे वजन एकशेदहा पौंड खाली बसत नाही म्हणून केवळ त्याच्यासाठी लक्ष्मीमाता संघाने खुल्या गटात आपला संघ नोंदवायला सुरुवात केली आणि बाबाच्यासाठी चालू केलेला हा आरंभ त्यांच्या संघाला एकदम मोठे नाव मिळवून देण्यास कारणीभूत ठरला. लक्ष्मीमाता संघाच्या इतिहासात मधू पाटील इतक्याच मोलाचे बाबा शिर्केचे नाव आहे. भोईर सुवर्ण चषकाचा सर्वोच्च मान लक्ष्मीतरनला दुसऱ्यांदा मिळवून देताना उपांत्य फेरीत बाबानें आपल्या पकडीच्या जोरावर रेल्वेच्या अथीरथींची चाल ज्या शर्थीनें रोखली होती ती झुंज ज्यांनी बघितली ते भाग्यवान आधीच उत्कृष्ट क्षेत्ररक्षण असलेल्या स्टेट बँकेच्या संघात बाबा ज्यावेळी दाखल झाला त्यावेळी स्टेट बँकेचे कव्हर एखाद्या अभेद्य किल्ल्यासारखें वळकट झालें.

लक्ष्मीरतननें भोईर चषक पहिल्यांदा मिळवला त्यावेळी त्या यशाला कारणीभूत झालेल्या मधू बोभाटेवर कॅन्सरचा घाला पडावा आणि त्या संघाला दुसऱ्यांदा हा मान मिळवून देणारा बाबा शिर्के कॅन्सरचेच भक्ष्य ठरावा हा नियतिचा विचित्र योगायोग नव्हे काय?

हळहळ वाटावी हे स्वाभाविक होते. पण या नुसत्या हळवेपणाचा काय उपयोग होता? कुटुंबातल्या एका भावाच्या संसाराची घडी विसकटली होती. मुले पोरकी झाली होती, वहिनी निराधार झाल्या होत्या. कबड्डी असोशिएशननें कंबर कसली— बाबा परत येणे शक्य नव्हते पण आर्थिक मदतीनें त्याचा संसार सावरणे जमले असते. चार मुलांच्या शिक्षणाची तरतूद झाली असती. लक्ष्मीमाता आणि स्टेट बँक या त्याच्या संघांनी पुढाकार घेतला. निधी जमविण्याचे काम चालू झाले. बाबाची लोकप्रियताही तशीच होती. बघता बघता पाच सहा हजार रुपये गोळा झाले. मग बाबा शिर्के निधी सहाय्यक स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. मुंबईतले नामवंत संघ स्वखर्चाने त्यात उतरले. सामने रंगले. निधी वाढला. सामन्याच्या शेवटच्या दिवशी निधीची रक्कम अकरा हजाराचा आकडा ओलांडून पुढे गेली होती.

प्रत्यक्ष आकडयाचे महत्व यापेक्षा निधी जमविण्याच्या मागची आपुलकीची

भावना आणि कळकळ याचे मोल अधिक असते. पण यावेळी जमा झालेली रक्कमही कमी मुळीच नाही. सुशिक्षितात आणि श्रीमंतांच्यात कबड्डी अजूनही फारसा परिचित नाही. लोकप्रिय तर नाहीच. या पार्श्वभूमीवर तर ही रक्कम अधिकच उठून दिसते. सर्व थरातून आणि सर्व भारतभर हा खेळ न्यावयाचा म्हणजे अनेक अंगानी संघटना बांधावी लागते. संघटनेमधले कार्यकर्ते ज्या जवळकीनें आणि जिद्दीनें एकमेकाशी बांधले जातात त्यांच्यावरच अशा संस्थाचे भवितव्य अवलंबून असते. खेळाला आणि खेळाडूंना काहीवेळा त्यांचा वाईटपणा पत्करूनही खेळाच्या वाढीसाठी शिस्त लावणारी महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन खेळाडूच्या संकटकाळीही मदतीला सरसावून उभी रहाते. हे चित्र अभिनंदनीय आहे. लक्ष्मीमाता आणि स्टेट बँक संघाचाही उल्लेख जरूर करायला हवा.

एक कल्पना या उपक्रमातून सुचू शकते. काहीना काही प्रमाणात अशा आपत्ती नेहमीच येत असतात. यासाठी कायम स्वरूपाचा निधी उभा करण्याची नितांत आवश्यकता आहे. केवळ या निधीसाठीच म्हणून मुंबई, पुणे, सोलापूर, सांगली या ठिकाणी दरवर्षी एक सामने आयोजित व्हावेत. परगावचे संघ बोलवून खर्च वाढविण्याची गरज नाही. वरील चारीही गावात कबड्डीचे भरपूर संघ आहेत आणि त्यांच्यातील चुरशीचे सामने निश्चितपणे गर्दी खेचू शकतील. आपल्या कबड्डीचे यात भले आहे या भावनेने सर्व संघांनी मदत केली तर सामन्याचे संयोजन त्रासदायक आणि खर्चिक ठरू नये. सतत तीन वर्षे अशा स्पर्धा आयोजित झाल्या तर पंचवीस ते पन्नास हजारापर्यंतचा कायमचा निधी कबड्डीपटु सहज उभा करतील त्यांच्या खेळाच्या आणि खेळाडूंच्या भवितव्याच्या सुरक्षिततेसाठी.

–बाबा शिर्के निधी स्पर्धा ही याची सुरुवात ठरेल काय ? ◻

## गुरुदक्षिणा ट्रॉफी


काही लोक वेडे असतात. वेड सुंदर असते. भव्य असते. दिव्य असते. त्या वेडासाठी मग ते रक्ताचे पाणी करतात. अपार श्रम घेतात. प्रयत्न असतो अक्षरश: शून्यातुन विश्व निर्माण करण्याचा. पण हे महाभाग जिद्दीचे असतात. अनेक घाव झेलूनही हटत नाही. मंझिलाचा रस्ता सोडत नाही.

कोल्हापूरचे मेघनाथ नागेशकर आणि सातारचे बबनराव उथळे ह्या अशा दोन व्यक्ती. पंचवीस वर्षांपूर्वी दलदल आणि डबकी असलेल्या ठिकाणी नागेशकरांनी शाहू स्टेडियमची प्रचंड वास्तु उभी केली आणि कोल्हापूरच्या सबंध क्रीडा जीवनाला योग्य आणि निकोप वळण लावले. सातारला बबनरावांनी देशी खेळाचा प्रचंड

पसारा उभा केला. सडकेचे सख्याहरी म्हणून ज्या तरुण पिढीची अवहेलना होते ती संध्याकाळी खेळाच्या मैदानावर यशस्वीपणे गुंतवता येते आणि अव्वल दर्जाचे खेळाडू त्यातून निर्माण करता येतात हे त्यांनी यशस्वीपणे सिद्ध केले.

केवळ सातारा शहरात संस्थेच्या पुरुषांच्या सात, महिलांची एक अशा आठ शाखा आहेत. इतर गावातला पसारा वेगळाच. स्वतःची व्यायाम शाळा आहे. या साऱ्या शाखावर मिळून बाराही महिने देशी खेळाची अखंड उपासना चालू असते. कबड्डी, खोखो, आटयापाटया, लंगडी, मल्लखांब, कुस्ती, लेझीम, फरिमदगा, आसने या विविध प्रकाराचे शास्त्रीय शिक्षण जवळजवळ हजार स्त्री-पुरुष नियमितपणे घेत असतात. बबनरावांच्या प्रेरणेने आणि त्यांच्यावर निष्ठा ठेवून कार्यकर्ते हे सारे उपक्रम विनामूल्य चालवितात. पुणे, शिवाजी विद्यापीठाच्या अनेक कबड्डी संघाचे संघनायक या संस्थेचे होते. भारतीय पातळीवर या स्पर्धेचा खेळाडू मल्लखांबात अजिंक्य ठरला आहे. संस्थेच्या प्रभाकर पवारने एका दमात मारलेल्या ६१६१ बैठकीचा उच्चांक अजूनही कोणी मोडला नाही. महाराष्ट्राच्या शालेय खोखो संघाचे नेतृत्व अ. भा. शालेय स्पर्धात या संस्थेच्या खेळाडूंना मिळाले आहे. महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव तीनदा जिंकणारा हा महाराष्ट्रातला एकमेव संघ हे यश कार्यकर्त्यांचे आहे, संघाचे आहे, खेळाडूंचे आहे तेवढेच ते बबनराव या एका व्यक्तीचेही आहे. प्रत्येक

पैशाला पाय फुटण्यापूर्वीच महाराष्ट्र बँकेत नियमाने बचत करा



चैन चंगळ हवीच पण भविष्याची तरतूद करणारी बचत त्या अगोदर हवी

आपण खालील पद्धतीने बचत करू शकता

(१) रीकरिंग डिपॉझिट योजनेद्वारा (आवर्तक योजना) (२) मुदत ठेव योजनेद्वारा (फिक्स्ड डिपॉझिट)

(३) सेव्हिंग्ज खाते उघडून

सविस्तर माहितीसाठी आपल्या जवळच्या शाखाधिकाऱ्याला भेटा

बँक ऑफ महाराष्ट्र

ऑफीस : ११७७, बुधवार पेठ, पुणे २

खेळाडूंवर त्यांच्या तंत्रामंत्राची, वागण्याबोलण्याची पडलेली छाप आणि त्याबद्दलचा आदर न सांगताही जाणवावा एवढा स्पष्ट आहे.

या श्री. शिवाजी उदय मंडळाचा यंदा आहे रौप्यमहोत्सव. त्यानिमित्ताने सातारा-शहरात हे लोक अ. भा. कबड्डी स्पर्धा आयोजित करत आहेत. उपक्रम मोठा आहे. सातारा जिल्ह्यात प्रथमच होणारा. सामन्यातील विजयी संघाला चांदीचा एक भव्य चषक मिळेल. त्याचे नाव आहे. 'गुरुदक्षिणा ट्रॉफी' ज्या बबनरावांच्या पुण्याईने संस्थेचा संसार गेल्या पंचवीस वर्षात समर्थपणे उभा राहिला त्याच्याबद्दल कृतज्ञतेची खूण म्हणून या कामात बबनरावांच्या हाताखालून गेलेल्या आजी माजी खेळाडूंनी ह्या ट्रॉफीची रक्कम जमा केली. सुमारे पाच हजार रुपये किंमतीची ही ट्रॉफी त्याच्या या पार्श्वभुमिमुळे महाराष्ट्रातील एकमेव अद्वितीय ठरेल. पण येवढ्यावरच गुरुदक्षिणा समितीचे अध्यक्ष डॉ. लवंगारे खुष नाहीत. ट्रॉफीचे डिझाइन आणि त्यावरील नक्षीकाम हे अतिशय देखणे ठरावे यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले आहेत. सातारला चषकाचे चित्र आणि कोल्हापूरला प्रत्यक्ष चाललेले काम हे दोन्ही पाहण्याचा मला योग आला. जवळजवळ निम्मा भारत मी कबड्डी सामन्यासाठी पायाखाली घातला आहे. परंतु सर्व ठिकाणी बघितलेल्या पारितोषकापेक्षा ही ट्रॉफी आकर्षक ठरेल असा माझा अंदाज आहे. सामन्याला साऱ्या भारतातून गोळा होणारे संघ आपले मत देतीलच. त्यांचाही होकार माझ्या मनाला मिळाला तर बबनरावांच्या आजपर्यंतच्या कामाचा योग्य तो गौरव केल्याचे समाधान या कामासाठी आपुलकीने निधी गोळा केलेल्या संस्थेतल्या असंख्य कार्यकर्त्यांना निश्चितच लाभेल.

◻ ◻ ◻

---

## महाराष्ट्रातील भारतीय कबड्डीस्पर्धांचे उन्हाळी वेळापत्रक

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | जयभवानी तरुण मंडळ | सोलापूर | २०–४ २५–४ |
| (२) | मुंबई जिल्हा कबड्डी असो. | मुंबई | २८–२ २–५ |
| (३) | बाळीवेस तरुण मंडळ | सोलापूर | ६–५ ९–५ |
| (४) | श्री शिवाजी उदय मंडळ | सातारा | ९–५ २१–५ |
| (५) | श्री अंबाबाई तालीम | मिरज | ९–५ १२–५ |
| (६) | तरुण भारत व्यायाम मंडळ | सांगली | १०–५ १३–५ |
| (७) | महाराष्ट्र संस्कृती मंडळ | औरंगाबाद | १९–५ २३–५ |

काही सामन्यातील खेळाडू म्हणून आणि काहींचा निरीक्षक म्हणून यापैकी बहुतेक सामन्यांचा वृत्तांत वाचकांच्या पुढे सादर केला जाईलच.

# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

१७ ते २३ एप्रिल १९७१

**मेष** : शरीरप्रकृतीला थोडासा बाध येईल. लग्नातील रवी-शनी मानसिक अस्वस्थता वाढल. स्वभावात हट्टीपणा वाढेल. पैशाचा खर्च अतोनात होऊन अडचण निर्माण होईल. प्रवास योग येईल तो टाळावा. घरात काहीतरी धार्मिक विधी होईल. घरात मतभेद निर्माण होईल. व्यवसायधंदा चांगला चालेल. फॅन्सी कापड अगर मशीनरीच्या धंद्यात खूपच प्रगती होईल.

विद्याभ्यासात अनेक अडचणी निर्माण होतील. सरकारातून मदत मिळणार नाही. फौजदारी वकिली करणारांना भरपूर काम व पैसा मिळण्याचा योग आहे. सोमवार-मंगळवारी हा योग जोरदार आहे. संतती करता बराच पैसा खर्च करावा लागेल. स्त्री लंपटता पराकोटीला जाईल. जपून वागावे. शुभतारखा १७।२१।२२।२३.

**वृषभ** : शरीरप्रकृती चांगलीच राहील. पैशाचा बोजवारा उडेल. प्रवासाचा योग आहे. धार्मिक कामाकरता प्रवास घडेल. सरकारी कामात यश प्राप्ती होणार नाही. घरासंबंधी फौजदारी कामे सुरू होतील. मित्रमंडळी चांगली वागतील. सप्तमातील गुरू सर्व संकटातून सोडवील. मनाचा तोल जाईल. हा योग शनिवारी आहे

विद्याभ्यासात संपूर्ण माघार घ्यावी लागेल. सरकारी मदत मिळणार नाही. संततीकरता पैसा खर्च करावा लागेल. भागिदारांकडून सर्व कामात मदत होईल. उद्योगधंद्यात बरीच पीछेहाट होईल. बिल्डिंग कॉन्ट्रक्टर्स. जमिनीसंबंधी व्यवहार करणारे, या लोकांना व्यापारात नुकसान होईल. अचानक धनलाभ होईल. शुभ तारखा. २०।२१।२२।२३.

**मिथून** : शरीरप्रकृती जरा नरमच राहील. वातविकारानी आजारीपण येईल. धनस्थिती बिघडेल. अष्टमातील मंगळ-राहू वाचा शुद्धी कमी करतील. पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना कामाचा ताण जास्त पडेल. घरात मुलांच्या मुंजीसारखे शुभ कार्य होण्याचा योग आहे. ३७ पुढील व्यक्तींच्या घरात हा योग येईल.

संततीचा उत्कर्ष होईल. कला क्षेत्रातील संततीला मनाजोगा व्यवसाय मिळेल. चित्रकार, फॅन्सी वस्तूंचे व्यापारी. प्रसाधने निर्माण करणारे याना काल अत्यंत प्रगतीकारक आहे. अचानक धनलाभाचा योग येईल. हा योग गुरुवारी-शुक्रवारी

येईल. पत्नी व भागिदार जरा विरुद्धच वागणूक करतील. पोझिशनला कमीपणा येणाऱ्या गोष्टी घडतील. दशमावर पाहणारा गुरू त्याचे आयत्या वेळी निवारण करील. शुभ तारखा. १७।२०।२१।२२.

कर्क : शरीरप्रकृती ठीक राहणार नाही. मनस्ताप वाढेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. पैसा वाममार्गानी हातात पडेल. सरकारी कामात यश येईल. प्रवासात पराक्रम हातून घडेल. घरात सुखदायक वातावरण राहील. मित्रमंडळी भाग्योदायक घटना घडण्याला मदत करतील. शत्रूंचे काही एक चालणार नाही. घरासंबंधी प्रश्न तूर्त तरी पुढे ढकलले जातील.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. धार्मिक ग्रंथ प्रकाशकांना चांगला आठवडा आहे. कर्क लग्नाचे सार्वजनिक कार्यकर्ते असतात. सार्वजनिक कामात यश येईल. दशमातील शनी मानहानी करण्याचा योग आहे. घरातील वृद्ध माणूस, माता अगर पिता याना जिवावरचे दुखणे येण्याचा योग आहे. एकच शुभ योग पचमातील गुरू सर्व संकटातून पार पाडील. शुभ तारखा १७।२०।२१।२२.

सिंह : शरीरप्रकृती चांगली राहील. कुटुंबासह काही शुभ कार्याकरता प्रवास घडेल. शनिवारी हा योग येईल. धनस्थानची स्थिती समाधानकारक राहील. आत्मघातकी विचार मनात येतील. अचानक धनलाभ होण्याचा योग आहे. २७ ते ३२ या वयातील व्यक्तींना मनमुराद पैसा मिळेल. घरात अत्यंत सुखी वातावरण राहील.

विद्याभ्यासात संपूर्ण यश प्राप्ती होईल. संततीचा उत्कर्ष होईल. पोलीस अधिकारी मॅजिस्ट्रेट, सरकारी प्रॉसिक्युटरचे काम करणारे वकील, या सर्वांना दिवस प्रगती पथावर नेणारे आहेत. जरा कामाचा जास्त ताण पडेल. त्या करता प्रवास घडेल. शत्रूचा नाश होईल. भागीदार चांगले वागतील. गुरु शुक्रांचा ९।५ योग सर्व बाबतीत यश मिळेल. शुभ तारखा १७।२०।२१।२२।२३.

कन्या : शरीरप्रकृती चांगली राहणार नाही. धनस्थिती चांगली राहील. शनिवारी घरातील सर्व मंडळी एकत्र जमून आनंदात जाईल. भावंडांचा उत्कर्ष होईल. हातून पराक्रम घडेल. व्यापार धंद्यात अनेक अडचणी निर्माण होतील. सरकारी प्रकाशनाचे काम करणाराना कमीपणा आणणाऱ्या घटना घडतील. अचानक धनलाभ शनिवारी होईल.

विद्याभ्यासात अपयश येईल. संतती वाईट वागेल. त्यापासून आर्थिक व मानसिक नुकसान होईल. संतती बाबतीत खटल्याला तोंड द्यावे लागेल. पत्नीकडून सर्व-बाबतीत चांगली मदत होईल. मित्रांबरोबर प्रवास घडेल. फॅन्सी वस्तूचा व्यापार करणाराना त्रासदायक दिवस आहेत. ३२ ते ३६ वयातील व्यक्तीना याचा अनुभव जास्त येईल. वृद्ध माणूस भयंकर आजारी होण्याचा योग आहे. सर्व सप्ताहच साधारण फल देणारा आहे.

तूळ : शरीरप्रकृती चांगली राहील. हातून पराक्रम होईल. धनस्थानची स्थिती चांगलीच राहील. घरात काहीतरी राहिलेले महालक्ष्मीचे व्रत करून घ्यावे. सोमवार. मंगळवार या करता चांगला आहे. प्रवासाचा योग आहे. धंदा व्यवसाय जरा कमीच पडेल. भागीदार नीट वागणार नाहीत. फौजदारीच्या कामात अडचण उत्पन्न होईल. सार्वजनिक कामात यश प्राप्ती होईल.

विद्याभ्यासात यश प्राप्ती होईल शास्त्रीय विषयांचा अभ्यास करणारांना सरकारी मदत मिळेल. अचानक धनलाभ होईल. स्थावराबद्दल मिळणारी रक्कम हातात पडेल. वडील भावंडे व मित्र सर्व बाजूंनी उपयोगी पडतील. धार्मिक साहित्याचा व्यवसाय करणाराना प्रगतीपर दिवस आहेत. शुभ तारखा १७।२०। २१।२२।२३.

वृश्चिक शरीरप्रकृती चांगलीच राहील. धनस्थितीत सुधारणा होईल. भावंडाकडून त्रास होईल. प्रवासात नुकसान होईल. ४२ च्या पुढील व्यक्तींना याचा अनुभव जास्तच येईल. सासुरवाडी अगर मामाच्या घरी कार्याकरता जावे लागेल. गृहसौख्यात व्यत्यय येईल. मित्रांकडून फसवणूक होईल.

विद्याभ्यासात नेत्रदीपक प्रगती होईल. साहित्य, चित्रकला वगैरेमध्ये अमाप पैसा मिळेल. सरकारी कामात अनेक अडथळे निर्माण होतील. फौजदारी प्रकरणात सापडण्याचा योग आहे. संततीचा उत्कर्ष होईल. हातात घेतलेल्या प्रत्येक कामात अनंत अडचणी उभ्या राहतील. शुभ तारखा १७।२०।२१।२२।२३.

धन : शरीरप्रकृतीत बिघाड होईल. अपचनाचा विकार बळावेल. धनस्थितीत चांगलीच सुधारणा होईल. शनी-मंगळाचा अन्योन्य योग आहे, तो चांगला आहे. ठोशास ठोसा देण्याची तयारी ठेवा. गुरू व्ययातून चतुर्थावर पाहात आहे तो अत्यंत शुभ योग आहे. सुखवृद्धी करील.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येईल. मशिनरीचे शिक्षण घेणारे असतील त्यांना फार यश मिळेल. बौद्धिक व्यवसाय करणाऱ्यांना अत्यंत संपत्ती प्राप्त होईल. अचानक धनलाभ होईल. वाणीत जरा कठोरपणा येईल. बुध-शनी योग सर्व गृहसौख्य प्राप्त करून देईल. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

मकर : शरीरप्रकृती चांगली राहील. स्वभावात आग्रहीपणा वाढेल. शनी-मंगळाचा अन्योन्य योग होत आहे. तो चांगला आहे. घरात बाहेरगावी असलेले अधिकारी मुलगे येतील व आनंदात दिवस जातील. घरासंबंधी प्रश्न मनासारखे सुटतील. प्लॉट वगैरे घेण्यास दिवस चांगले आहेत.

विद्याभ्यासात संपूर्ण यशप्राप्ती होईल. ॲग्रिकल्चर कोर्स, मेकॅनिकल कोर्स, मेडिकल कोर्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रगतीपर दिवस आहेत. सोमवार, मंगळवार या दृष्टीने चांगले जातील. उद्योगधंदा फारच समाधानकारक वाढेल. फॅन्सी वस्तू, आयते कपडे यांचा व्यापार करणाऱ्यांना अमाप धनलाभ होईल. एजन्सीचे काम

करणारांना फारच चांगले दिवस आहेत. शुभ दिवस सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

**कुंभ** : शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थानची स्थिती समाधानकारक असेल. बरेच दिवस येणे असलेले पैसे हातात पडतील. बुधवार, गुरुवारी हा योग येईल. प्रवासयोग येईल. त्यात मानसन्मान वाढणाऱ्या गोष्टी घडतील. घरात काहीतरी भाग्योदय वाढविणारे शुभ कार्य होईल. संततीमार्फत अचानक धनलाभ होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश प्राप्त होईल. फौजदारी वकील आपल्या धंद्यात एकदम पुढे येतील. सरकारी कामात यश प्राप्त होईल. उद्योगधंद्यात अनंत अडथळे निर्माण होतील. बौद्धिक व्यवसाय करणारांना बरीच माघार घ्यावी लागेल. एकच एक शुभ योग दशमातील गुरु सर्व अडचणीतून मुक्त करील. शुभ तारखा १७।२१।२२।२३.

**मीन** : शरीरप्रकृती चांगलीच राहील. धनस्थितीत मनासारखी सुधारणा होईल. गुरु-शुक्राचा ९।५ योग सर्व बाबतीत प्रगती करील. एकादशातील मंगळ, राहू ४२ च्या पुढील व्यक्तींना उत्कर्षाच्या शिखरावर बसवतील. घरात सासरची माणसे येऊन दिवस आनंदात जातील. प्रवास घडेल, त्यात यश येईल. सार्वजनिक कामात यशप्राप्ती होणे जड जाईल.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. तत्त्वज्ञानाकडे मनाचा कल फिरेल. संततीचा उत्कर्ष होईल. शत्रूकडूनसुद्धा मदतच होणाऱ्या घटना घडतील. जे जे हातात घ्याल त्यात यश मिळेल. मनाचा मोठेपणा दाखविण्याचा योग येईल. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

□ □ □


## अक्षरपद्धती, कुटुंबनियोजन आणि कुटुंबसुयोजन

**अनैतिक साधने न वापरता मनोवांच्छित संतती होईल. सुयोजनकरता पाळावयाचे दिवस, महिने, चंद्र वगैरेंचा तक्ता उपयोगाच्या माहितीसह रु. १०१/– व नियोजनाचा तक्ता रु. ५१/– शिवाय त्यावर Astro-Medical उपाय सांगू. याशिवाय वर्षफल रु. १०/– विवाह प्रश्न रु. १०/– व इतर सर्व कामे केली जातील. भेटण्याची वेळ सकाळी ८ ते ११**

**पं. वि. म. जोशी, ज्योतिष विशारद**
**"गीताप्रसाद" आऊट हाऊस, कर्वे रोड, पुणे नं. ४.**

सध्या तरी त्याला या राज्याचा नाईलाज आहे. श्री. वसंतराव यांच्या रु. ३५० या मासिक पगारातून कापला जाणारा रु. २८ प्रॉव्हिडंट फंड, रु. १० सहकारी क्रेडिट सोसायटीचा हप्ता आणि १० रु. विम्याचा हप्ता या शिवाय दुसरी शिल्लक पडत नाही. क्रेडिट सोसायटी आणि विमा हप्ता बंद केला तर काही विकासात्मक खरेदी जलद गतीने होऊ शकेल असा एक विचार होता. पण तो फेटाळला गेला.

विकासाच्या आणि सुधारणांच्या गरजा अनेक आहेत. जोपर्यंत सरकारी जागा मिळत नाही तोवर या खोलीत सुधारणा करणे आवश्यक आहे. घरात खुर्ची एकच आहे. टेबल नाही. सैंपाकासाठी गॅस घेणे अत्यावश्यक असूनही त्याला लागणारा भांडवली खर्च सध्या परवडण्यासारखा नाही. नानांना उकाडा असह्य होतो. पंखा घेणे अत्यावश्यक आहे. पण जमत नाही.

इतर खरेदीतून काटकसर करून या विकासात्मक अथवा सुधारणात्मक गरजा भागविण्याचा विचार सन्माननीय गृहमंत्र्यांनी मांडला होता. परंतु हा विचार ⊵ पडण्यासारखा आहे. कपात कशात करणार ? दुधात, तुपात, रेशनात, तेलात की भाजीत ? अध्यक्षमहोदय सध्याच आपण जे अन्न खातो ते फारसे पौष्टिक नसते. यातही जर आणखी कपात केली तर ते आपल्या भावी पिढ्यांच्या दृष्टीने धोका-दायक आहे. पाच माणसांच्या घराला फक्त अर्धा लिटर दूध हे फारच कमी झाले. याशिवाय आणखी कमी नको. नियमित अंडी घेणे अशक्य आहे. साजूक तूप फारच क्वचित घेतले जाते. तेलही अगदी काटकसरीने वापरले जाते. ७५ पैश्यात फारशी भाजी मिळत नाही. खरे म्हणजे रोज सव्वा रुपयाची तरी भाजी घेणे आवश्यक आहे. पण ते सध्याच्या परिस्थितीत शक्य नाही. थोडक्यात काय की शाळेत मुले जो आदर्श आहार शिकतात तो काही आपल्या मुलांना अजूनही देता येत नाही.

अध्यक्षमहाराज, याबाबतीत मी आपले लक्ष एका गोष्टीकडे वेधू इच्छितो. आपल्यापेक्षा कमी उत्पन्न मिळविणारी कुटुंबें अधिक सकस आहार खातात. यांचे कारण त्यांना घरभाडे, वीजेचे भाडे द्यावे लागत नाही. आपल्यासारखा कपड्यांवर, साबणावर खर्च करावा लागत नाही. ते रोज अंडी खाऊ शकतात, किंवा मांस मच्छीसुद्धा घेऊ शकतात. आपण मास-मच्छी खात नाही. पण अंडी, तूप, दूधसुद्धा फारसे विकत घेऊ शकत नाही. ही कोंडी फोडायची कशी हा मोठा प्रश्न आहे. आहे तो खर्च कमी करता येत नाही आणि उत्पन्न तर वाढणे मोठे कठीण. अशा परि-स्थितीत कोंडी-बिंडी फोडण्याचा प्रयत्न न करता राज्य आहे तसेच चालवायचे हाच मार्ग पुढे दिसतो. पगार वाढण्याची किंवा किंमती खाली उतरण्याची आपण नेहमीच वाट पाहत असतो. दरवर्षीची पगारवाढ पुरेशी नसते. कारण त्यापेक्षा दुप्पट वेगाने

किंमती वाढतात. एकदम दुप्पट पगार वाढल्याशिवाय परिस्थिती काबूत येण्याची शक्यता दिसत नाही. या अंधारात प्रकाशाचा एकच किरण दिसतो. गृहमंत्र्यांनी सुरु केलेली धंद्याची योजना. या योजनेत धोका आहे. पण यशस्वी आली तर आर्थिक दृष्टया राज्याला बरे दिवस येण्याची शक्यता आहे. (बाबा भाषण संपवून खाली बसतात.

**नाना :** आजची सभा बरखास्त. अर्थसंकल्पावर चर्चा करण्याची गरज भासत नाही. कुणाचा आक्षेप ?

**आई :** नाही कशी. अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थव्यवस्थेचे जे निराशाजनक चित्र उभें केले आहे ते सर्वथैव चुकीचे आणि गैरलागू आहे. उदाहरणार्थ मागील वर्षीच सर्व राज्य मिळून पाच वेळा चित्रपट बघण्यास गेले होते याचा उल्लेख अर्थमंत्र्यांनी कटाक्षाने टाळली.

**बंड्या :** अध्यक्ष महाराज; हे विधान चुकीचे आहे. एक सिनेमा गणपती-उत्सवात फुकटात पाहिला होता.

**मनी :** आणि एक मामानी दाखवला होता.

**आई :** ते काहीही असो. तीन सिनेमे तर पाहिले. हा खर्च चैनीचा असला तरी त्याचा आवर्जून उल्लेख करण्याचे कारण एवढेच की परिस्थिती काही एवढी भयानक नाही. शिवाय गेल्या डिसेंबर महिन्यात आपण जवळजवळ महिनाभर मनीला आणि बड्याला रोज एक-एक अंडे देत होतोच की. एकूण आहाराच्याच सकसपणाविषयी केलेले विधानही चुकीचे आहे. तुरीची डाळ, भुईमुगाच्या शेगा, तेल तसेच मुळा, कांदा, पालक आदी स्वस्त पालेभाज्या यासारख्या प्रथिन आणि जीवनसत्व-युक्त पदार्थांचा आपण भरपूर वापर करीत असतो. तेव्हा आहारात समतोल नाही असे म्हणणे चुकीचे आहे. दूध, तूप नको असे कोण म्हणेल. पण नाही म्हणून निराश होण्यात काय अर्थ आहे ! आपल्या राज्यातील भावी पिढी अगदीच सुदृढ आणि सशक्त नसली तरी निरोगी आणि उत्साही आहे हे काय कमी ?

**मनी-बंड्या :** हियर–हियर–

**आई :** आणि उत्पन्नाबावतचे अर्थमंत्र्यांचे वक्तव्यही पराभूत मनोवृत्तीचे आहे. आपण अजून झोपडपट्टीच्या अवस्थेला पोचलो नाही हे खरे आहे. पण जरा जोर लावला तर आपण योजलेला धंदा आपण चांगला फायदेशीरपणे चालवू शकू असा मला विश्वास आहे. दोन तीन महिने पोटाला चिमटा घेऊन थोडा भांडवली खर्च करायचा. श्रम करून पदार्थ तयार करायचे आणि ते विकायचे. विकण्यासाठी मात्र सर्व सभासदांची मदत लागेल. त्यासाठी कोणी मानसन्मानाचे घोंगडे धरता कामा नये. जरा जोरात धंदा केला तर आपण बरे निभावून नेऊ शकू.

**मनी-बंड्या :** हियर–हियर–गृहमंत्र्यांच्या सूचनेला आमचा पाठिंबा आहे. कोणतेही काम करण्याच्या बाबतीत आम्ही मागेपुढे पाहणार नाही.

**बाबा** : मानसन्मानाच्या आग्रहाने मीही कधी काम अडू देणार नाही.

**नाना** : ठीक–ठीक. म्हणजे सर्वांनाच अर्थसंकल्प आणि त्यावरच्या सूचना मंजूर आहेत असे मी गृहीत धरतो. बैठक समाप्त.

संपादक महाराज,

इथे हा अहवाल संपला. मला तो वाचावासा वाटला. वाटले इतरांनाही तो वाचावासा वाटेल. नुकतीच लोकसभेची आणि विधानसभेची बजेटं येऊन गेली. तेव्हा त्या संदर्भात हाही अहवाल वाचला जाईल असे वाटते. म्हणून तुमच्याकडे पाठवीत आहे.

विशेष संशोधन न करता हेही ध्यानात येईल की झोपडपट्टी आणि बंगले यांच्या सीमारेषांवर असणाऱ्या कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबांबाबतचा अहवाल आहे. पण तरीही तो वाचायला काय हरकत आहे ?

¤ ¤ ¤

---


## मनोरंजनाचे नवीन पर्व

श्रीमिनी चित्र

# लाखों में एक

ईस्टमनकलर

| दिग्दर्शक | संगीत | गीते | संवाद |
|---|---|---|---|
| एस्. एस्. बालन | आर. डी. बर्मन | आनंद बक्षी | पं. मुखराम शर्मा |
| **सुपर** | **रेक्स** | **लोटस** | **पॅलेस** |
| ११॥, २॥, ६, ९। | १२, ३, ६, ९ | ११॥, २॥, ६, ९। | ११॥, २॥, ६, ९। |
| **सिटीलाईट** | **हिंदमाता** | **कुमकुम** | **रूपम** |
| ११॥, २॥, ६, ९। | | ११॥, २॥, ५॥, ९ | २॥, ५॥, ९ |

**डिफेन्स** (कुलाबा), **नंदी** (वान्द्रे), **मोलन** (सांताक्रूस), **लक्ष्मी** (पार्ले), **संगम–अंबर** (अंधेरी), **हंजर** (जोगेश्वरी), **अनुपम** (गोरेगाव), **जोहरा** (मालाड), **अजंठा** (बोरिवली), **सहकार** (चेंबूर), **कल्पना** (कुर्ला), **श्रेयस** (घाटकोपर), **कृष्ण** (भांडूप), **प्रभात** (ठाणे), **पूर्णिमा** (कल्याण), **अमन–प्रभात** (उल्हासनगर)

– जनता प्रकाशन –


---


**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर**

माणूस तर्फे
अनिल बर्वे
गौहत्तीमार्गे
आगरताळापर्यंत
घडकले तरी आहेत.
नंतरचे वर्तमान ?
शक्यतो लवकरच
सादर होत आहे–

# खासी ते डाक्का